म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : भू-प्रवास
सं.क्र. : ३९६

REFBK-0012997

૩૩૮૧૪
૩૧૬

૩૩૮૧૪
૩૧૬
૧૩-૧૧-

# श्री अष्टविनायक

REFBK-0012997
REFBK-0012997

लेखक
श्री. द. म. खेर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२९९७

मूल्य रुपये १-२५

आनंद कार्यालय प्रकाशन, पुणें

# प्रकाशनाचे दोन शब्द

संस्थेतर्फे नेहमीं बालवाचकांसाठीं आम्हीं पुस्तकें प्रकाशित करतों. पण हें पुस्तक बालवाचकांसाठीं न करतां गणपति-भक्तांसाठीं हें खास प्रकाशन आम्ही प्रसिद्ध करीत आहोंत.

गणपतीची 'लोकप्रियता' लोकमान्यांनीं उत्सव सुरू केल्यापासून वाढली असली तरी गणपति हें आपलें फार पुरातन दैवत आहे हें कित्येक गाणपत्यांना देखील माहीत नसेल. श्री. द.म.खेर यांनीं या पुस्तकांत दिलेल्या पौराणिक कथा निरनिराळया पुराणांवर आधारलेल्या आहेत. त्या खचित उद्बोधक व मनोरंजक वाटतील. वाचकांना या पुस्तकाची रचना आवडेल अशी आशा वाटते.

—प्रकाशक


प्रकाशक
यशवन्त गो. जोशी
व्यवस्थापक, आनंद कार्यालय
१०१५ सदाशिव, पुणें २

✰

प्रथमावृत्ति, दि. ३-९-१९६२, श्रीगणेशचतुर्थी

✰



सर्व हक्क स्वाधीन



✰

मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पुणें २

# निवेदन

> स्वस्तिश्री गणनायको गजमुखो मोरेश्वरः सिद्धिदः
> बल्लाळस्तु विनायकस्त्वथ मढे चिंतामणिस्थावरे।
> लेण्याद्रौ गिरिजात्मजः सुवरदो विघ्नेश्वरश्चोझरे
> ग्रामे रांजणसंस्थितो गणपतिः कुर्यात् सदामंगलम् ॥

वरील श्लोकांत अष्टविनायकांचीं स्थानें सांगितलीं आहेत तीं अशीं :– मोरगांव, सिद्धटेक, पाली, महड, थेऊर, लेण्याद्रि, ओझर आणि राजणगांव. या क्षेत्रांपैकीं, मोरगांव, थेऊर, लेण्याद्रि, ओझर आणि राजणगांव हीं स्थानें पुणें जिल्ह्यांत आहेत. पाली आणि महड हीं कुलाबा जिल्ह्यांत असून सिद्धटेक हें नगर जिल्ह्यांत आहे. या क्षेत्रांचें थोडक्यांत महत्त्व असें :–

**मयूरेश्वरक्षेत्र** येथें गणेशानें कमलासुराचा वध केला. नंतर विश्वकर्म्यानें येथें गणेशाचें देवालय बांधलें. गणेशानें सिंधु दैत्याचा वध केल्यानंतर तो आपल्या अवतारसमाप्तीपर्यंत येथेंच रहात होता.

मधुकैटभ यांच्याबरोबर युद्ध करून त्या युद्धांत जय मिळावा म्हणून विष्णूनें **सिद्धटेक** येथें तपश्चर्या केली. गजाननानें प्रसन्न होऊन विष्णूला वर दिला. पुढें मधु आणि कैटभ या दैत्यांबरोबर युद्ध करून विष्णूनें त्यांचा वध केला.

बल्लाळानें **पाली** या ठिकाणीं तपश्चर्या केली आणि शेवटीं तो मुक्त झाला.

गृत्समदानें **महड** येथील पुष्पक वनांत गजाननाची " गणानां त्वा " या मंत्रानें आराधना केली. विनायकानें प्रसन्न होऊन त्याला ब्राह्मणांत श्रेष्ठपद मिळवून दिलें.

**थेऊर** येथें ब्रह्मदेवानें चित्तचांचल्य नष्ट व्हावें म्हणून गजाननाचें आराधन केलें. त्याचप्रमाणें इंद्रानें येथें तपश्चर्या करून आपल्या अंगावरील हजारो भगेंद्रें नाहींशीं करून घेतलीं आणि गजाननाच्या प्रसादानें त्याच्या भगेंद्रांच्या ठिकाणीं सहस्र नेत्र निर्माण झाले.

**लेण्याद्रि** या ठिकाणीं पार्वतीनें ' गजानन ' आपला पुत्र व्हावा म्हणून तपश्चर्या केली. तिनें गणेशचतुर्थीला पूजेसाठीं जी पार्थिव मूर्ति तयार केली होती तीच सजीव झाली आणि ती गणेशरूपानें तिच्यापुढें, तिचा पुत्र म्हणून उभी राहिली. सिंधुदैत्याच्या वधासाठीं झालेला हा गणेशाचा अवतार होय.

पार्श्वऋषींचा पुत्र हा गजाननाचा अवतार होता. त्यानें विघ्नासुराचा **ओझर** या ठिकाणीं पराभव केला.

**रांजणगांव** या ठिकाणीं शंकरानें तपश्चर्या करून गजाननाच्या वरानें त्रिपुरासुराचा वध केला.

* * *

शैवांना ज्याप्रमाणें बारा ज्योतिर्लिंगें पूज्य आहेत त्याचप्रमाणें अष्टविनायक गाणपत्यांना पूज्य आहेत. गणेश ही देवता वैदिक आहे. प्रथम गणपतीचा उल्लेख ' गणानां त्वा गणपतिं हवामहे ' या ऋग्वेदाच्या ' ब्रह्मणस्पति ' सूक्तांत आढळतो. ऋग्वेदाचा काळ निदान सहा हजार वर्षांपूर्वीचा आहे. यावरून गणपति ही देवता ऋग्वेदपूर्वकालीन आहे. खिस्तीसनानंतर तीनशें वर्षांनीं अनार्य लोक मेलेल्या हत्तींची कातडी पांघरीत होते आणि हत्तीच्या सोंडेचे मुखवटे घालीत होते. अशा एका टोळीचा विनायक किंवा गणपति प्रबल असा नायक होता आणि आर्यांनीं त्याला आपल्यांत सामील करून घेऊन त्याला देवत्व दिलें असा कांहीं संशोधकांचा तर्क आहे. परंतु त्यांनीं ऋग्वेदांतील उपरिनिर्दिष्ट ब्रह्मणस्पतिसूक्ताचा मुळींच विचार केलेला नसावा असें वाटतें.

आशिया मायनर, चिनी, तुर्कस्तान, रशियाचा दक्षिणभाग, तिबेट, ब्रह्मदेश, चीन, जपान, मलाया, अमेरिका, सुमात्रा, जावा, बाली वगैरे देशांत गणेश–मूर्ति सांपडलेल्या आहेत. यावरून प्राचीन काळीं त्रिखंड पृथ्वींत गणेशोपासना पसरली होती हें निर्विवाद आहे.

गणपतिअथर्वशीर्ष हें एक उपनिषद् आहे. डोकें शांत ठेवण्याचें तें एक साधन आहे. थर्व या धातूचा अर्थ गतिमान् होणें असा आहे. अथर्व म्हणजे अगतिमान होणें. चित्त अत्यंत चंचल असतें. चित्त निर्विकार करणें

म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध करणें होय. चित्तवृत्तिनिरोध म्हणजे योग अशी योगाची व्याख्या आहे. अथर्वशीर्षाचे पाठ करणें हें योगाचरण आहे. अथर्वशीर्ष म्हणणारा योगी आहे, इतकेंच नव्हे तर तो योग्यांमध्यें श्रेष्ठ आहे, असें अथर्वशीर्षांतच सांगितलें आहे. अथर्वशीर्षांत सगुण व निर्गुण उपासनांचा अंतर्भाव आहे. निर्गुणाची उपासना ज्याला झेपणार नाहीं त्याला सगुणोपासनेनें आपलें ध्येय गाठण्याची योजना अथर्वशीर्षांत आहे. "सगुणाचेनि आधारें निर्गुण पाविजे निर्धारें" या श्रीसमर्थ रामदासांच्या वचनाप्रमाणें सगुणाची उपासना करणाराला निर्गुणाची प्राप्ति होत असते.

गणपति ही सर्व हिंदूंची देवता आहे. हिंदूंच्या सोळा संस्कारांत किंवा कोणत्याहि कार्याच्या आरंभीं गणपतीला अग्रपूजेचा मान आहे. पूर्वीं मुलाला शिकविण्याच्या वेळीं त्याला प्रथम 'श्रीगणेशायनमः' या गणेशाच्या नमनाचा धडा देण्याची वहिवाट असे. वर्षानुवर्षें प्रत्येक हिंदूच्या घरांत गणेशचतुर्थीचा उत्सव होत असतो. पण ज्या गणपतीचें आपण पूजन करतों त्याचें स्वरूप काय आणि त्याचें भजनपूजन अथवा त्याची उपासना केल्यानें फलप्राप्ति काय होते याविषयीं सविस्तर अशी माहिती सर्व गाणपत्यांना नसते.

गणपतिअथर्वशीर्षावर ऋग्वेदभाष्यकार सायनाचार्यांनीं भाष्य केलें आहे. त्यांत गणपति म्हणजे कोण याचा त्यांनीं खुलासा केला आहे. "ब्रह्मणः ब्रह्मणांपतिः गणपतिः" असा त्यांनीं गणपति या शब्दाचा अर्थ दिला आहे. 'ब्रह्मणः' हें ब्रह्म या शब्दाचें षष्ठीचें एकवचन आहे आणि 'ब्रह्मणां' हें त्या शब्दाचें षष्ठीचें अनेकवचन आहे. एकवचनी शब्दानें, या विश्वांत ब्रह्ममायादि जेवढें अव्यक्त आहे त्याचा निर्देश होतो; आणि 'ब्रह्मणां' या अनेकवचनी शब्दानें, अव्यक्तांतून जी स्थावर-जंगमात्मक व्यक्त सृष्टि निर्माण झाली तिचा निर्देश होतो. यावरून गणपति हा अव्यक्त आणि व्यक्त अशा उभय सृष्टींचा अधिपति होय. ऋग्वेदांतील ब्रह्मणस्पति आणि गणपति हे एकच होत. दृश्य आणि अदृश्य सृष्टीचा मूळ सत्ताधारी गणपतीच आहे. त्याचा विश्वाला आधार आहे. ब्रह्मा, विष्णु आणि महेश त्याचप्रमाणें शक्ति आणि सूर्य यांना आपआपलीं कार्यें करण्याचें सत्तासामर्थ्य गणपतीनेंच दिलें.

गणेशोपासनेचे अनेक मंत्र आहेत. परंतु त्यांत एकाक्षर आणि षडक्षर मंत्र अत्यंत प्रभावी आहेत. पतञ्जलिमहामुनींनीं मंत्रजपाला क्रियायोग म्हटलें

आहे. मंत्रजपानें उपासकाला सिद्धी प्राप्त होतात. ज्यांनीं अशा सिद्धी मिळविल्या आहेत, अशा सिद्धपुरुषांकडून मंत्रोपदेश घेऊन त्याचा विधिपूर्वक जप केल्यास जप करणाराला इष्ट फळ मिळाल्यावांचून रहात नाहीं. कांहीं उपासकांना मंत्रजपानें इष्टफलप्राप्ति होत नाहीं. ते म्हणतात कीं, " आम्ही अनेक दिवस जप केला पण आम्हांला कांहींच अनुभव आला नाहीं. " त्यांच्या बाबतींत कांहीं तरी चुकत असलें पाहिजे. त्यांच्याकडून यथासांग कर्म घडत नसावें. एखादें गणितांतील उदाहरण सोडवावयाचें झाल्यास प्रथम आकडे बरोबर मांडले पाहिजेत, आणि रीत बरोबर पाहिजे तरच उत्तर बरोबर येईल. आंकडे बरोबर मांडले नाहींत आणि रीत बरोबर असली, आकडे बरोबर आहेत आणि रीत चुकली किंवा आंकडे बरोबर नाहींत आणि रीतहि चुकली तरी उत्तर बरोबर येणार नाहीं. तसेंच उपासनेचें आहे. मंत्रजप करतांना तो विधिपूर्वक झाला पाहिजे. जप करतांना देवतेकडे पूर्ण लक्ष पाहिजे. चित्त विचलित होतां कामा नये. कांहीं विशिष्ट नियम पाळले पाहिजेत. अशा सर्व गोष्टी जुळून आल्यावर मंत्रसिद्धि झालीच पाहिजे. पुष्कळ उपासकांना अशा प्रकारचे अनुभव आल्याचें माझ्या पाहण्यांत आहे. गणेशाच्या उपासनेचा भारतांत जितका जास्त प्रसार होईल तितकीं संकटें निवारण होतील आणि गणेश भारताच्या शत्रूंचा नाश करील असा आम्हांला विश्वास वाटतो. परंतु लोकांचें तिकडे लक्ष जाईल तो सुदिन !

अष्टविनायकांचीं क्षेत्रें इतकीं प्रसिद्ध असतांना त्यांच्याविषयीं माहिती देणारें एकहि संकलित अशा स्वरूपांतील पुस्तक आजपर्यंत प्रसिद्ध झाल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. म्हणून हें पुस्तक मुद्दाम प्रसिद्ध करीत आहों. यांत प्रत्येक क्षेत्राचें भौगोलिक वर्णन व स्थानिक माहिती दिली असून त्या क्षेत्राविषयीं पौराणिक कथानकहि दिलें आहे. पुस्तकाच्या शेवटीं एक परिशिष्ट जोडलें असून त्यांत प्रत्येक क्षेत्रांस जाण्याचा मार्ग वगैरे माहिती दिलेली आहे. या माहितीचा यात्रेकरूंना चांगला उपयोग होईल अशी अपेक्षा आहे.

हें पुस्तक लिहितांना मला पंडित सातवळेकर यांचा गणेश अंक, श्री. वेहेरे यांचें मंगलमूर्ति गणेश हें पुस्तक, अंकुश मासिक, दामोदर सावळाराम यंदे यांचें गणेशपुराण आणि कै. प्रो. भानु यांचें मुद्गलपुराण या ग्रंथांचा मधून मधून थोडाफार उपयोग झाला आहे. त्या ग्रंथकारांचा मी ऋणी आहें.


माझ्या वयाला ८८ वर्षे चालू असतांना मीं हें पुस्तक लिहावें असा श्रीगणेशाचा संकेत असावा असें वाटतें. आयुष्याचा अस्ताचल समोर दिसत असतांना पुस्तकरूपानें श्रींची सेवा घडत आहे हें पाहून मनाला आनंद होत आहे. पुस्तक अत्यंत अल्प अवकाशांत 'आनंद' कार्यालयानें नीटनेटकें छापलें यामुळें माझा आनंद द्विगुणित झाला आहे.या कामीं श्री. दादासाहेब जोशी यांनीं दर्शविलेला उत्साह अनुपमेय असा होता. प्रस्तुत पुस्तक हें त्याचेंच फळ होय. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच ! शेवटीं त्या अष्टविनायकांना ही अल्पसेवा अर्पण करून हें छोटें निवेदन संपवितों.

२, नारायण पेठ, पुणें २
दि. ५–७–१९६२ — द. म. खेर
आषाढ शु. ४ शके १८८४

# अनुक्रम


| | |
|---|---|
| १. मोरगांवचा मयूरेश्वर | ९ |
| २. सिद्धटेकचा सिद्धीविनायक | २८ |
| ३. पालीचा बल्लाळेश्वर | ४० |
| ४. महडचा वरदविनायक | ५१ |
| ५. थेऊरचा चिंतामणि | ६३ |
| ६. लेण्याद्रीचा गिरिजात्मज गणपति | ७७ |
| ७. विघ्नहर–ओझर | ९६ |
| ८. रांजणगांवचा गणपति | १०६ |


* * *




अष्टविनायकांचीं भौगोलिक स्थानें



ग्रंथ संग्रहालय

# १. मोरगांवचा मयूरेश्वर

मोरगांवचा मयूरेश्वर हें गाणपत्त्यांचें आद्यदैवत. गणपतिभक्तांचा हा काशीविश्वेश्वर ! पुण्यापासून सासवड जेजुरी मार्गानें मोरगांव सुमारें ४० मैल आहे.

भाविकांच्या भक्तींत ज्याप्रमाणें हें स्थान अग्रगण्य आहे, त्याचप्रमाणें सौन्दर्यदृष्टीनेंहि या स्थानाला अग्रक्रम द्यावा लागेल.

दर्शनी देऊळ उत्तराभिमुखीं असून विलक्षण प्रेक्षणीय आहे. या भव्य देवालयाच्या अकरा दगडी पायऱ्या चढून गेल्यावर प्रथम प्रचंड नंदी तुमचें स्वागत करतो. या नंदीसाठीं मुस्लीम धर्तीचें खास घर बांधण्यांत आलें आहे. त्यानंतर एक प्रचंड कासव तुमची वाट बघत असलेलें तुम्हांला दिसेल.

या भव्य दगडी देवळांत प्रवेश केला म्हणजे एक मोठा चौक

लागतो. या चौकांत दर्शनी बाजूस संगमरवरी फरशी आहे. याच चौकांत दोन प्रचंड दगडी दीपमाळा आहेत. एका दीपमाळेवर लहान घोडा आहे तर दुसरीवर लहान दगडी हत्ती आहे. या चौकांतच देवाकडे तोंड असलेली उंदराची दक्षिणाभिमुखी मूर्ति आहे. या मूषक मूर्तीसमोर एक छोटेसें कासव आहे. देवळांत प्रवेश करतांच उजवीकडे व डावीकडे पूर्वाभिमुखी व पश्चिमाभिमुखी असे दोन दगडी हत्ती आहेत. त्यांपैकीं उजवीकडील हत्ती मोठा असून डावीकडचा त्या मानानें लहान आहे.

देवळाला अत्यंत भव्य असें प्रवेशद्वार आहे. देवळांत प्रवेश केल्या-वर चौक ओलांडल्यानंतर जो प्रमुख सभामंडप लागतो त्याला दोन मोठे दरवाजे आहेत. देवळाच्या प्रवेशद्वारावर चार बारीक कळस आहेत. ते देवळाच्या शोभेंत फारच भर टाकतात. त्याचप्रमाणें देवळावर तीन दर्शनी कमानी आहेत. मधल्या कमानीवर ध्यानस्थ ऋषीची मूर्ति दिसते. देवळांत पूर्व बाजूला दक्षिणाभिमुखी नग्नभैरवाची मूर्ति आहे. असें सांगतात कीं, या मूर्तीला मायेचा कसलाहि पाश नाहीं. ब्रम्हा, विष्णु व महेश या देवांचीं कामें बरोबर चाललीं आहेत कीं नाहींत हें पहात, ही मूर्ति येथें उभी आहे. देवळाच्या दगडी फरसबंदीच्या चौकांतच चारी बाजूंना चार द्वारें आहेत. पूर्वद्वार उमामहेशाचें, तें दैवत तीन मैलांवर आहे. चार मैल अंतरावर असलेलें दक्षिणद्वार हें रमा-रमेशाचें आहे. पश्चिमद्वार हें महीवराचें. तें नऊ मैल लांब आहे. चौथें रतिमदनाचें उत्तरद्वार, हेंहि नऊ मैल लांब आहे. हीं चार द्वारदैवतें आहेत. यात्रेकरू या दैवतांची भक्तिभावानें पूजा करतात.

याच आवारांत पूर्व दिशेला शमीचें व बेलाचें झाड आहे. पश्चिमेला कल्पवृक्ष आहे. मनांत संकल्पिलेलें देणारा असा हा कल्पवृक्ष आहे. भाविक लोक याच वृक्षाखालीं बसून अनुष्ठान करतात आणि त्यांना जें

३१६८ 23.11

हवें असेल तें मागून घेतात. याच वृक्षाखालीं बसून महान् गणपतिभक्त चिंचवडचे मोरया गोसावी यांनीं अनुष्ठान केलें.

देवालयाच्या बाहेर दुमजली इमारत आहे. त्या ठिकाणीं नगारखाना आहे. त्या ठिकाणापासून मयूरेश्वराच्या मूर्तीचें बरोबर दर्शन घडतें. देवळाची तटबंदी फारच भव्य आहे. चारी बाजूच्या भिंती सात साडेसात पुरुष म्हणजे अदमासे ५० फूट उंचीच्या आहेत. निम्मी तटबंदी दगडी आणि निम्मी विटांची आहे. देवळांत जिकडे दृष्टि जाईल तिकडे लंबोदर, वक्रतुंड, विकट, विघ्नराज, धूम्रवर्ण, विघ्नेश, एकदंत अशीं विनायकाचीं अनेक प्रतीकें दिसतात.

प्रत्यक्ष देवालयाच्या गाभाऱ्यांत गेल्यानंतर मयूरेश्वराच्या मूर्तीचें जें दर्शन घडतें तें फारच विलोभनीय आहे. डोळ्यांत व बेंबींत हिरे असलेली मोठी डौलदार व रेखीव आणि भव्य मूर्ती उत्कृष्ट मखरांत विराजमान झालेली आहे. मूर्तिच्या मस्तकावर नागराजाची फणा आहे; पण मूर्तीच्या मानानें ती बरीच बारीक वाटते. मूर्तीच्या डाव्या व उजव्या बाजूला सिद्धिबुद्धीच्या पितळी उभ्या सुट्या मूर्ती आहेत.

## पौराणिक कथा

फार प्राचीन काळांत मिथिल देशामध्यें गंडकी नांवाच्या नगरींत महापराक्रमी आणि पुण्यवान् असा चक्रपाणि नांवाचा राजा होऊन गेला. त्याला संतति नसल्यामुळें ती होण्याकरितां त्यानें अनेक उपाय केले, पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. म्हणून एके दिवशीं त्यानें आपल्या प्रधानांस व प्रजेस बोलाविलें आणि त्यांना तो म्हणाला, “ मला संतति नसल्यामुळें आतां मी वनवास पत्करणार आणि उर्वरित आयुष्याचें सार्थक करणार. ” याप्रमाणें चक्रपाणि राजा बोलत आहे इतक्यांत

शौनक नांवाचा ऋषि तेथें आला. राजानें त्याची पूजा केली. तेव्हां शौनक म्हणाला, "राजा, तुला पुत्र नाहीं यामुळें तुला खेद होत आहे हें मला माहीत आहे. तुझ्या नुसत्या सत्कारानेंच मला आनंद झाला आहे. माझ्या आशीर्वादानें तुला उत्तम पुत्र होईल." शौनकानें राजाला सूर्याची उपासना करण्यास सांगितलें. त्या व्रताच्या आचरणानें चक्रपाणीला पुत्र झाला. त्याचें नांव सिंधु.

सिंधूला शुक्राचार्यानें एक मंत्र दिला. त्यानें आपल्या पित्याला सांगितलें कीं, "मला तपश्चर्येला जाण्याची परवानगी द्या. मी वर प्राप्त करून घेऊन त्रिभुवनाचें राज्य जिंकणार आहे."

पित्याच्या परवानगीनें सिंधु घर सोडून एका अरण्यांत गेला आणि तेथें सूर्याकडे दृष्टि लावून त्यानें मंत्रजपाचें अनुष्ठान केलें. त्याच्या खडतर तपश्चर्येनें सूर्यनारायण त्याच्यावर प्रसन्न झाला आणि तो सिंधूपुढें प्रत्यक्ष उभा राहिला. सूर्य त्याला म्हणाला, "तुझ्या तपानें मी संतुष्ट झालों आहें. तुला जो वर मागायचा असेल तो माग."

सिंधु सूर्याला म्हणाला, "तूं जर मला वर देणार आहेस तर मला अमरत्व दे."

सूर्य त्याला म्हणाला, "तूं अमरत्व मागतोस, पण जो जन्माला आला त्याला मृत्यु हा येणारच. तरी पण तुला देव, मनुष्य, श्वापदें, नाग यांच्यापासून, किंवा दिवसा, रात्रीं, पहाटें, संध्याकाळीं इतक्या वेळीं मृत्यु येणार नाहीं. मी आतां तुला अमृताचें जेवण देतों. तूं तें जोंपर्यंत आपल्या उदरांत धारण करशील तोंपर्यंत तुला मरण येणार नाहीं."

याप्रमाणें वर देऊन सूर्य गुप्त झाला आणि सिंधु आपलें अनुष्ठान संपवून परत आला.

आपला पुत्र बुद्धिमान असून त्याला सूर्यापासून वरप्राप्ति झाली आहे हें पाहून सिंधूच्या पित्यानें आपलें सर्व राज्य त्याच्या स्वाधीन केलें,

आणि तो वनांत निघून गेला. राज्यप्राप्ति झाल्यावर सिंधूनें आपल्या सैन्याची जमवाजमव केली आणि तो दिग्विजयाला निघाला. आपल्या पराक्रमानें त्यानें सर्व पृथ्वी जिंकली. त्याचा पराक्रम पाहून अनेक दैत्य त्याच्या नोकरींत राहिले. सिंधूनें त्यांचा सत्कार करून त्यांना नोकरींत ठेवलें. नंतर इंद्रलोक, विष्णुलोक, ब्रह्मलोक इत्यादि जिंकण्याचा विचार करून तो इंद्राच्या अमरावतीवर चालून गेला. इंद्रपुरीजवळ जातांच सर्व राक्षस एकदम त्या नगरींत घुसले आणि त्यांनीं लुटालूट करण्याला प्रारंभ केला. इंद्राला हें वर्तमान समजतांच तो आपल्या ऐरावतावर बसून सिंधुदैत्याबरोबर युद्ध करण्यासाठीं गेला. सिंधूनें ऐरावताचे दांत धरले आणि ते हातांनीं वाकडे केल्यावरोबर ऐरावत जमिनीवर कोसळला. सिंधूनें इंद्राचे दोन्ही पाय धरून त्याला गरगर फिरविलें. हा आतां आपल्याला खालीं आपटणार असें इंद्राच्या ध्यानांत येतांच त्यानें सूक्ष्मरूप धारण केलें आणि तो सिंधूच्या हातांतून निसटला आणि देवांसह विष्णूकडे धावत जाऊन त्यानें सर्व वर्तमान विष्णूला सांगितलें.

हें वर्तमान कळतांच विष्णु गरुडावर आरोहण करून अमरावतीस आला. गरुडावर बसलेला एक देव आपल्या अनुयायांसह युद्धाला येत आहे हें वर्तमान अमरावतींतील दैत्यांस कळतांच ते तत्क्षणीं युद्धाला सिद्ध झाले. दैत्यांच्या पहिल्या धडाक्याबरोबरच देवांची तारांबळ उडाली व ते समरांगणांतून पळून गेले. तेव्हां विष्णु पुढें सरकला. त्यानें राक्षसांच्या सैन्यावर आपल्या सुदर्शनचक्राचा प्रयोग केला. त्यामुळें राक्षससैन्याचा बराच नाश झाला. विष्णूनें केलेला विध्वंस पाहून चंडमुंडादि बरेच राक्षस एकदम विष्णूवर धावून गेले. विष्णूच्या समोर जो राक्षस येईल त्याच्या अंगावर त्यानें गदाप्रहार सुरू केले. तेव्हां दैत्यसैन्य माघार घेऊं लागलें. हें पाहून सिंधु त्वेषानें देवसेनेंत शिरला.

सिंधूनें प्रथम इंद्राला थप्पड मारून खालीं पाडलें. कुबेर, वरुण, यम

इत्यादिकांची तीच अवस्था केली; विष्णूचें सुदर्शनचक्र आपल्या चक्रानें हाणून पाडलें. विष्णूनें सिंधूच्या डोक्यावर गदाप्रहार केला. सिंधूनें ती गदा आपल्या दातांनीं चावून तिचे तुकडे केले. सिंधूचा पराक्रम पाहून विष्णु त्याला म्हणाला, "तुझ्या पराक्रमानें मी संतुष्ट झालों आहे, या साठीं तुला जो वर मागायचा असेल तो मागून घे."

तेव्हां सिंधु म्हणाला, "तूं वर देणार असशील तर तूं युद्ध बंद करून माझ्या गंडकी नांवाच्या नगरींत येऊन रहा." विष्णूनें तें मान्य केलें.

विष्णूला अशा प्रकारें वश करून घेतल्यावर सिंधूनें सत्यलोकाकडे आणि कैलासाकडे आपला मोर्चा वळविला, व त्यांच्यावर राज्य करण्यासाठीं आपले अधिकारी पाठविले. त्यानें विष्णूला आणि इंद्राला आपल्याबरोबर गंडकी नगरींत आणलें. विष्णूनें शहर सोडून बाहेर जाऊं नये अशी त्यास ताकीद दिली आणि त्याच्यावर नजर ठेवण्यासाठीं दैत्यांची नेमणूक केली. नंतर सिंधूनें आपले दूत पृथ्वीवर पाठविले आणि लोकांना अशी आज्ञा केली कीं, "आजपासून देव, ब्राह्मण आणि गायी यांची पूजा कोणी करूं नये; त्यांनीं आपली पूजा करावी."

सर्वांनीं सिंधूची पूजा करावी अशी त्याची आज्ञा झाल्यावर त्याच्या नजरकैदेंत असलेल्या देवांनीं साधकबाधक विचार करून आपल्या इच्छापूर्तीसाठीं ईश्वराची आराधना करण्याचें ठरविलें. "ईश्वर" ही संज्ञा फक्त विनायकालाच लागूं असल्यानें त्यांनीं विनायकाची मृण्मय मूर्ति तयार करून तिची मंडपांत स्थापना केली, आणि भक्तिपूर्वक तिची पूजा केली. विनायक प्रकट झाला आणि म्हणाला, "तुम्हांला तूर्त सिंधुदैत्य उपद्रव देत आहे हें माझ्या लक्षांत आहे. त्याचा नाश करून धर्मस्थापना करण्यासाठीं मी लवकरच मयूरेश्वर या नांवानें पार्वतीच्या उदरीं अवतार धारण करणार आहें. कृतयुगांत मला विनायक असें म्हणतात. त्रेतायुगांत मी मयूरेश्वर हें नांव धारण करतों. द्वापारयुगांत मला गजानन

म्हणतील आणि कलियुगांत माझें नांव धूम्रवर्ण असें असेल."

सिंधु दैत्याच्या त्रासामुळें शंकरांनीं कैलास सोडला आणि ते मेरूपर्वतावर रहावयास गेले. यज्ञयागादि कर्मे बंद केल्यामुळें गौतम, अत्रि, भरद्वाज, विश्वामित्र, वसिष्ठ वगैरे ऋषीहि पूर्वीच तिकडे गेले होते. नंतर गिरिजेसह तेथें आनंदानें वास करीत असतां, एके दिवशीं पार्वतीनें शंकरांना प्रश्न केला, "पतिराया, आपण सर्व देवांमध्यें श्रेष्ठ म्हणून आपणांस महादेव म्हणतात. असें असून आपण नेहमीं कोणाची भक्ति करीत असतां ?"

शंकर म्हणाले, "हा तुझा प्रश्न लोकांचें कल्याण करणारा आहे. सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण जो आपल्या स्वाधीन करतो त्याला गुणेश म्हणतात. त्या परमात्म्याचें म्हणजे परब्रह्माचें मी ध्यान करीत असतो. तूं त्या स्वरूपाचें जोंपर्यंत ध्यान करणार नाहींस तोंपर्यंत तुला त्याचें यथार्थ ज्ञान होणार नाहीं. यास्तव मी आतां तुला त्याच्या प्राप्तीसाठीं एकाक्षर मंत्र सांगतों. या मंत्राचा तूं एकचित्तानें बारा वर्षे जप केलास म्हणजे तुला त्याच्या स्वरूपाचें ज्ञान होईल."

असें सांगून शंकरांनीं पार्वतीला एकाक्षर मंत्राचा उपदेश केला. याप्रमाणें उपदेश घेतल्यावर पार्वतीनें बारा वर्षे तपश्चर्या केली. ती झाल्यावर गजाननानें तिला दर्शन दिलें आणि वर मागण्यास सांगितलें. तेव्हां ती म्हणाली कीं, "तूं माझा पुत्र होऊन माझ्याजवळ रहावेस."

गजाननानें तिला तिच्या इच्छेप्रमाणें वर दिला आणि तो अंतर्धान पावला. नंतर हा सर्व वृत्तान्त तिनें शंकराला निवेदन केला. तेव्हां शंकर म्हणाले, "गिरिजे, आतां तो परमात्मा खचित तुझ्या घरीं अवतार धारण करील आणि भूमीचा उद्धार करील."

एकदां पार्वतीनें भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशीं गजाननाची मृत्तिकेची मूर्ति केली आणि तिची यथाविधि पूजा केली तोंच ती मूर्ति

सजीव होऊन पार्वतीपुढें उभी राहिली. नंतर तो बालक तिला म्हणाला, " पार्वती, रात्रंदिवस तूं ज्याचें चिंतन करीत होतीस तोच मी गुणांचा ईश, परमात्मा अवतीर्ण झालों आहें. सिंधु दैत्याच्या वधासाठीं मीं हा अवतार घेतला आहे. "

हें त्या बालकाचें भाषण ऐकून पार्वतीला पान्हा फुटला आणि तिनें त्याला उचलून घेतलें.

पुत्रप्राप्तीचें हें वृत्त ऐकून शंकरांना अत्यानंद झाला. त्यांनीं ऋषींना बोलाविलें, आणि त्यांच्याकडून मुलाचें जातक वर्तविलें. त्याच्या कुंडलींत पांच शुभग्रह असल्यामुळें हा पुत्र महापराक्रमी होईल असें ऋषींनीं सांगितलें. देवांनीं त्याचें नांव गणेश असें ठेवलें.

सिंधूला त्याच्या दूतांनीं गणेशजन्माचें वर्तमान सांगितलें, तोंच आकाशवाणी झाली कीं, " अरे सिंधो, तुझा वध करणारा कोठेंतरी जन्माला आला आहे. "

ही आकाशवाणी ऐकून सिंधूनें आपल्या शत्रूचा वध करण्याची आज्ञा केली तेव्हां कित्येक दैत्य मेरुपर्वतावर त्रिसंध्य आश्रमांत आले. त्याचा वध करावयास गेलेले असंख्य राक्षस गणेशानें आपल्या बालवयांत मारले. त्याला दैत्य पीडा देतात म्हणून पार्वतीच्या इच्छेप्रमाणें मांडव्य ऋषींनीं गणेशकवचाचा जप करून त्याची राखण गणेशाच्या गळ्यांत बांधली. गणेशाचा व्रतबंध होण्याच्या आंत त्यानें गृध्र-दैत्य, व्योमासुर, त्याची बहीण शतमहिषा, मंचकासुर, दुंदुभि, अजगर, शलभासुर, व्योमासुर, मेघासुर, कुटासुर, कर्दमासुर इत्यादि अनेक राक्षसांचा संहार केला.

मौंजीबंधन झाल्यावरहि त्याच्या हातून दैत्यांचा नाश चाललाच होता. त्याच सुमारास गणेशाला मयूरवाहन प्राप्त झालें. नंतर तो पाताळांत गेला आणि तेथें त्यानें कश्यपाची पत्नी आणि गरुडाची माता जी

विनता तिच्या पुत्रांची बंदिवासांतून सुटका केली.

गणेश दहा वर्षांचा झाला तेव्हा गौतमादि ऋषि शंकराकडे येऊन त्याला म्हणाले, "देवा, तुला हा पुत्र झाल्यापासून येथें राक्षसांचा उपद्रव सारखा चालू आहे. यास्तव आपण हें ठिकाण सोडून दुसरीकडे कोठें तरी सुरक्षित स्थळीं जावें हें बरें, असें आम्हांला वाटतें." तें ऐकून पार्वती व शंकर गणेशाला बरोबर घेऊन सात कोटि गणांसह मेरुपर्वत सोडून निघाले. परन्तु तितक्यांत कलासुर नांवाचा राक्षस बारा कोटि सैन्य बरोबर घेऊन येत आहे असें वर्तमान शंकराला समजलें. हें ऐकून गणेश पुढें आला आणि त्यानें आपल्या अंगांतून असंख्य सेना निर्माण केली. तिनें दैत्यसैन्याचा मोड केला. आपल्या सैन्यानें माघार घेतलेली पाहून कमलासुर स्वतः युद्धासाठीं पुढें आला.

कमलासुर घोड्यावर बसून व गणेश मोरावर बसून समरभूमीवर आले. त्या उभयतांचें बराच वेळ युद्ध झालें. कमलासुर गणेशावर बाणांची वृष्टि करूं लागला. गणेशानें आपला पाश नेमका त्या असुराच्या मानेवर टाकला. कमलासुर विव्हळ झाला. सावध झाल्यावर गणेश त्याला म्हणाला, "मूर्खा, एखाद्या पिशाच्चानें झपाटल्याप्रमाणें उन्मत्त होऊन व्यर्थ श्रम कशाला करतोस?"

हें ऐकून कमलासुरानें क्रोधाविष्ट होऊन गणेशावर जोरानें बाणांची वृष्टि सुरू केली. तेव्हां अशानें हा वधत नाहीं असें जाणून गणेशानें मायाबलानें हजारों रूपें धारण केलीं आणि सिद्धिबुद्धीचें स्मरण केलें, त्याबरोबर त्या त्याच्याजवळ आल्या. तेव्हां कमलासुराच्या रक्तांतून उत्पन्न झालेल्या राक्षसांना खाऊन टाकण्याची गणेशानें त्यांना आज्ञा केली. त्यांनींहि सर्व दैत्यांना खाऊन त्यांचा फन्ना उडविला. इतक्यांत गणेशानें आपला त्रिशूळ कमलासुरावर जोरानें फेकला, आणि त्या दैत्याचे दोन तुकडे केले. नंतर विश्वकर्मा तेथें आला आणि त्यानें तेथें

नगर वसवून एक देवालय बांधलें. त्याचें त्यानें ' मयूरेश्वर ' असें नांव ठेवलें.

पुढें येथेंच गणेशानें ब्रह्मदेवाचें आणि इंद्राचें गर्वहरण केलें, व यमाचा पराभव केला. हा कथाभाग लेण्याद्रि येथील गिरिजात्मजाच्या कथेंत पुढें येणार आहे.

यानंतर गणेशानें सिंधु दैत्याबरोबर युद्ध केलें. त्याच्या अगोदर गणेशानें नंदीला शिष्टाईसाठीं सिंधु दैत्याकडे पाठविलें होतें. उन्मत्त झालेल्या त्या दैत्यापुढें त्या शिष्टाईचा तिळमात्र उपयोग झाला नाहीं.

शिष्टाईच्या दुसऱ्या दिवशीं प्रथम नंदी, वीरभद्र, भृंगी, भूतराज, पुष्पदंत वगैरे गण आपलें सैन्य घेऊन गंडकी नगरीपाशीं आले. तिकडून राक्षसांचें सैन्यहि आलें. युद्धाला सुरुवात झाली तेव्हां शिवसैन्यानें अगणित राक्षसांना यमसदनाला पाठवून दिलें. ही वार्ता सिंधूला समजली तेव्हां तो स्वतः घोड्यावर स्वार होऊन समरांगणावर आला.

समुद्रासारखें पसरलेलें दैत्यांचें सैन्य गणेशानें अवलोकन केलें. तो मयूरावर आरूढ झाला. असंख्य गणांसह शंकर युद्धाला तयार होतेच. पण नंदीनें चलाखी करून सिंधूच्या घोड्याच्या पोटांत आपलीं शिंगें खुपसून त्याला जर्जर केलें. त्यावेळीं सिंधूनें आपल्या सैनिकांची निर्भर्त्सना केली. नंतर त्याचे कौतुभ आणि मैत्र असे दोन प्रधान मोठ्या अभिमानानें पुढें सरसावले. पण वीरभद्र आणि कार्तिकेय यांनीं आपल्या पराक्रमानें त्यांना लोळविलें. हें पाहून सिंधूच्या क्रोधाचा पारा चढला.

नंतर सिंधु युद्धभूमीवर आला. त्याच्या सात योद्ध्यांनीं सात व्यूह रचले. तेव्हां शिवसैन्यांतील सात योद्धे त्या व्यूहांचा भेद करूं लागले. त्यावेळीं उभय सैन्यांचें तुंबळ युद्ध झालें. राक्षसांनीं शिवगणांवर पर्वत फेकले पण शिवगणांनीं आपल्या बाणांनीं त्यांना परतवून ते पर्वत राक्षसांच्या सैन्यावरच पाडले. अशा प्रकारें गणांनीं राक्षसांच्या सैन्याचा धुव्वा उडविला. देवांचा जय झाला. त्यांनीं वाद्यें वाजवून मयूरेशाच्या नांवाचा

त्रिवार जयघोष केला.

आपल्या सैन्याची वाताहात झालेली पाहून सिंधूनें अत्यंत द्वेषानें देव-सेनेवर चाल केली आणि त्यानें अनेक सैनिकांना जखमी केलें. तेव्हां गणेशानें त्याच्या अंगावर आपला परशु फेकला. त्यामुळें सिंधूचा एक हात तुटला. तेव्हां सिंधु दुसऱ्या हातांत तलवार घेऊन गणेशावर धावून गेला. परंतु त्याला जिकडे तिकडे गणेशच दिसूं लागले. तेव्हां तो भांबावला. त्यानें युद्धभूमींतून पळ काढला आणि तो आपल्या नगरांत चालता झाला.

गोष्टी इतक्या थराला गेल्या तरी त्या उन्मत्त दैत्याची युद्धाची खुमखुमी जिरली नाही. त्याच्या पत्नीनें त्याला "गणेशाला शरण जा आणि देव-ब्राह्मण आणि गायी यांचा छळ करूं नका" म्हणून उपदेश केला. पण तो त्याला रुचला नाहीं.

नंतर सिंधूनें स्वतः तिकडे रणभूमीवर न जातां आपलें सैन्य धाडलें. कल आणि विकल नांवाचे आपले मेहुणे यांस मोठ्या राक्षससेनेसह युद्धाला पाठविलें. त्यांच्याबरोबर नंदी आणि पुष्पदंत हे युद्धाला तयार झाले. युद्ध जुंपल्यावर नंदी चवताळून राक्षस सैन्यांत घुसला आणि त्यानें आपल्या पायांनीं, शिंगांनीं आणि शेपटानें हजारों दैत्यांचा प्राण घेतला. नंतर कलानें नंदीला पाशानें बांधलें. तेव्हां कार्तिकेयानें आपल्या अपूर्व पराक्रमानें कलाचा प्राण घेतला. वीरभद्रानें कार्तिकेयाला साहाय्य केलें. अशा रीतीनें नंदीची सुटका झाली. नंतर वीरभद्रानें विकलाला ठार मारलें आणि सर्व राक्षससेनेचा संहार चालविला. यामुळें दैत्यांची पळापळ झाली.

कल आणि विकल यांच्या वधामुळें सिंधूला दुःख झालें. तेव्हां सिंधूचे पुत्र धर्म आणि अधर्म हे युद्धासाठीं पुढें आले. ते बापाला म्हणाले, "आम्हांला आज्ञा द्या; आम्ही आज शत्रूचें मस्तक कापून आणूं."

अशी प्रतिज्ञा करून ते पुष्कळ सैन्य घेऊन युद्धाला गेले. या वेळीं कार्तिकेय दैत्यसैन्यांत शिरला व त्यानें पुष्कळ राक्षसांना यमलोकीं धाडून

दिलें. कार्तिकेयानें आपल्या सैन्याचा संहार चालविला आहे हें पाहून धर्म आणि अधर्म हे पुढें सरसावले आणि त्यांनीं मोठ्या निकरानें युद्ध सुरू केलें. परंतु शेवटीं कार्तिकेयानें एका बाजूच्या सहा हातांनीं धर्माची व दुसऱ्या बाजूच्या सहा हातांनीं अधर्माची शेंडी धरून त्यांना गरगर फिरविलें आणि त्यांना जोरानें आपटून त्यांच्या शतशः चिंधड्या केल्या. हें पाहून राक्षसांचें सैन्य रणभूमि सोडून पळत सुटलें आणि देवसैन्यानें गणेशाच्या नांवाचा जयघोष केला.

पुत्रांच्या मृत्यूचें वर्तमान ऐकतांच सिंधुदैत्य सिंहासनावरून खालीं पडला आणि त्याच्या पत्नीनें अनिवार शोक केला. ब्रह्मदेवासुद्धां जन्मलेल्या सर्व प्राण्यांना अखेर मरण हें आहेच; फक्त हनुमान, कृपाचार्य, व्यास, परशुराम, बिभीषण, अश्वत्थामा आणि बली हेच काय ते आपल्या सत्कर्मामुळें चिरंजीव आहेत, यास्तव आपलें सांत्वन करून घ्या असें आसपासच्या परिजनांनीं विनविल्यावर दुर्गा सावध झाली. सिंधूचा पिता चक्रपाणि यानें सिंधूला, " तूं देवांना मुक्त कर म्हणजे तुझी आणि मयूरेशाची मैत्री होईल, आणि तुझें कल्याण होईल. " वगैरे पुष्कळ उपदेश केला. पण अखेरीस पुत्रांच्या वधाचा सूड उगविण्यासाठीं सिंधु घोड्यावर बसून युद्धभूमीवर पुनरपि जाण्यास निघाला.

सिंधु स्वतः युद्धाला येत आहे असें समजतांच गणेश आपलें सैन्य घेऊन समरांगणावर आला. त्या सैन्याचें अधिपत्य कार्तिकेयानें केलें होतें. त्यावेळीं पुष्पदंत, नंदी, शृङ्गी, भृंगी यांनीं अगणित राक्षसांचा फडशा उडविला. अखेरीस सिंधु मोठ्यानें गर्जना करून पुढें आला आणि त्यानें लगेच अग्न्यस्त्राचा प्रयोग केला. तेव्हां शिवगण गणेशापाशीं आले आणि ' आमचें रक्षण कर ' असें ओरडूं लागले. तत्क्षणींच गजाननानें शंकराचें स्मरण केलें, आणि आपल्या परशूवर कृतान्ताचा प्रयोग केला. त्याबरोबर एक पुरुष उत्पन्न झाला आणि त्यानें अग्नीला

धबधब्याखालीं देऊळ असून त्या देवळांत गणेशाची मूर्ति आहे, त्या ठिकाणीं चार समया तेवत आहेत. तो परीट आंत असतांना त्याला रोज पंचपक्वान्नांचें जेवण मिळत असे. त्यानें ही हकीगत बाहेर सांगू नये असें त्याला तेथें बजावण्यांत आलें, पण त्यानें ती हकीगत बाहेर फोडली. त्यामुळें तो परीट तत्काळ गतप्राण झाला. तो परीट तिकडे असतांना तो मेला असें समजून त्याचा तेरावा दिवसहि घालण्यांत आला होता. पण तेरा दिवसांनीं तो परत आला. परंतु तेथील हकीगत बाहेर फोडल्यामुळें तो लगेच गतप्राण झाला.

दुसरीहि एक आख्यायिका सांगतात. एकदा दुपारीं बाराच्या सुमारास या धबधब्यावर बैल धुण्यासाठीं नेत असतांना तो बैल बुडाला. तो वर आला तेव्हां त्याच्या कानांत राख भरून आली होती. आल्यावर तो बैल गतप्राण झाला.

हा धबधबा अविरत पडत आहे. धबधब्यावर म्हसोबाचें देवस्थान आहे. धबधब्यावर दोन कुंडें आहेत. त्यांच्यांतूनच पाणी खालीं पडत आहे. तीं कुंडें आतां फक्त कंबरेइतकी खोल आहेत. हा धबधबा ज्या ठिकाणीं पडतो त्या ठिकाणीं पाण्याला अंत नाहीं. या ठिकाणीं मासे खूप आहेत. मासे धरण्यासाठीं बरेच हौशी लोक या ठिकाणीं येतात.

या ठिकाणीं पार्श्वऋषींनीं तपश्चर्या केली. विघ्नहर प्रसन्न झाले. त्यांनीं पार्श्वऋषींना विचारलें, “ काय हवें आहे ? ” ऋषि म्हणाले, “ धन नको, दौलत नको. विघ्नासुर त्रास देत आहे, त्याचा फक्त बंदोबस्त करा. ” गणपतिरायांनीं या विघ्नासुराचा बंदोबस्त केला व या ठिकाणीं ते विघ्नहर होऊन राहिले.

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ...३३८१४ ... वि: ...
क्रमांक ...३२६ ... नों: दि: २३...

## मुद्गल पुराणांतील दोन कथा

एकदां नारद इंद्रलोकाला गेला, आणि त्यानें इंद्राला सांगितलें कीं

" हिमालय पर्वतावर अभिनंदन या नांवाचा राजा एक यज्ञ करणार आहे. त्या यज्ञांत तुला हविर्भाग देण्याची इच्छा त्याच्या मनांत नाहीं. असा यज्ञ करणारे पुष्कळ ब्राह्मण त्यानें जबरदस्तीनें मिळविले आहेत. त्या यज्ञाला आज–उद्या सुरुवात होणार आहे. "

हें ऐकून इन्द्र फार रागावला आणि त्यानें कालाचें स्मरण केलें. तत्काळ काळ इन्द्रापुढें हजर झाला. नंतर इन्द्रानें काळाला त्या यज्ञाविषयीं वृत्तान्त सांगून त्याला आज्ञा केली कीं, " तूं जाऊन या यज्ञाचा नाश कर. सर्व जग तुझ्या स्वाधीन आहे. यामुळें तुला ही गोष्ट करणें सोपें आहे. "

काळानें इन्द्राची आज्ञा मान्य केली आणि विघ्नासुराचें स्वरूप घेऊन तो अभिनंदनाच्या यज्ञमंडपांत गेला आणि त्यानें यज्ञाचा विध्वंस केला. इतकेंच नाहीं तर त्यानें कर्मभूमीवरील सर्व वैदिक कर्माचा लोप केला. कर्मलोप झाला म्हणजे देवांना संकट पडतें. अर्थात् विघ्नासुरानें यज्ञविध्वंस केल्यामुळें देवांना ह्याहि वेळीं संकट पडलें. तेव्हां त्यांनीं तप करून, स्तोत्रें म्हणून व ध्यान करून मोठ्या भक्तीनें गणपतीला प्रसन्न करून घेतलें. नंतर देवकार्य करण्यासाठीं परमेश्वर पार्श्वपुत्र झाला. या पार्श्वाच्या पत्नीचें नांव दीपवत्सला असें होतें. त्या दोघांची तपश्चर्या विलक्षण होती. म्हणून त्यांच्या उदरीं हा अवतार झाला. हा बालक पांच वर्षांचा झाल्यावर शंकर आदि सर्व देव पार्श्वाच्या घरीं जाऊन त्यांनीं त्याचें अभिनंदन केलें. " विघ्नासुराला मारावयाचें आहे आणि तुझ्या पुत्राच्या हातून त्याचा वध व्हावयाचा आहे म्हणून तुझ्या पुत्राला युद्धाला जाण्याची आज्ञा दे " असें देवांनीं पार्श्वाला सांगितलें. हें ऐकून पार्श्वाला गहिंवर आला, दुःख झालें, आणि संतापहि आला." माझ्या बाळाला नेऊं नका " असें पार्श्व म्हणतांच गणपति तेथें आला आणि त्यानें वडिलांची समजूत घालून देवांचें म्हणणें मान्य केलें. नंतर गणपतीनें विघ्नासुराला आपल्या अंकुशानें पकडून त्याला देवांसमोर ओढीत आणलें. विघ्नासुर मायावी होता. त्यानें

अग्नि इत्यादि महाभूतांचीं रूपें धारण केलीं. तथापि गजानन हा स्वतः मायाधीश, आणि राक्षसाच्या मायेचा अधिपति असल्यानें त्यानेंहि अग्नि, वायु, आकाश, महाकाल, अहंकार अशा तऱ्हेचीं श्रेष्ठ, श्रेष्ठतर स्वरूपें धारण करून विघ्नस्वरूपांचा नाश केला. अखेरीस आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून विघ्नासुर गणपतीला शरण आला. त्यानें भक्तिपूर्वक गणपतीचें स्तवन केलें, आणि "मी आपली आज्ञा सदैव पाळीत जाईन" असें गणपतीला वचन दिलें. विघ्नासुर आणखी गणपतीला म्हणाला, "आपल्या चरणकमळीं माझी अखंड भक्ति असावी आणि माझें नांव आपण धारण करावें एवढेंच माझें आपल्याजवळ मागणें आहे."

विघ्नासुरानें जें जें मागितलें तें तें गणपतीनें त्याला दिलें. त्याला आपल्या गणांत घेतलें आणि त्याला सांगितलें, "माझें नांव विघ्नराज होईल, व त्या नांवाचा जप केला असतां सर्व सिद्धी प्राप्त होतील." विघ्नासुराला गणपतीनें असेंहि सांगितलें कीं, "जेथें एखाद्या कार्याचा आरंभ झाला असतां माझें स्मरण होणार नाहीं तें कर्म व त्याचें फळ यामध्यें तूं विघ्नें आणीत जा. शिव, विष्णु प्रमुख सर्व देव, सर्व ऋषिमुनी आणि सर्व प्राणी यांपैकीं जर कोणी अहंकारयुक्त होईल तर त्यांस स्वपदभ्रष्ट करून त्याचे भोग तूं खुशाल भोगीत जा. माझ्या भक्तांना मात्र कोणत्याहि तऱ्हेनें त्रास देत जाऊं नकोस."

पुढें गजाननानें मातापितरांचें समाधान केलें व "महाकार्याच्या वेळीं माझें स्मरण केलें असतां मी सदैव सादर होईन" असें सांगून गणपतीनें आपल्या अवताराची समाप्ति केली.

नंतर देवांनीं नैऋत्य दिशेला भाद्रपद शुद्ध चतुर्थीला मध्यान्हकाळीं गणपतीची स्थापना केली. ही देवांनीं स्थापिलेली मूर्ति सुंदर आहे. सिद्धि आणि बुद्धि या श्री-मूर्तीच्या दोन्ही बाजूला आहेत. आठ दिशांना आठ सिद्धींची स्थापना केली आहे. अष्टभैरव व दहा दिक्पाल यांचींहि

" हिमालय पर्वतावर अभिनंदन या नांवाचा राजा एक यज्ञ करणार आहे. त्या यज्ञांत तुला हविर्भाग देण्याची इच्छा त्याच्या मनांत नाहीं. असा यज्ञ करणारे पुष्कळ ब्राह्मण त्यानें जबरदस्तीनें मिळविले आहेत. त्या यज्ञाला आज–उद्या सुरुवात होणार आहे."

हें ऐकून इन्द्र फार रागावला आणि त्यानें कालाचें स्मरण केलें. तत्काळ काळ इन्द्रापुढें हजर झाला. नंतर इन्द्रानें काळाला त्या यज्ञाविषयीं वृत्तान्त सांगून त्याला आज्ञा केली कीं, " तूं जाऊन या यज्ञाचा नाश कर. सर्व जग तुझ्या स्वाधीन आहे. यामुळें तुला ही गोष्ट करणें सोपें आहे."

काळानें इन्द्राची आज्ञा मान्य केली आणि विघ्नासुराचें स्वरूप घेऊन तो अभिनंदनाच्या यज्ञमंडपांत गेला आणि त्यानें यज्ञाचा विध्वंस केला. इतकेंच नाहीं तर त्यानें कर्मभूमीवरील सर्व वैदिक कर्मांचा लोप केला. कर्मलोप झाला म्हणजे देवांना संकट पडतें. अर्थात् विघ्नासुरानें यज्ञविध्वंस केल्यामुळें देवांना ह्याहि वेळीं संकट पडलें. तेव्हां त्यांनीं तप करून, स्तोत्रें म्हणून व ध्यान करून मोठ्या भक्तीनें गणपतीला प्रसन्न करून घेतलें. नंतर देवकार्य करण्यासाठीं परमेश्वर पार्श्वपुत्र झाला. या पार्श्वाच्या पत्नीचें नांव दीपवत्सला असें होतें. त्या दोघांची तपश्चर्या विलक्षण होती. म्हणून त्यांच्या उदरीं हा अवतार झाला. हा बालक पांच वर्षांचा झाल्यावर शंकर आदि सर्व देव पार्श्वाच्या घरीं जाऊन त्यांनीं त्याचें अभिनंदन केलें. " विघ्नासुराला मारावयाचें आहे आणि तुझ्या पुत्राच्या हातून त्याचा वध व्हावयाचा आहे म्हणून तुझ्या पुत्राला युद्धाला जाण्याची आज्ञा दे " असें देवांनीं पार्श्वाला सांगितलें. हें ऐकून पार्श्वाला गहिवर आला, दुःख झालें, आणि संतापहि आला." माझ्या बाळाला नेऊं नका " असें पार्श्व म्हणतांच गणपति तेथें आला आणि त्यानें वडिलांची समजूत घालून देवांचें म्हणणें मान्य केलें. नंतर गणपतीनें विघ्नासुराला आपल्या अंकुशानें पकडून त्याला देवांसमोर ओढीत आणलें. विघ्नासुर मायावी होता. त्यानें

अग्नि इत्यादि महाभूतांचीं रूपें धारण केलीं. तथापि गजानन हा स्वतः मायाधीश, आणि राक्षसाच्या मायेचा अधिपति असल्यानें त्यानेंहि अग्नि, वायु, आकाश, महाकाल, अहंकार अशा तऱ्हेचीं श्रेष्ठ, श्रेष्ठतर स्वरूपें धारण करून विघ्नस्वरूपांचा नाश केला. अखेरीस आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून विघ्नासुर गणपतीला शरण आला. त्यानें भक्तिपूर्वक गणपतीचें स्तवन केलें, आणि "मी आपली आज्ञा सदैव पाळीत जाईन" असें गणपतीला वचन दिलें. विघ्नासुर आणखी गणपतीला म्हणाला, "आपल्या चरणकमळीं माझी अखंड भक्ति असावी आणि माझें नांव आपण धारण करावें एवढेंच माझें आपल्याजवळ मागणें आहे."

विघ्नासुरानें जें जें मागितलें तें तें गणपतीनें त्याला दिलें. त्याला आपल्या गणांत घेतलें आणि त्याला सांगितलें, "माझें नांव विघ्नराज होईल, व त्या नांवाचा जप केला असतां सर्व सिद्धी प्राप्त होतील." विघ्नासुराला गणपतीनें असेंहि सांगितलें कीं, "जेथें एखाद्या कार्याचा आरंभ झाला असतां माझें स्मरण होणार नाहीं तें कर्म व त्याचें फळ यामध्यें तूं विघ्नें आणीत जा. शिव, विष्णु प्रमुख सर्व देव, सर्व ऋषिमुनी आणि सर्व प्राणी यांपैकीं जर कोणी अहंकारयुक्त होईल तर त्यांस स्वपदभ्रष्ट करून त्याचे भोग तूं खुशाल भोगीत जा. माझ्या भक्तांना मात्र कोणत्याहि तऱ्हेनें त्रास देत जाऊं नकोस."

पुढें गजाननानें मातापितरांचें समाधान केलें व "महाकार्याच्या वेळीं माझें स्मरण केलें असतां मी सदैव सादर होईन" असें सांगून गणपतीनें आपल्या अवताराची समाप्ति केली.

नंतर देवांनीं नैऋत्य दिशेला भाद्रपद शुद्ध चतुर्थीला मध्यान्हकाळीं गणपतीची स्थापना केली. ही देवांनीं स्थापिलेली मूर्ति सुंदर आहे. सिद्धि आणि बुद्धि या श्री-मूर्तीच्या दोन्ही बाजूला आहेत. आठ दिशांना आठ सिद्धींची स्थापना केली आहे. अष्टभैरव व दहा दिक्पाल यांचींहि

दिलें. कार्तिकेयानें आपल्या सैन्याचा संहार चालविला आहे हें पाहून धर्म आणि अधर्म हे पुढें सरसावले आणि त्यांनीं मोठ्या निकरानें युद्ध सुरू केलें. परंतु शेवटीं कार्तिकेयानें एका बाजूच्या सहा हातांनीं धर्माची व दुसऱ्या बाजूच्या सहा हातांनीं अधर्माची शेंडी धरून त्यांना गरगर फिरविलें आणि त्यांना जोरानें आपटून त्यांच्या शतशः चिंधड्या केल्या. हें पाहून राक्षसांचें सैन्य रणभूमि सोडून पळत सुटलें आणि देवसैन्यानें गणेशाच्या नांवाचा जयघोष केला.

पुत्रांच्या मृत्यूचें वर्तमान ऐकतांच सिंधुदैत्य सिंहासनावरून खालीं पडला आणि त्याच्या पत्नीनें अनिवार शोक केला. ब्रह्मदेवासुद्धां जन्मलेल्या सर्व प्राण्यांना अखेर मरण हें आहेच; फक्त हनुमान, कृपाचार्य, व्यास, परशुराम, बिभीषण, अश्वत्थामा आणि बली हेच काय ते आपल्या सत्कर्मामुळें चिरंजीव आहेत, यास्तव आपलें सांत्वन करून घ्या असें आसपासच्या परिजनांनीं विनविल्यावर दुर्गा सावध झाली. सिंधूचा पिता चक्रपाणि यानें सिंधूला, " तूं देवांना मुक्त कर म्हणजे तुझी आणि मयूरेशाची मैत्री होईल, आणि तुझें कल्याण होईल. " वगैरे पुष्कळ उपदेश केला. पण अखेरीस पुत्रांच्या वधाचा सूड उगविण्यासाठीं सिंधु घोड्यावर बसून युद्धभूमीवर पुनरपि जाण्यास निघाला.

सिंधु स्वतः युद्धाला येत आहे असें समजतांच गणेश आपलें सैन्य घेऊन समरांगणावर आला. त्या सैन्याचें अधिपत्य कार्तिकेयानें केलें होतें. त्यावेळीं पुष्पदंत, नंदी, शृङ्गी, भृंगी यांनीं अगणित राक्षसांचा फडशा उडविला. अखेरीस सिंधु मोठ्यानें गर्जना करून पुढें आला आणि त्यानें लगेच अग्न्यस्त्राचा प्रयोग केला. तेव्हां शिवगण गणेशापाशीं आले आणि ' आमचें रक्षण कर ' असें ओरडूं लागले. तत्क्षणींच गजाननानें शंकराचें स्मरण केलें, आणि आपल्या परशूवर कृतान्ताचा प्रयोग केला. त्याबरोबर एक पुरुष उत्पन्न झाला आणि त्यानें अग्नीला

गिळून टाकलें. त्या पुरुषानें राक्षसांचा संहार करण्याला प्रारंभ केला. त्याच्यापुढें सिंधूचा कांहींच पराक्रम चालेना. शेवटीं अगदीं हतवीर्य होऊन, सिंधु कसा तरी धडपडत, नागडा उघडा पळून आपल्या नगरांत आला.

दुसऱ्या दिवशीं नारद गजाननाकडे आला आणि सिंधूच्या वधाला त्यानें उशीर लावूं नये यासाठीं त्याला चीड येईल असें त्यानें भाषण केलें. सिंधु पुढें येतांच त्याला ठार करण्याची प्रतिज्ञा गजाननानें केली, आणि सिंधूला समरभूमीवर आणण्यासाठीं त्यानें शृंगी, भृंगी, वीरभद्र आणि भूतराज यांना गंडकी नगरीला पाठविलें. त्यांनीं प्रचंड आकार धारण करून त्या नगरींत हलकल्लोळ माजविला. हें वर्तमान ऐकून सिंधूची पत्नी दुर्गा त्याला म्हणाली, " प्राणनाथ, मी तुम्हाला पूर्वी सांगत होतें तें जर तुम्ही ऐकलें असतें तर हा प्रसंग कशाला ओढवला असता ? अजूनहि वेळ गेली नाहीं. तरी तुम्ही गणेशाला शरण जा. "

तोंच भृंगीनें राजवाड्याच्या मुख्य सभामंडपावर उडी मारली. त्यामुळें तो एकदम कोसळून खालीं पडला. तो प्रकार पाहून सिंधुदैत्य लढाईचा पोषाख करून युद्धाला निघाला. ही बातमी तत्काळ भृंगी आदि चार वीरांनीं गणेशाकडे येऊन त्याला सांगितली. सिंधु आणि गणेश यांचें भयंकर युद्ध जुंपलें. शेवटीं सिंधुदैत्य युद्ध करतां करतां कंटाळला आणि तो गणेशा'र धावून गेला. तेव्हां गणेशानें एकदम आपलें विराट स्वरूप धारण केलें. त्याचें मस्तक आकाशाला भिडलें. पायांनीं पाताळाचें आक्रमण केलें, सहस्रावधि नेत्र आणि सहस्रावधि मस्तकें अवलोकन करून सिंधुदैत्याला मूर्च्छा आली. तो शुद्धीवर आला तेव्हां ' जो आपलें मस्तक गगनापर्यंत नेईल आणि आकाश आच्छादून टाकील तो तुला मुक्ति देईल–' असा त्याला सूर्यानें वर दिला होता, त्याची त्याला आठवण झाली. नंतर युद्धाचा निश्चय करून तो गजाननाकडे पाहूं लागला तों त्याला त्याचें पूर्ववत्, सात्त्विक, लहान रूप दिसलें.

पुढें प्रतापी गजानन मयूरावरून खालीं उतरला, त्यानें आचमन केलें आणि मंत्राचा जप करून आपला परशु राक्षसाच्या नाभीचा नेम धरून सोडला. त्यामुळें त्याच्या नाभिकमलाचा छेद झाला. नाभीं-तून वरद अमृत बाहेर पडतांच तो राक्षस तोंड वासून रक्त ओकत खालीं पडला आणि गतप्राण झाला. सिंधुराक्षसाचा नाश होतांच देवांनीं गणेशावर पुष्पवृष्टि केली. सर्व गण, गंधर्व, मुनि गणेशाची स्तुति करूं लागले. "परब्रह्म, चिदानंद, परेश, देवेश, गुणेश, गुणसमुद्र, गुणातीत अणि मयूरेश असा जो आद्य परमात्मा, ज्याचें रूप अगम्य, जो मनुष्याच्या सर्व इच्छा पूर्ण करतो, महेशादि देव नेहमीं ज्याची सेवा करतात, जो शत्रूचा नाश करतो, जो इच्छित रूपें धारण करतो त्या मयूरेशाला आम्ही नमस्कार करतों." अशा प्रकारें देवांनीं केलेल्या या स्तुतिस्तोत्राला 'सर्व विघ्ननाशक' असा आशीर्वाद दिल्यावर देवादि सर्व आपल्या स्थानीं निघून गेले.

नंतर सिंधूसाठीं बेल, चंदन इत्यादि पवित्र काष्टांची चिता रचली. दुर्गा सिंधूबरोबर सती गेली. नंतर चक्रपाणीनें गजाननाची स्तुति केली आणि 'एक वेळ आमच्या घरीं ये' असा त्यानें वर मागितला. त्याप्रमाणें गणेश मयूरावर आरूढ होऊन त्याच वेळीं गंडकींत आला.

चक्रपाणीच्या सभागृहांत गणेश विराजमान् झाला असतां चक्रपाणी त्याची पूजा करूं लागला. तेव्हां ब्रह्मादिकांना त्या गोष्टीचें वैषम्य वाटलें. तेव्हां ब्रह्मांडाचा स्फोट होतो कीं काय अशा प्रकारचा भीषण शब्द त्या सभेंत सर्वांना ऐकूं आला. ते गजाननाकडे पहातात तों त्यांना त्याचें रूप अत्यंत सुंदर आणि पांच स्वरूपांनीं युक्त असें दिसूं लागलें. तेथें गणपतित शिव, विष्णु, सूर्य आणि देवी असें पंचायतन सिंहासनावर एकाचा मूर्ती सर्वांन दिसलें. इतक्यांत 'हा गजानन प्रत्यक्ष परब्रह्म असल्यामुळें सर्व, देवांहून श्रेष्ठ आहे. याचें पूजन केलें असतां सर्व देवांचें पूजन घडेल,

आणि जे भेदभाव धरतील ते नरकाला जातील’ अशी आकाशवाणी झाली.

नंतर नारद ब्रह्मदेवास म्हणाला, “ब्रह्मदेवा, तुझ्या सिद्धिबुद्धि नांवाच्या कन्यांशीं विवाह करण्यासाठीं गजानन येथें आला आहे. तर तूं त्याला आपल्या कन्या अर्पण कर.”

हें ऐकून सर्व देव, ‘या कन्या आम्हांला दे’ असें ओरडूं लागले. तेव्हां ब्रह्मदेवानें आपल्या कन्यांच्या हातांत पुष्पमाला देऊन स्वयंवर करण्याची त्यांस आज्ञा दिली. त्या कन्यांनीं इतर देवांकडे न पहातां एकदम गणेशपाशीं जाऊन त्याच्या गळ्यांत माळा घातल्या. तेव्हां ब्रह्मदेवानें त्यांचें गणेशाबरोबर विधिपूर्वक लग्न लावून दिलें.

नंतर सिद्धिबुद्धीसह गणेश मयूरपुरीस यावयास निघाला. तेव्हां कार्तिकेयाच्या सांगण्यावरून त्यानें मृत शिवगणास जिवंत केलें. आपल्या नगरांत आल्यावर उत्कृष्ट सभागृह स्थापून नगराच्या पूर्वभागांत रतीसह मदनाची स्थापना केली. त्या गणेशपुरांत जी देवीची मूर्ति आहे तिला मार्जारी म्हणतात. दक्षिण दिशेस त्यानें ईश्वरपार्वतीची स्थापना केली आणि त्यांच्या सन्निध विरजा नामक देवीला स्थान दिलें. पश्चिमेस वराह आणि धरणी यांना जागा देऊन तेथें त्यानें आश्रया नामक देवीची स्थापना केली; आणि उत्तर दिशेला विष्णूला स्थान देऊन तेथें मुक्ति नामक देवीची स्थापना केली. गजाननाच्या इच्छेनें तेहतीस कोटि देव तेथें राहिले. याप्रमाणें तें अप्रतिम नगर गजाननानें वसविलें.

त्या नगरांत पुष्कळ काळ वास केल्यावर एके दिवशीं गणेशानें आपल्या सर्व आप्तइष्टांस आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांस आपल्या जवळ बोलाविलें, आणि तो त्या सर्वांना म्हणाला, “देवहो, मीं सिंधु-दैत्याच्या वधासाठीं हा अवतार घेतला होता. तें माझें अवतारकृत्य संपलें आहे. पृथ्वीवर अधर्महि आतां राहिला नाहीं. मीं आतां निजधामास

जाणार आहें. तरी मला तिकडे जाण्याची आज्ञा द्यावी."

हें ऐकून सर्वांना फार दुःख झालें. गजानन पार्वतीला म्हणाला, "माते, तूं शोक करूं नकोस. यापुढें सिंदुर नामक दैत्य उत्पन्न होणार आहे. त्याचा वध करण्यासाठीं मला पुन्हां अवतार धारण करावा लागेल. तेव्हां मी तुझा पुत्र होईन."

नंतर बंधुप्रेमामुळें कार्तिकेय पुढें आला आणि त्यानें आपल्या बारा हातांनीं गणेशाला आलिंगन दिलें. तेव्हां आपला मयूर गणेशानें त्याला दिला आणि त्याचेंहि नांव मयूरेश्वर असेंच ठेवलें. शेवटीं सर्व देवांना गणेशानें आश्वासन दिलें कीं "तुम्ही ज्या ज्या वेळीं माझें स्मरण कराल त्या त्या वेळीं मी तुमच्या संकटांचें हरण करीन," असें म्हणून गजानन अंतर्धान पावला.

उपासकानें मोरगांव येथील यात्रा विधिपूर्वक केल्यास त्याच्या इच्छा तृप्त होतात.

## एका उपासकाची कथा

मोरगांव हें भूस्वानंद मोरेश्वर क्षेत्र अखिल गाणपत्य क्षेत्रांत अत्यंत श्रेष्ठ गणलें जातें. तें आद्यक्षेत्र असून सर्वसिद्धिदायक आहे; म्हणून त्याला सर्वक्षेत्र, बीजक्षेत्र, क्षेत्रराय इत्यादि संज्ञा प्राप्त झाल्या आहेत. श्री स्वानंदाच्या इच्छेप्रमाणें हें क्षेत्र आदिकालापासून प्रकट झालेलें आहे. या ठिकाणीं ब्रह्मा, विष्णु, महेश, शक्ति आणि सूर्य या पांच देवतांनीं सर्वसत्ता संपादन करण्यासाठीं श्री स्वानंदेश गणेशाची आराधना केली आणि त्यामुळें गणेशाचें कृपासामर्थ्य त्यांना प्राप्त झालें. अशा प्रकारें वरील पंचेश्वर सर्वसत्तासंपन्न झाले. याच पंचदेवांनीं येथें श्री गणेश मूर्तीची प्रतिष्ठा केली म्हणून येथील श्री गणेशाला पंचदेव-जनक, पंचेश-

वरद अशा नांवांनीं संबोधून वेदपुराणांनीं त्याची स्तुति केली आहे. या क्षेत्रांत श्री मोरया गोसावी आदिकरून अनेक गणेशभक्तांनीं श्री गणेशाची आराधना करून आणि मंत्रानुष्ठान करून सिद्धि मिळविल्या आहेत. त्यांपैकीं एका सिद्धपुरुषाची कथा येथें देत आहे.

रत्नागिरीजवळ सुमारें दीड कोसावर शिरगांव या नांवाचें एक गांव आहे. त्या ठिकाणीं कांहीं वर्षांपूर्वीं गणपति म्हसकर या नांवाचा गृहस्थ रहात होता. त्याच्या घरांत अठरा विश्वें दारिद्र्य होतें. एका अवश्य असलेल्या धार्मिक विधीसाठीं खर्च करण्याला त्याच्यापाशीं एक पैसाहि नव्हता. अशा अडचणीच्या प्रसंगीं त्याला खालील श्लोकाचें स्मरण झालें:—

कऱ्हेच्या तिरीं एकसे मोरगांव<br>
तिथें नांदतो मोरया देव पाहूं ।<br>
चला जाउ यात्रे महापुण्य आहे<br>
मनीं इच्छिलें मोरया देत आहे— ॥

तो मनांत म्हणाला कीं, मोरया जर मनांतील इच्छा पुरविणारा देव आहे तर एकदां तेथें जावें आणि आपलें दारिद्र्य घालवून मोरयाकडून द्रव्यप्राप्ति करून घ्यावी. अशा उत्कट भावनेनें तो मोरगांवीं गेला.

तेथें ना कोणाची ओळख ना देख. त्यानें देवळांत जाऊन मोरयाचें दर्शन घेतलें आणि आपलें गाऱ्हाणें त्याच्यापुढें मांडलें. त्यावेळीं मोरगांवीं एक सिद्धपुरुष होता. त्यानें गणपति म्हसकराच्या मनांतील उद्देश ओळखून त्याला एक मंत्रोपदेश केला, आणि एकवीस दिवस उपोषित राहून त्या मंत्राचें एक पुरश्चरण करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें पुरश्चरण केल्यावर त्याला दृष्टान्त झाला कीं, “ उद्या माझ्या प्रदक्षिणेच्या वाटेवर माझी सुवर्णमय मूर्ति तुला सांपडेल ती घेऊन मुंबईस जा. ” त्यानें हा दृष्टान्त गुरूला सांगितला. दृष्टान्ताप्रमाणें सुवर्णाची गणेशमूर्ति त्याला सांपडली. तिची नित्य पूजा-अर्चा करीत जा म्हणजे तुझा कार्यभाग होईल असें

त्याला गुरूनें-त्या सिद्धपुरुषानें-सांगितलें.

गुरूची आज्ञा घेऊन म्हसकर मुंबईस गेला व गणपतीची पूजा-अर्चा मनोभावानें करण्यांत रंगून गेला. मुंबईला गेल्यावर त्याचें नशीब उघडण्याची वेळ लवकरच आली.

मुंबईच्या दोन व्यापाऱ्यांचीं जहाजें विलायतेहून लाखों रुपयांचा माल घेऊन मुंबईस येणार होतीं. तीं वेळेवर आलीं नाहींत म्हणून जहाजाचे मालक अत्यंत काळजींत होते. त्या दोघांहि व्यापाऱ्यांना एके रात्रीं एक स्वप्न पडलें कीं, "अनंत ऋषीच्या वाडींत गणपतिबोवा म्हसकर या नांवाचे एक सत्पुरुष आहेत ते तुमची जहाजाविषयींची काळजी निवारण करतील."

इकडे गणपति म्हसकर याला दृष्टान्त झाला कीं, "अमुक अमुक इसम तुझ्याकडे येतील आणि जहाजांविषयीं तुला प्रश्न करतील तेव्हा तूं त्यांना सांग कीं, अमुक दिवशीं तुमचीं जहाजें दुपारीं मुंबई बंदरांत येतील. हें सांगितल्यावर त्यांच्याकडून तुला काय मागायचें तें मागून घे."

जहाजांचे मालक चौकशी करीत म्हसकराकडे गेले. तो पूजेंत गर्क होता. त्यानें त्या माणसांकडे पाहून एकदम त्यांना प्रश्न केला— "तुमचींच जहाजें बेपत्ता झालीं आहेत ना? काळजी करूं नका. आजपासून अमुक दिवशीं दुपारीं तुमचीं जहाजें सुरक्षित अशीं मुंबई बंदरांत येतील. जहाजें सुरक्षित आल्यावर श्रीपुढें काय ठेवायचें तें ठेवा."

पुढें म्हसकरानें सांगितलेल्या दिवशीं दुपारीं जहाजें बंदरांत आलीं. दुसऱ्या दिवशीं जहाजाच्या मालकांनीं एक लाख रुपयांच्या हुंड्या गणपति म्हसकरापुढें आणून ठेवल्या. मोरेश्वराच्या ठिकाणीं त्याची उत्कट भक्ति जडली. शिरगांवीं जाऊन तेथें कांहीं दिवस गणपतिबोवा म्हसकर राहिले, आणि नंतर संचाराला निघाले. जातां जातां ते

माळ्यांत गेले. तिकडे शिंदे सरकारच्या कानावर गणपतिबोवांची कीर्ति गेली. त्यांनीं त्यांना दरसाल बारा हजार रुपये उत्पन्नाचे दोन गांव इनाम दिले. गणपतिबोवांची अलोट कीर्ति झाली. शेवटीं देह ठेवला त्या वेळीं त्यांच्या खजिन्यांत अगणित संपत्ति होती असें सांगतात. श्री मोरेश्वराच्या ठिकाणीं मनुष्याची नितान्त निष्ठा, श्रद्धा असेल आणि तो उत्कट भक्तिभावानें त्याची उपासना करील तर अशा भक्ताला कधींहि कशाची उणीव पडणार नाहीं यांत तिळमात्र संशय नाहीं.

* * *



## २. सिद्धटेकचा सिद्धिविनायक

दौंडजवळ नगर जिल्ह्यांत भीमेच्या कांठीं सिद्धटेक हें स्थान वसलें आहे. त्याला देऊळवाडी असेंहि म्हणतात. महाविष्णूनें येथें महान् तपश्चर्या केली व मधु-कैटभ या दैत्यांना ठार मारलें. दैत्य मारण्यापूर्वी महाविष्णूनें येथें गणपतीचें पूजन केलें होतें. महाविष्णूच्या तपश्चर्येनें गणेश प्रसन्न झाले व त्यांच्या कृपाप्रसादानें त्यांना त्या दैत्याचा वध करणें शक्य झालें. विष्णूला येथें सिद्धि प्राप्त झाली म्हणून गांवाचें नांव सिद्धटेक व गणेशाचें नांव सिद्धिविनायक असें पडलें.

हें देवालय उत्तराभिमुखी आहे. वेशीपासून देवळापर्यंत हरिपंत फडके यांनीं बांधलेला फरसबंदी मार्ग आहे. मंदिरानजीकच हरिपंत फडके यांचा पूर्वाभिमुखी तीन चौकी वाडा आहे. वाड्याच्या चहूंबाजूंच्या भिंती उभ्या आहेत. मधली इमारत मात्र पडलेली आहे. गांवाला दक्षिणवाहिनी भीमा

नदी आहे. भीमेला कितीहि मोठा पूर आला तरी तिच्या पाण्याचा मुळींच आवाज होत नाहीं. जणूं सिद्धिविनायकाला मुळींच त्रास होऊं नये म्हणून ती येथें शांत स्वरूपांत वाहते. नदीच्या कांठाला विष्णुमंदिर आहे. त्याचप्रमाणें सिद्धिविनायकाचें देवालय व हें विष्णुमंदिर यांच्यामध्यें शिवाई देवी व महादेव अशीं दोन स्वतंत्र मंदिरें आहेत. नदीला घाट आहे. तो हरिपंत फडके यांनीं बांधला आहे. खर्ड्याच्या लढाईनंतर त्यांचें देहावसान येथेंच झालें. त्यांच्या स्मरणार्थ म्हणून नदीकाठीं घाटावर त्यांच्या अस्थि ठेवून त्यांवर छोटी कमान बांधली आहे.

देवळाचा आंतील गाभारा सुमारें १५ फूट उंचीचा असून गाभाऱ्याची रुंदी १० फूट आहे. सिद्धिविनायकाच्या भोंवतीचें मखर पितळेचें असून उजव्या बाजूला जय व डाव्या बाजूला विजय अशा मोठ्या आकाराच्या मूर्ति आहेत. श्रींच्या वरची महिरपहि पितळेची आहे. तीवर दोन्ही बाजूंना चंद्र, सूर्य, गरुड आणि हनुमान असून मध्यभागीं नाग आहे. सिंहासन दगडी आहे. आंतील गाभारा कोणी बांधला ही माहिती उपलब्ध नाहीं. मधला गाभारा अहिल्याबाई होळकर यांनीं बांधला. त्या गाभाऱ्याची उंची २५ ते ३० फूट व रुंदी २० फूट भरेल. मधल्या गाभाऱ्यांत देवाचें शेजघर आहे व तेथेंच एका बाजूला शिवपंचायतन आहे.

बाहेरच्या बाजूला मोकळा सभामंडप आहे. तो पूर्वीं बडोद्याच्या नउकोट नारायण मैराळ यांनीं बांधला होता. तो पडला. आतां त्या ठिकाणीं मंडपाची फरसबंदी मोकळी जागा आहे. बाहेरच्या बाजूला मारुतिमंदिर आहे.

सिद्धिविनायकाच्या मूर्तीचें स्वरूप फक्त गजमुख असून वामांगी सिद्धिबुद्धि आहेत. सोंड उजवी आहे. उजव्या सोंडेचा गणपति फार कडक असतो. तेथून थोड्याच अंतरावर महर्षि व्यासांनीं ज्या ठिकाणीं प्रार्थना केली तें ठिकाण दाखविण्यांत येतें. त्यांनीं भीमा नदीच्या पात्रांत

यज्ञ व होमहवन केलें. नदीचें पाणी कमी झालें म्हणजे त्या भागांत अद्यापहि भस्म सांपडतें. मंदिरापासून सुमारें दोन फर्लांगावर उत्तरेस भृशुंडी ऋषींनीं तपश्चर्या केल्याची जागा दाखवितात. त्या जागेची खूण म्हणून ज्या ठिकाणीं ऋषींनीं काठी रोवली होती त्या ठिकाणीं मोठा झालेला शमीवृक्ष अद्यापहि तेथें उभा आहे. भोंवतालीं बसण्यासाठीं पार आहे. भृशुंडी हे कोळी जातीचे ऋषि. त्यांची गावाभोंवतीं पाटिलकी होती. ती पुढें नलगे या मराठा जातीच्या घराण्यांत आली. ती पाटिलकी अद्यापहि त्या घराण्याकडे चालू आहे.

ज्या वेळीं ही मूर्ति प्रकट झाली त्या वेळीं तेथें केवळ गायरान होतें. त्या वेळीं मूर्तीवर पाणी घालून मगच नलगे न्याहरी करीत असे. पुढें त्याला दृष्टान्त झाला कीं तूं पाणी न घालतां येथें एखादें ब्राह्मणाचें घर घेऊन ये. नलगे यानें येथून चौदा मैलांवरचें राशीन या गांवचे पुरोहित या ब्राह्मणाचें घराणें येथें आणलें. या गोष्टीस सुमारें ८०० ते ९०० वर्षें झालीं. आज त्यांच्याच घराण्यांतील धोंडो मार्तंड पुरोहित तेथें उपाध्ये म्हणून काम करतात.

सिद्धटेक हें गांव मूळ चंद्रचूड यांचें. त्यांनीं तें गांव देव मंडळींना दान दिलें. त्या मंडळींपैकीं चिंतामण धरणीधर ऊर्फ बाबा महाराज देव हे जहागीरदार पूर्वीं येथें राहात होते. त्यांनीं चिंचवड संस्थानांत सन १९३६ पासून सन १९५५ अखेर मुख्य ट्रस्टी म्हणून काम केलें. तेच सिद्धटेक येथील व्यवस्था पहात होते.

श्री मोरया गोसावी यांनीं प्रथम येथेंच तपश्चर्या केली व पुढें ते मोरगांवीं गेले, अशी आख्यायिका या भागांत प्रचलित आहे. केडगांवच्या नारायण महाराजांनीं प्रथम येथेंच श्रींची सेवा केली. त्यांना असा दृष्टान्त झाला कीं, “येथून सहा मैलांवरील अर्वी या क्षेत्रांत तपश्चर्या करावी. म्हणजे तुला फलप्राप्ति होईल.” त्याप्रमाणें त्यांनीं तपश्चर्या केली व त्यांना

फलप्राप्ति झाली, आणि त्या नंतर ते केडगांवला गेले. असें सांगतात कीं, पूर्वीं हरिपंत फडके यांचें सेनापतिपद गेल्यानंतर त्यांनीं २१ दिवस येथें सेवा केली. त्याचें फळ त्यांना पुन्हां सेनापतिपद मिळण्यांत झालें. ही सेवा करतांना हरिपंतांनीं २१ श्लोक केले. ते रोज आरतीच्या वेळीं आजहि म्हणण्यांत येतात.

## पौ रा णि क क था

आपणाला वेद, शास्त्रें, पुराणें इत्यादिकांचें ज्ञान झालें असा एकदां ब्रह्मदेवाला अभिमान झाला. आपणाला वर अथवा शाप देण्याचें सामर्थ्य, प्राप्त झालें आहे, आपण सृष्टि उत्पन्न करण्याचें काम लीलेनें करूं शकूं अशा अभिमानानें त्यानें सृष्टि उत्पन्न करण्यास आरंभ केला. तेव्हां त्याच्यापुढें अनेक विघ्नें साक्षात् उभीं राहिलीं. ज्याप्रमाणें मोहोळाभोंवतीं हजारों मधमाशा भ्रमण करीत असतात त्याप्रमाणें ब्रह्मदेवाभोंवतीं तीं हजारों विघ्नें भ्रमण करूं लागलीं. कित्येक तीन डोळ्यांचीं, कित्येक सात हातांचीं, कित्येक विहिरीसारख्या तोंडांचीं, कित्येक बिनपायांचीं, कित्येक पांच तोंडांचीं कित्येक सात तोंडांचीं, सहा पायांचीं, कित्येक ताडासारखीं मोठमोठे पांच पांच दहा दहा हात उंच असलेलीं आणि भयंकर रूपें धारण करणारीं तीं विघ्नें पाहून ब्रह्मदेवाची भीतीनें गाळण उडाली. तीं विघ्नें मोठमोठ्यानें आरोळ्या ठोकून त्याला गुद्दे मारूं लागलीं. एकानें तर ब्रह्मदेवाच्या चारी शेंड्या धरून त्याला झोके दिले. दुसऱ्या एका आठ हात असलेल्या विघ्नानें त्याच्या आठ मिशा उपटण्यास आरंभ केला. कोणी त्याची निंदा केली तर कोणी स्तुति केली, कोणी त्याचे हातपाय बांधले, कोणी त्याचे कान उपटले. अशा प्रकारें परस्वाधीन झालेल्या त्या ब्रह्मदेवाला अत्यंत दुःख झालें. त्याचा गर्व एका क्षणांत नाहींसा झाला, आणि तो अगदीं

निराश झाला. त्याला थोडा वेळ मूर्च्छा आली. अशा स्थितींत दोन घटका गेल्या आणि नंतर त्याला गजाननाचें स्मरण झालें. ब्रह्मदेव म्हणाला, " देवाधिदेवा, मी मूढ आहे. सृष्टि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य तूंच मला दिलेंस. असें असून हीं विघ्नें मला उपद्रव देत आहेत याची लाज तुलाच असली पाहिजे. "

अशा प्रकारें ब्रह्मदेवानें स्तुति करण्यास प्रारंभ केला असतां, ' तूं तपश्चर्या कर ' अशी आकाशवाणी त्याच्या कानीं आली. ती कानीं येतांच सर्व विघ्नें एकदम नाहींशीं झालीं. विघ्नमुक्त झाल्यावर ब्रह्मदेव म्हणाला, " मी तपश्चर्या करायची खरी पण मंत्रोपदेशावांचून किंवा योग्य ठिकाण मिळाल्याशिवाय तपश्चर्या तरी कशी करावी ? "

असा विचार करीत ब्रह्मदेव पाण्यांत बसला होता आणि व्याकुळ झाला होता. नंतर मस्तकावर रत्नजडित मुगुट, अंगाला रक्तचंदनाची उटी, शेंदुरासारखें लाल मस्तक, गळ्यांत रत्नमाला आणि यज्ञोपवित, दंडांत रत्नखचित बाहुभूषणें, बोटांत आंगठ्या, कमरेला नागाचें वेष्टण, अंगावर तांबडी वस्त्रें, मस्तकावर चंद्र अशा प्रकारचें गजाननाचें स्मरण त्यानें मनोभावानें केलें. त्यावेळीं त्याला " वडाकडे पहा " अशी पुन्हां आकाशवाणी ऐकूं आली. ती ऐकूनसुद्धां ब्रह्मदेवाला पुन्हा काळजी उत्पन्न झाली.

ब्रह्मदेव काळजीनें व्याकुळ होऊन बसला असतां त्याला विलक्षण स्वप्न पडलें. स्वप्नांत तो फिरत असतां त्याला एक वडाचें झाड दृष्टीस पडलें. त्यावेळीं सर्व सृष्टि जलमय झाली होती, आणि एवढेंच मोठें प्रचंड वडाचें झाड कसें शिल्लक राहिलें याचा त्याला मोठा विस्मय वाटला. तो त्या झाडाकडे पाहूं लागला तेंव्हां त्याला वडाच्या पानावर एक कोमल बालक आढळलें. त्या बालकाला चार हात होते, मस्तकावर रत्नजडित मुकुट होता, गळ्यांत मोत्यांची माळ, मस्तकावर अर्धचंद्र, मनुष्याचें शरीर, मुखांतून एक दांत बाहेर आलेला आणि एक सोंड ( गजाचें मुख )

असें त्या बालकाचें स्वरूप होतें. तें आपल्या सोंडेनें पाणी घेऊन सोंडेच्या अग्रानें सोंडेंतील पाणी आपल्या डोक्यावर शिंपडीत होतें. त्या बालकाला पाहून ब्रह्मदेव हंसूं लागला. तें पाहून तो बाल गजानन झाडावरून उतरून ब्रह्मदेवापाशीं आला आणि त्याला म्हणाला, " ब्रह्मदेवा, तूं लहानांहून लहान असून मी मोठा आहे असा तुला अभिमान झाल्यामुळें तुला विघ्नांचा उपद्रव झाला. आतां तपश्चर्या कशी करावी याची तुला काळजी लागली आहे; यास्तव मी तुला एकाक्षरमंत्र सांगतो. पुरश्चरणविधीनें तूं या मंत्राचा दहा लक्ष जप कर म्हणजे मी तुला प्रत्यक्ष दर्शन देईन, आणि उत्कृष्ट सामर्थ्य देईन. "

असें स्वप्न पाहून ब्रह्मदेव जागा झाला. आपल्याला गजाननाचें प्रत्यक्ष दर्शन केव्हां होईल याची त्याला काळजी लागली. नंतर स्नान करून त्यानें मंत्रजपाला प्रारंभ केला. आपल्या इंद्रियांचें नियमन करून देवांची सहस्र वर्षेपर्यंत त्यानें उग्र तपश्चर्या केली. त्या काळांत त्यानें आहार सोडला होता. हें तप चालूं असतांना अखेरीस त्याच्या तोंडांतून भयंकर ज्वाला निघूं लागल्या. त्याची ती एकनिष्ठ तपश्चर्या पाहून गजानन प्रसन्न झाले आणि त्यांनीं ब्रह्मदेवाला प्रत्यक्ष दर्शन दिलें. त्या वेळचें देवाधिदेव गणपतीचें दिव्य स्वरूप पाहून ब्रह्मदेवाला चिंता उत्पन्न झाली आणि तपश्चर्येपासून त्याचें मन विचलित झालें. त्याचे नेत्र मिटले आणि त्याला कांहीं सुचेना. गजाननांनीं त्याची ती स्थिति पाहून त्याच्याशीं सांत्वनपूर्वक भाषण केलें. ते म्हणाले, " ब्रह्मदेवा, तूं घाबरूं नकोस. तुला ज्यानें तुझ्या स्वप्नांत मंत्राचा उपदेश केला तोच मी प्रत्यक्ष तुझ्यापुढें उभा आहे. सांप्रत माझें रूप सौम्य आहे. या वेळीं तुला जी इच्छा होईल ती क्षणार्धांत पूर्ण होईल. "

हें ऐकून ब्रह्मदेवाला आनंद झाला, आणि त्यानें आपलीं चारीं मस्तकें नम्र करून गजाननाला नमस्कार केला आणि तो म्हणाला, " ज्याचा वेदा-

लाहि पत्ता लागला नाहीं तो परमात्मा, मला आज प्रत्यक्ष दृग्गोचर झाला म्हणून मी स्वतःला धन्य समजतों. देवा, आपण प्रसन्न झाला आहांत तरी आपली दृढभक्ति मला द्या. जीं जीं विघ्नें येतील त्या सर्वांचें निवारण करून सृष्टिरचनेचें सामर्थ्य मला द्या व मी आपलें स्मरण केल्याबरोबर आपण मला दर्शन देत जा."

गजानन त्याला म्हणाले, "माझ्या प्रसादानें तुझ्या इच्छा सफल होतील आणि नुसत्या माझ्या स्मरणानें तुझीं सर्व विघ्नें नष्ट होतील. तूं आतां मनांत कसलीहि शंका न बाळगतां सृष्टि उत्पन्न कर."

ब्रह्मदेवाला त्याच्या मनाप्रमाणें सृष्टि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें. नंतर त्यानें गणपतीची पूजा केली. त्यावेळीं सिद्धि आणि बुद्धि अशा दोन कन्या तेथें एकदम उत्पन्न झाल्या. ब्रह्मदेवानें षोडशोपचारांनीं गजाननाची पूजा केली आणि भक्तांचें कल्याण करण्याबद्दल वर मागितला. त्यानें त्या दोन कन्या गजाननाला अर्पण केल्या. त्यांचा गजाननानें स्वीकार केला आणि तो अंतर्धान पावला.

नंतर ब्रह्मदेवानें सृष्टि उत्पन्न करण्याला प्रारंभ केला. प्रथम त्यानें सात मानसपुत्र उत्पन्न केले आणि त्यांस प्रजा उत्पन्न करण्याची आज्ञा दिली. त्या मानसपुत्रांनीं अगोदर तपश्चरण केलें आणि त्या योगानें त्यांना मुक्ति मिळाली. तेव्हां ब्रह्मदेवानें पुन्हां सात पुत्र निर्माण करून त्यांना प्रजा निर्माण करण्याविषयीं आज्ञा दिली. या पुत्रांनींहि तपश्चर्या केली आणि ते ज्ञानी झाले. त्यांच्याकडून प्रजानिर्मितीचें काम झालें नाहीं असें पाहून ब्रह्मदेवानें स्वतः प्रजा उत्पन्न करण्याला सुरुवात केली. त्यानें आपल्या निरनिराळ्या अवयवांपासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य असे तीन वर्ण निर्माण केले. हृदयापासून चंद्र, नेत्रांपासून सूर्य, कानांपासून वायु, नाभीपासून आकाश, मस्तकापासून स्वर्ग, आणि पायापासून पृथ्वी उत्पन्न केली. नंतर त्यानें समुद्र, नद्या, पर्वत, गवत, वेल, वृक्ष

इत्यादि उत्पन्न केले.

कांहीं काळ गेल्यावर निद्रिस्त असलेल्या विष्णूच्या कानांतून मधु आणि कैटभ या नांवाचे दोन राक्षस निर्माण झाले. ते उत्पन्न झाल्या-बरोबर ब्रह्मदेवाला उपद्रव देऊं लागले. ते राक्षस अत्यंत भयंकर होते. त्यांनीं वेद, ऋषि, देव, साधु आणि शास्त्री यांची निंदा करण्यास सुरुवात केली. त्यांच्या त्रासानें सर्व सृष्टि भयभीत झाली. पृथ्वीला कंप सुटला, शेष डळमळूं लागला. ते ब्रह्मदेवाला खाण्यासाठीं ब्रह्मदेवाच्या अंगावर धावून आले. त्या वेळीं निद्रेनें विष्णूला मोह घातला होता. तेव्हां मधुकैट-भांच्या नाशासाठीं आणि विष्णूला जागृत करण्यासाठीं ब्रह्मदेवानें निद्रा-देवीचें स्तवन केलें. ब्रह्मदेव म्हणाला, “ देवि, तुझें सामर्थ्य अगाध आहे. तूं विष्णूला सोड आणि या दोन राक्षसांना मोह पाड. या राक्षसांनीं पूर्व-जन्मीं माझी तपश्चर्या केली होती म्हणून मी त्यांना पुष्कळ वर दिले. त्या वरांमुळे हे माजले आहेत, आणि मलाच मारण्यासाठीं उद्युक्त झाले आहेत. म्हणून यांचा वध करण्यासाठीं विष्णूला सोड. तो जागा होऊं दे.”

विष्णु जागा होईपर्यंत त्या दैत्यांनीं त्रिभुवनांत मोठा धुमाकूळ माज-विला. इंद्र, चंद्र, कुबेर वगैरे सर्व देवांनींहि त्यांच्या भीतीनें आपआपलीं स्थानें सोडून पळ काढला. नंतर विष्णु जागा झाला आणि त्यानें त्या दैत्यांबरोबर युद्ध करण्यास प्रारंभ केला. सर्व देव विष्णूच्या साहाय्यार्थ धावून आले. विष्णूनें युद्धापूर्वी आपला पांचजन्य शंख वाजविला. त्याच्या निनादानें आकाश व पाताळ दुमदुमून गेलें. हा शंखध्वनि ऐकल्यावर मधु-कैटभ एकमेकांना म्हणाले, “ आम्ही सर्व त्रिभुवनांत जय मिळवला पण असा शंख-नाद आजपर्यंत ऐकला नव्हता. असा मोठा शंख-नाद करणारा पुरुष महापराक्रमी असला पाहिजे. अशा प्रकारच्या शत्रूशीं युद्ध अवश्य केलें पाहिजे. त्याच्याबरोबर युद्ध करतांना मृत्यु आला तरी हरकत नाहीं. ”

असें आपआपसांत बोलून त्यांनीं विष्णूला युद्ध करण्यासाठीं आव्हान केलें. ते विष्णूला म्हणाले, "अरे, तुला जरी आपल्या पराक्रमाचा अभिमान असला तरी तुझी ही मस्ती आमच्यासमोर चालायची नाहीं."

हें त्यांचें भाषण ऐकून विष्णु उद्गारला, "ठीक आहे. युद्धाला सिद्ध व्हा. आपल्या अंगांत सामर्थ्य असल्यावांचून कोणी युद्धामध्यें मारावयास तयार होणार नाहीं."

मधु-कैटभ म्हणाले, "अरे तुला चार हात आहेत यामुळें तुला आपल्या शक्तीचा गर्व असावा असें वाटतें. तुझ्या अंगीं जर खरा पराक्रम असेल तर तूं आमच्याबरोबर बाहुयुद्धाला तयार हो."

हें भाषण ऐकून विष्णूनें आपलीं सर्व आयुधें खालीं ठेवलीं आणि आपल्या चार बाहूंनीं त्या उभयतां दैत्यांबरोबर मल्लयुद्ध करण्यास आरंभ केला. डोक्यांशीं डोकें, मांड्यांशीं मांड्या, हातांशीं हात, नाकांशीं नाक आणि खांद्यांशीं खांदा भिडवून ते तिघें मल्लयुद्ध करूं लागले. त्यांनीं एकमेकांवर पुष्कळ डावपेच लढविले आणि परस्परांवर मुष्टिप्रहार केले. याप्रमाणें पांच हजार वर्षें त्यांचें मल्लयुद्ध चाललें होतें, पण विष्णु त्या दैत्यांचा पराभव करूं शकला नाहीं. यामुळें विष्णूनें युद्ध बंद केलें आणि गायनांत कुशल अशा गंधर्वाचें रूप त्यानें धारण केलें. त्यानें उत्तम वीणा घेतली आणि तिच्या स्वरांत गायन करण्यास प्रारंभ केला. त्याच्या गायनानें हरिण आदिकरून वन्य श्वापदेंहि मोहित झालीं. मग देव, गंधर्व, राक्षस यांना आनंद झाला यांत आश्चर्य नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं त्यांचें गायन ऐकलें त्यांचे सर्व व्यवसाय बंद पडले. कैलास पर्वतावर वास करणाऱ्या शंकरांनीं तें गाणें ऐकलें. त्यामुळें त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं आपले निकुंभ आणि पुष्पदंत हे दोन गण त्या गाणाऱ्याला आणण्यासाठीं पाठविलें. त्यांच्याबरोबर विष्णु मोठ्या आनंदानें कैलास पर्वतावर गेला. तेथें मस्तकावर चंद्र, अर्धांगी पार्वती, अंगावर हत्तीचें कातडें आणि गळ्यांत

रुंडमाळा धारण केल्या आहेत अशा शंकराचें त्यानें दर्शन घेतलें व भक्तियुक्त अंतःकरणानें त्याला नमस्कार केला. शंकरानें विष्णूला ओळखलें आणि त्याला उत्थापन दिलें; व आपल्या हातानें त्यानें त्यास आसनावर बसविलें.

नंतर विष्णु म्हणाला, " धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांचा लाभ करून देणारें आपलें दर्शन आज झालें त्यामुळें मीं आज धन्य झालों." असें म्हणून विष्णूनें वीणास्वरासह मंजुळ आणि शास्त्रोक्त गायन केलें. त्या गाण्यानें कार्तिकेय, गणपति, पार्वती, देव आणि ऋषि यांस आनंद झाला. शंकरांना तर त्या गाण्यानें इतका आनंद झाला कीं, ते आपल्या आसनावरून उठले आणि विष्णूजवळ जाऊन त्याला प्रेमानें आलिंगन दिलें. शंकर म्हणाले, " मी अत्यंत प्रसन्न झालों आहें तरी तूं इच्छित वर मागून घे."

त्यावेळीं विष्णूनें त्या मधु-कैटभ दैत्यांसंबंधीं इत्थंभूत वृत्तान्त निवेदन केला, आणि त्यांच्या वधाचा उपाय विचारला. तेव्हां शंकर म्हणाले, " युद्धाला सुरुवात करण्यापूर्वीं तूं गणेशाचें पूजन केलें नाहींस म्हणून तुला जय मिळाला नाहीं. आतां तूं गजाननाचें पूजन करून युद्धाला जा."

विष्णूनें विचारलें, " शंकरा, गजाननाची उपासना कशी करावी तें मला सांगा."

" विनायकाला प्रसन्न करून घेण्याचे निरनिराळे सात कोटि मंत्र आहेत. त्यांत एकाक्षर आणि षडक्षर असे दोन मंत्र प्रमुख आहेत. त्यांपैकीं एक मंत्र मी तुला सांगतों."

असें म्हणून शंकरांनीं विष्णूला षडक्षर मंत्राचा उपदेश केला. तो ऐकून त्याच्या अनुष्ठानासाठीं विष्णु निघून गेला.

विष्णु सिद्धिक्षेत्र या नांवाच्या प्रसिद्ध क्षेत्रांत गेला आणि त्यानें तेथें

तपश्चर्या केली. त्या ठिकाणीं विष्णूनें विधियुक्त षडक्षरी मंत्राचा जप केला. शंभर वर्षेपर्यंत हा जप केल्यावर त्याला गणपति प्रसन्न झाला, आणि तो विष्णूला म्हणाला, " हें गरुडध्वजा, तुझ्या तपश्चर्येनें मी प्रसन्न झालों आहे. यासाठीं तूं हवा असलेला वर मागून घे. तूं पूर्वींच माझें स्मरण केलें असतेंस तर तुला मागेंच जय मिळाला असता. "

हें ऐकून विष्णूनें गणपतीची स्तुति केली आणि मधु-कैटभांचा नाश करण्याविषयीं वर मागितला. आणि शिवाय आणखी कोणी दैत्य निर्माण झाला तर त्याचा संहार करण्याची शक्ति आपल्या अंगीं असावी असाहि वर त्यानें शंकरांकडून मागून घेतला.

विष्णूला ज्या ठिकाणीं वरप्राप्ति झाली त्या ठिकाणीं त्यानें एक मोठें भव्य असें, चार द्वारांनीं युक्त, देवालय बांधलें; आणि त्यांत गंडकी शिलेची गजाननाची मूर्ति त्यानें स्थापन केली. तेथें विष्णूला सिद्धि मिळाली म्हणून त्या मूर्तीला सिद्धिविनायक असें नांव दिलें. त्या दिवसापासून हें क्षेत्र सिद्धिक्षेत्र म्हणून त्रिभुवनांत प्रसिद्ध झालें.

नंतर विष्णु पुन्हां मधु-कैटभांबरोबर युद्ध करण्यासाठीं गेला. कित्येक दिवस युद्ध झाल्यावर विष्णु त्या दैत्यांना म्हणाला, " दैत्यांनो, तुम्ही माझे इतके प्रहार सहन केलेत आणि त्यांतून निभावलांत हें पाहून तुमच्या शौर्यानें मला आनंद होत आहे. आजपर्यंत तुमच्यासारखे योद्धे माझ्या पहाण्यांत आले नव्हते. तरी तुम्हाला जर एखादा वर मागावयाचा असेल तर तो मागून घ्या. "

विष्णूचें हें भाषण ऐकून ते राक्षस हंसून म्हणाले, " तुलाच आमच्याकडून एखादा वर हवा असेल तर मागून घे. आमच्याबरोबर तूं युद्धांत इतका तरी टिकलास हें पाहून आम्हांलाहि तुझ्या पराक्रमाबद्दल आनंद होत आहे. "

मायेनें मोहित झालेले ते राक्षस विष्णूला वर देण्याला प्रवृत्त झाले.


विष्णु म्हणाला, "तुम्ही जर वर देणार असाल तर तुम्हीं माझ्या हातून मरावें असा वर द्या."

हें त्याचें भाषण ऐकून त्या दैत्यांनीं आपल्या भोंवतीं दृष्टि टाकली, तेव्हा सर्व सृष्टि जलमय झाली आहे असें त्यांना दिसलें. हें दृश्य पाहून ते दैत्य म्हणाले, "हे गरुडध्वजा, तुझा प्रताप आम्हांला माहीत नाहीं असें नाहीं. तुझ्या हातून मरण आलें असतां मुक्ति मिळते; यासाठीं तूं खुशाल आमचा वध कर. पण ज्या ठिकाणीं पाणी नसेल तेथें मात्र आमचा प्राण घे."

हें त्या दैत्यांचें भाषण ऐकून विष्णूनें त्यांस आपल्या मांडीवर घेतलें आणि आपल्या हातांतील सुदर्शनचक्रानें त्यानें त्यांचा वध केला.

विष्णूच्या पादस्पर्शानें आणि सिद्धिविनायकाच्या प्रस्थापनेनें पुनीत झालेली अशी ही वंदनीय भूमि आहे.

* * *



# ३. पालीचा बल्लाळेश्वर

कुलाबा जिल्ह्यांत सरसगडच्या पायथ्याशीं पाली हें गांव आहे. त्या गांवाचा हा बल्लाळेश्वर. देवालय पूर्वाभिमुखीं आहे. बल्लाळेश्वराची मूर्ति रुंदट आहे. या मूर्तीची उँची ३ फूट आहे, कपाळाचा भाग खोलगट. मूर्तीच्या गोलाईमध्येंच तोंडाचा भाग येतो. या तोंडाचा भाग अगदीं सुस्पष्ट आहे. सोंड डावी. डोळ्यांत व बेंबींत लखलखीत हिरे. सिंहासन दगडी, मागील प्रभावळ चांदीची, त्यावर ऋद्धि-सिद्धीच्या मूर्ती चवऱ्या वारीत आहेत असा एकूण थाट आहे.

देवांचा आंतील गाभारा सुमारें १५ फूट उंच आहे. बाहेरच्या उंदराचा गाभारा बारा फूट उंच असावा. त्या गाभाऱ्यांत उंदराची डौलदार मूर्ति हातांत मोदक घेऊन गणपतीकडे बघत उभी आहे. देवालयाच्या मूळ गाभाऱ्यांत शिरतांना बेगडी दरवाजा आहे. आंत मूळ गाभाऱ्यांत शिर-

तांना चौकोनी दरवाजा आहे. बाहेरील गाभाऱ्यांतून बाहेर पडतांना दगडी कमानीचा दरवाजा आहे. देवासमोर शंकराचा मुखवटा आहे. पालखीसाठीं देवाच्या दोन उभ्या मूर्ती व पादुका उंदराच्या गाभाऱ्यांत दक्षिणेला ठेवलेल्या दिसतात. उंदराच्या गाभाऱ्यांत पूर्वाभिमुखी असे दोन कोनाडे आहेत. देवाकडे तोंड केलें कीं त्या कोनाड्यांत डाव्या बाजूला देवीची संगमरवरी मूर्ति आहे व दुसऱ्या कोनाड्यांत देवीची तांब्याची चतुर्भुज मूर्ति दिसते.

बाहेरचा सभामंडप सुमारें ४० फूट लांब व २० फूट रुंद आहे. या सभामंडपांत ८ सुरूचे नक्षीचे खांब दिसतात. खांबांत डौलदार कमानी आहेत. सभामंडपांत दक्षिण व उत्तर दिशांना गॅलऱ्या आहेत. या सभामंडपांतून बाहेर पडतांना दगडी कमान असून वर चौघड्याची माडी आहे. देवालयासमोर दोन घाट व तळीं आहेत. तीं पाण्यानें भरलेलीं असतात. बाहेरच्या कमानींत नारोशंकरी मोठी घंटा आहे. कोण्या एका पेणच्या भक्तानें बाहेरच्या सभामंडपांत पूर्वाभिमुखी असे दोन उभे मोठे कॉंक्रीटचे हत्ती बसविले आहेत.

बल्लाळेश्वराचें दगडी देऊळ प्रचंड असून सारेंच देवालय नक्षीदार आहे. सभोंवारची प्रदक्षिणा उणीपुरी १०० फुटांची आहे. प्रचंड देवालयावरचा कळस फारच शोभिवंत दिसतो. देवालयांत दक्षिण व उत्तर दिशांना दोन ओवऱ्याहि आहेत.

## पौराणिक कथा

एका कृतयुगांत पल्लीपूर नांवाच्या सुप्रसिद्ध नगरांत कल्याण नांवाचा महान् श्रीमंत वैश्य राहत होता. त्याची पत्नी इंदुमति. तिच्या माहेरीं सर्व गणेशभक्त होते. ती गरोदर असतांना प्रसूतीसाठीं माहेरीं गेली होती.

इंदुमतीचा भाऊ सुंदरश्रेष्ठी यानें प्रार्थना केल्यावरून, त्यावेळीं मुद्गल ऋषींचे एक मुख्य शिष्य कौंडिण्यऋषि तेथें आले होते. त्यांचें गाणपत सिद्धांतावर व्याख्यान चालूं असतांना गर्भवती इंदुमति त्यांच्या जवळ बसली होती, त्यावेळीं तिच्या गर्भांतील बालकानें हुंकार देऊन सर्व उपदेश श्रवण केला.

पुढें इंदुमति प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. त्याचें नांव बल्लाळ. गर्भांत असतांना त्यानें गणेशसिद्धांत श्रवण केला होता आणि त्याचा संस्कार त्याच्या मनावर झालेला होता. यामुळें बाळपणींच तो गणेशाचें भजन-पूजन करूं लागला. त्याचे बालमित्रहि त्याचें अनुकरण करूं लागले. त्या मुलांच्या खाण्यापिण्याला विलंब होऊं लागला त्यामुळें त्यांच्या प्रकृतींवर परिणाम होऊन तीं खालावत चाललीं.

आपलीं मुलें बल्लाळाच्या नादीं लागलीं आहेत असें त्यांच्या वडिलांच्या लक्षांत आलें. ते बल्लाळाच्या वडिलांकडे—कल्याणश्रेष्ठींकडे गेले व आपलीं मुलें बल्लाळाच्या नादीं लागून बिघडलीं आहेत अशी तक्रार करून बल्लाळाला आवरण्याविषयीं कल्याणश्रेष्ठीला त्यांनीं ताकीद दिली. कल्याणश्रेष्ठीनेंहि आपल्या मुलाला लागलेला भजनपूजनाचा नाद सोडून देण्याबद्दल समजावून सांगितलें.

एकंदरींत आपल्या भक्तिमार्गांत लोकांचा प्रतिबंध होत आहे असें जाणून बल्लाळानें आपला कार्यक्रम स्थगित न करतां फक्त त्यांत बदल केला. तो नगराबाहेर उपवनांत जाऊन तेथेंच निवांतपणें गणेशाचें भजन-पूजन करूं लागला. मोठ्या पहाटेस उपवनांत जावें आणि रात्रीपर्यंत गणेशपूजनांत गर्क असावें व आपलें आन्हिक उरकल्यावर घरीं यावें असा त्याचा कार्यक्रम चालू झाला. त्याचे सोबतीहि रात्रीपर्यंत त्याच्याबरोबर राहूं लागले. त्या नादांत त्यांना जेवणाखाण्याचें स्मरणहि राहत नसे; इतके ते सर्वजण श्रीगणेशाच्या भक्तींत रंगून जात.

आपलीं मुलें बल्लाळाच्या संगतीनें जास्तच बिघडलीं असें वाटून त्या मुलांचे बाप पुन्हा कल्याणश्रेष्ठीकडे आले. ते कल्याणाला रागानें म्हणाले, "कल्याणशेटजी, अजूनहि तुम्ही आपल्या मुलाकडे कसें लक्ष देत नाहीं? आतां गोष्टी कोणत्या थराला गेल्या आहेत याचें तुम्हांला भान आहे का? तुमचा तो कारटा बल्लाळ सकाळींच उठून वनांत जातो आणि रात्रीपर्यंत गांवांत परत येत नाहीं. त्याच्या नादानें आमच्या लहान मुलांची काय अवस्था झाली आहे ती पहा. अहो, दिवसांतून त्यांना तीन तीनदां खाण्याची सवय, त्यांना आतां एकदांहि अन्न मिळण्याची पंचाईत! याचा परिणाम काय होणार हें अजूनहि तुमच्या लक्षांत कसें येत नाहीं? तुम्हांला तुमच्या मुलाबद्दल कांहीं वाटत नसलें तरी आम्हांला आमच्या मुलांचा बंदोबस्त करणें जरूर आहे. आतां आम्ही तुम्हाला निक्षून सांगतों कीं तुम्ही जर आपल्या मुलाचा बंदोबस्त केला नाहीं तर ही सर्व हकीगत नगराधिपाच्या कानांवर घालावी लागेल आणि त्यांच्याकडून या प्रकरणाचा निकाला लावून घ्यावा लागेल. कदाचित् या त्रासामुळें आपलें बिऱ्हाडहि या गांवांतून हालवावें लागेल. हें आमचें अखेरचें सांगणें आहे. याउप्पर तुम्हाला काय करायचें असेल तें करा."

असें सांगून ती सर्व मंडळी आपआपल्या घरीं निघून गेली.

पल्ली शहरांत कल्याणश्रेष्ठीला मोठा मान होता. त्याची कीर्ति सर्वत्र पसरलेली होती आणि तो सात्त्विक प्रवृत्तीचा होता. कोणाकडून वेडावाकडा शब्द ऐकून घेण्याचा त्याला कधींहि प्रसंग आला नव्हता. असें असतां गांवांतील कांहीं सभ्य गृहस्थांनीं आणि त्याच्या कांहीं मित्रमंडळींनीं बल्लाळाबद्दल जी कागाळी केली तिच्यामुळें त्याचें मन विषण्ण झालें. त्यांच्या कटुतर भाषणानें त्याच्या मर्मावर घाव बसला आणि तो क्रोधानें लाल झाला. त्याचें देहभान नष्ट झालें. मागला पुढला विचार न करतां त्यानें आपल्या हातांत एक सोटा घेतला आणि ज्या वनामध्यें बल्लाळ

आणि त्याचे मित्र होते तेथें तो गेला. त्या वेळचा त्याचा तो आवेश आणि ती क्रोधाविष्ट मुद्रा कोणी पाहिली असती तर प्रत्यक्ष त्याच्या मित्रांनाहि कदाचित् त्याची ओळख पटली नसती. बल्लाळासारखें पुत्ररत्न आणि तेंहि गणेशभक्तींत सर्वकाळ निमग्न असलेलें असें पूर्वपुण्याईनें प्राप्त झालें असतां त्याच्याविषयीं कल्याणश्रेष्ठीच्या मनांत दुष्ट विचार कां यावेत ? मनुष्याचें जीवन, त्याच्या आयुष्यांतील क्रियमाणाप्रमाणें पापपुण्य-मिश्रित असतें. कांहीं अपवाद सोडून मनुष्य आपल्या आयुष्यांत पाप-कर्मेंच करतो किंवा पुण्यकर्मेंच करतो असें होत नाहीं. त्याचीं सर्व कर्में पापपुण्यमिश्रित असतात. कल्याणशेटजीच्या पूर्वपुण्याईनें त्याला जरी सत्पुत्र झाला तरी पूर्वजन्मांतील पापातिरेकामुळें त्याला पुत्राचा घात करण्याची इच्छा झाली असेंच म्हणावें लागतें. नाहींतर सत्त्वसंपन्न, दया-शील आणि पुत्रावर प्रेम करणाऱ्या कल्याणश्रेष्ठीच्या अंतःकरणांत आसुरी वृत्तीलाहि लाजविणारा निष्ठुरपणा कां निर्माण व्हावा ? त्यानें विवेकभ्रष्ट कां व्हावें ?

कल्याणशेटी मोठ्या रागानें बल्लाळाचें पारिपत्य करण्यासाठीं वनांत गेले. ज्या ठिकाणीं बल्लाळ गणेशाचें भजनपूजन करीत असे, तो वनप्रदेश झाडून स्वच्छ केलेला आहे, तेथें झाडाच्या फांद्या तोडून एक छोटे-खानी सुंदर मंडप घातला आहे, नाना प्रकारच्या वृक्षवेलींनीं आणि हरतऱ्हेच्या पुष्पांनीं आजूबाजूच्या परिसराला शोभा आणलेली आहे, मंडपाच्या मध्यभागीं एक दगडाचें सिंहासन केलें असून त्याच्यावर गणेशाच्या सोंडेसारख्या स्वयंसिद्ध आकाराच्या पाषाणाची प्रतिष्ठा करून त्याला शेंदूर लावला आहे, अनेक प्रकारच्या पुष्पांनीं आणि दूर्वांकुरांनीं त्या गणेशाची पूजा बांधली असून त्याच्यासमोर भक्त बल्लाळ डोळे मिटून शरीराची हालचाल न करतां स्वस्थ चित्तानें ध्यान-मग्न असा बसला आहे, असें दृश्य कल्याणश्रेष्ठीनें अवलोकन केलें.

या वेळीं वल्लाळाच्या बालमित्रांचें काय चाललें होतें ? कोणी वल्लाळा-जवळ पुष्पमालादि पूजासामग्री ठेवली होती. कोणी माळा गुंफीत आहेत, कोणी फुलें निवडून ठेवीत आहेत, कोणी शमी, मांदार, दूर्वांची गणती करीत आहेत, कोणी नामजपांत गुंतले आहेत, कोणी भजन करीत आहेत, कोणी पुराणिकाचा आव आणून पुराण सांगत आहेत आणि त्यांच्या संभोवतीं बालचमूचा श्रोतृवृंद बसून पुराण ऐकत आहे, कित्येकजण आसनावर बसून वल्लाळाप्रमाणें ध्यान करीत आहेत; अशा प्रकारें जो तो आपल्या कामांत गर्क झालेला दिसत आहे, असें दृश्य कल्याणश्रेष्ठीला दिसलें. बाल्यावस्थेंत निरागस आणि अत्यंत शुद्ध मनानें घेतलेला तो नाद ! ती त्यांची सहजा-वस्थाच होय. ब्रह्मानंदीं टाळी लागल्यावर मनुष्य देहधर्म विसरून जातो. मग अशा स्थितींत त्या मुलांना भुकेची बाधा ती काय होणार ? अर्थात् त्या मुलांना खाण्यापिण्याचें स्मरण झालें नाहीं तर त्यांत नवल नाहीं.

हा सर्व प्रकार पाहून कल्याणशेटजींचा संताप अनावर झाला. ते मोठ्यानें ओरडून वल्लाळाच्या अंगावर चालून गेले. त्यांचा तो भीषण अवतार पाहून वल्लाळाचे सोबती वाट फुटेल तिकडे पळून गेले. परंतु भक्त वल्लाळ मात्र आपल्या जागेवरून रेसमात्र हलला नाहीं. त्याच्या बापानें प्रथम आपल्या सोट्यानें मंडप मोडून टाकला, आणि पूजेची सामग्री दूर भिरकावून दिली; दगडाची मूर्ति सिंहासनावरून उचलून फेकून दिली आणि वेड्यावाकड्या शब्दांचा भडिमार करीत वल्लाळाच्या—त्या सुकुमार बालकाच्या—अंगावर सोट्याचे प्रहार केले. त्या भयंकर मारानें वल्लाळाच्या अंगावर जखमा होऊन त्यांतून रक्त वाहूं लागलें, आणि तो बेशुद्ध पडला. तरीहि त्याच्या निर्घृण बापाला त्याची दया आली नाहीं. त्यानें तशाहि अवस्थेंत मुलाला रानांतील वेलींनीं एका झाडाला बांधून टाकलें.

मग कल्याणशेटजीच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला. तो मुलाला उद्देशून

म्हणाला, " दुष्ट कार्ट्या, मी आजपर्यंत या नगरींत मानसन्मान आणि कीर्ति मिळवली, तिच्यावर तूं विरजण घातलेंस. खरोखर तूं माझ्या पोटीं कुलांगार निपजलास! या पेक्षां तूं जन्मतःच कां मेला नाहींस? अरे आजपर्यंत कोणाची माझ्याकडे वाकड्या नजरेनें पहाण्याची प्राज्ञा नव्हती. अशा माणसांनीं तुझ्यामुळें माझ्या तोंडावर अपमानकारक आणि मर्मभेदक भाषा वापरावी आणि मला कुटुंबासह गांवांतून हाकलून देण्याची धमकी द्यावी! ज्या अर्थीं या सर्व गोष्टी तुझ्या दुराग्रहामुळें घडून आल्या त्या अर्थीं तूं असाच या वनामध्यें उपाशी राहून मरून जा. या पुढें माझ्या घरांत पाऊल ठेवशील तर तुला प्राणालाच मुकावें लागेल. केवळ तूं माझ्या पोटीं आलास म्हणून आज मी तुला जीवदान दिलें आहे. आतां तुझा जो पाषाणाचा देव असेल त्यालाच तुझें रक्षण करूं दे. मला मात्र तूं मेलास असें पक्कें समज. "

अशा तऱ्हेचे कठोर शब्द उच्चारून कल्याणशेटी आपल्या घरीं आला. बल्लाळ तेथें एकटाच राहिला. थोड्याच वेळानें त्यानें पाहिलें तों देवाच्या मंडपाचा आणि पूजासाहित्याचा नाश झालेला आहे; त्यानें स्थापन केलेली गणेशमूर्ति जागेवर नाहीं असें त्याला दिसून आलें. त्याचें शरीर झाडाला खेंचून बांधल्यामुळें आणि असह्य मारामुळें रक्तबंबाळ झाल्यानें त्याला तीव्र वेदना होत होत्या. गणेशपूजेंत व ध्यानांत व्यत्यय आल्यामुळें त्याला परमावधीचें दुःख झालें होतें. आपल्या भक्तिमार्गांत प्रतिबंध निर्माण झाल्यानें तो भक्तश्रेष्ठ बल्लाळ परमावधीचा शोक करूं लागला.

तो म्हणाला, " हे प्रभो विघ्नराजा, भक्तांचीं विघ्नें नष्ट करण्याविषयीं आपली प्रसिद्धि आहे. मग मला माझ्या सन्मार्गांत भयंकर संकटें काय म्हणून आणलीस? आणि अद्यापहि तीं समूळ नाहींशी कां होत नाहींत? चंद्र सूर्य इत्यादि तेजोगोल कदाचित् आपले गुणधर्म टाकून देतील पण

आपण मात्र आपल्या भक्तांचा त्याग कधींहि करणार नाहीं; ही आपली श्रुतींनीं केलेली प्रशंसा व्यर्थ झाली काय ? आपल्या मूर्तिभंजकाला अजून शासन कां होत नाहीं ? माझ्यासारख्या अज्ञ बालकाच्या ठिकाणीं भक्तिभाव कोठून असणार असें तर आपणांला वाटत नाहींना ? तें कांहींहि असो; मी मात्र निश्चयपूर्वक सांगतों कीं ज्या अधमानें माझ्या भक्तींत अंतराय निर्माण केला, देवालयाचा नाश केला आणि विशेषेंकरून गणेशमूर्तीची विटंबना करून माझ्यासारख्या गणेशभक्ताला परमावधीचें दुःख दिलें तो दुष्ट अंतःकरणाचा मनुष्य या क्षणींच आंधळा, बहिरा, मुका आणि कुबडा होऊन त्याला कष्टतर अवस्था प्राप्त होईल. असें झालें म्हणजे ही माझ्या भक्तिसामर्थ्याची साक्षच होईल. हे प्रभो, गणराया, त्या दुष्टानें माझें हें शरीर वृक्षाला जखडून टाकलें असलें तरी तो माझ्या अंतःकरणांतील भक्तिरूप चित्ताला बंधनांत अडकवूं शकत नाहीं. कारण माझें चित्त स्वतंत्र आहे. त्यांत मी कोणतीहि भक्तिभावना निर्माण करूं शकेन. या नुकत्याच घडलेल्या आघातानें माझें शरीर स्थिर झालें आहे तें प्रभुचरणींच अर्पण झालें आहे असें मी समजतों. या शरीरावर झालेल्या दुखापतींमुळें आणि त्यांतून झालेल्या रक्तस्रावामुळें आतां जिवंत राहणें तर शक्यच नाहीं. म्हणून आतां प्रभूचें चिंतन करून शरीराचें विसर्जन करणेंच युक्त आहे."

भक्तश्रेष्ठ बल्लाळाचा असा निर्वाणीचा निश्चय झाला मात्र तोंच भक्तप्रिय प्रभु गणराज ब्राह्मणरूपानें तेथें प्रकट झाले. प्रभूंनीं बल्लाळाकडे पहातांक्षणींच त्यांच्या केवळ दर्शनानें त्याचें विच्छिन्न झालेलें शरीर पूर्ववत् सतेज झालें आणि तो बंधनांतून मुक्त झाला. तो गर्भावस्थेंत असतांना, त्याला झालेल्या गणेशसिद्धांताच्या शाब्दिक ज्ञानाची साक्षात्काररूपानें सिद्धि प्राप्त झाली. श्री गणराजानें आपल्या 'विनायक' अवतारांतील सरूपतेचें ऐश्वर्य व सामर्थ्य त्याला दिलें, आणि त्याला मोठ्या प्रेमानें

आपल्या अंगावर घेऊन श्री गणनाथ म्हणाले, " बाळ, तुला फार कष्ट झाले रे. तूं मला फार आवडतोस. तुझ्या भक्तींत ज्यानें विघ्न आणलें, तूं घातलेला मंडप ज्यानें मोडून टाकला, पूजासामग्रीचा नाश केला आणि तूं स्थापन केलेल्या गणेशमूर्तीला सिंहासनावरून उचलून फेकून दिलें त्याला तूं दिलेला शाप या क्षणींच फलद्रूप होईल. इतकेंच नव्हे तर त्याला पुढील जन्मींहि तुझ्या शापाचीं फळें भोगावीं लागतील यांत तिळ-मात्र शंका नाहीं. याशिवाय तुझे जे जे मनोरथ असतील ते ते सर्व परिपूर्ण होतील. तूं माझ्या एकनिष्ठ भक्तीचा प्रवर्तक असा श्रेष्ठ आचार्य होशील; व माझे अत्यंत प्रसिद्ध असलेले महागाणपत मुद्गलादि योगीन्द्र आणि माझे श्रेष्ठ भक्त तुझ्या संप्रदायाचाच अंगीकार करतील. तात्पर्य; तुला सर्व प्रकारचें वैभव प्राप्त होऊन पुष्कळ काळपर्यंत तूं या भूतला-वर राहशील आणि शेवटीं कोट्यवधि शिष्यांसह स्वानंदलोकाला जाशील."

अशा प्रकारचें प्रभूचें भाषण ऐकून बल्लाळाला मोठा आनंद झाला त्यानें प्रभूला साष्टांग नमस्कार केला आणि प्रभूचें नानाप्रकारांनीं स्तवन केलें आणि त्याची प्रार्थना केली, " मी सर्वस्वीं आपणास शरण आलों आहे. आतां तुम्हीच माझे माता-पिता सर्व कांहीं आहांत. तसेंच तुम्ही आतां माझा अंगीकारहि केला आहे. यापेक्षां अधिक असें मी काय माग-णार ? तथापि आपली आज्ञाच आहे म्हणून इतकेंच मागतों कीं आपल्या चरणीं अखंड, अव्यभिचारिणी, एकनिष्ठ दृढभक्ति असावी; शिवाय हें स्थळ मोठें गाणेशक्षेत्र म्हणून प्रसिद्ध व्हावें; आणि आपण सर्वकाळ येथें राहून भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण कराव्या. "

याप्रमाणें त्याचें भाषण ऐकतांच प्रभु गणनाथांनीं 'तथास्तु' म्हणून तेथें भूस्वानंदाप्रमाणें क्षेत्र निर्माण केलें. तत्काळ श्रीगणेशमूर्ति असलेलें भव्य देवालय उत्पन्न झालें. नंतर श्री गणनाथ म्हणाले, " या ठिकाणीं मी 'बल्लाळविनायक' या नांवानें सर्वकाळ राहून, भक्तांचें पालनपोषण

करीन, व विशेष करून भाद्रपद शु॥ ४ ला जे भक्त यात्रेसाठीं येतील त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करीन. ”

असें म्हणून ते गणेशमूर्तींत अंतर्धान पावले.

पुढें गणेशानें सांगितल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या. भक्तराज वल्लाळ भक्तियोगांत निमग्न राहून गणनाथाची आराधना करूं लागला. कल्याणशेटीला त्याच्या दुष्कर्मानुसार दुरवस्था प्राप्त झाली. त्याची पत्नी इंदुमति वल्लाळाकडे गेली आणि तिनें त्याची प्रार्थना केली. तिनें आपल्या पतीसाठीं उःशाप मागून घेतला. वल्लाळानें सांगितलें, “ कृतकर्माच्या भोगानंतर श्री गणेशाच्या कृपेनें पुढील जन्मीं त्याला व तुला सद्गति मिळेल. आतां तूं स्वस्थ मनानें पातिव्रत्यधर्माला अनुसरून पतीची सेवा करीत राहा. ”

गणेशपुराणांत आणि मुद्गलपुराणांत, बल्लाळ विनायकाजवळ ज्या मुनींनीं गणेशव्रताचें आचरण केलें त्यांचा उल्लेख आहे. लोमेशऋषीच्या उपदेशाला अनुसरून जाजलिमुनीनें श्रीबल्लाळेश्वरासन्निध दुग्धप्राशन करून चातुर्मास गणेशव्रत केलें. व्रतसमाप्तीनंतर श्री वल्लाळ विनायक त्या मुनीवर प्रसन्न झाला आणि त्या प्रभु विनायकानें त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें. नंतर प्रत्येक वर्षी चातुर्मासांत जाजलिमुनी श्री बल्लाळ विनायकाजवळ गणेशव्रत करीत असे. आपला आश्रम सोडून जाजलि श्री वल्लाळ विनायकाजवळ व्रत करण्यास गेला असा उल्लेख मुद्गलपुराणांत आहे. त्याच पुराणांत जाजलिमुनीनें चातुर्मास्य गणेशव्रताचा उपदेश शृंगऋषीचा बाप विभांडक मुनि याला केल्याबद्दल कथाभाग आला आहे. जाजलिमुनीच्या आश्रमांत राहून विभांडक मुनीनेंहि श्री बल्लाळेश्वराप्रीत्यर्थ चातुर्मास्य व्रत केलें आणि विनायकानें प्रसन्न होऊन त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें असा कथाभाग मुद्गल पुराणांत आला आहे.

श्रीबल्लाळ विनायकाच्या देवळाच्या मागील बाजूस श्री धुंडिविनायकाचें

देऊळ असून त्यांत धुंडिविनायकाची स्वयंभू मूर्ति आहे. कल्याणशेटी बल्लाळाचें पारिपत्य करण्यासाठीं वनांत गेला तेव्हां बल्लाळानें केलेला मंडप त्यानें मोडून टाकला आणि बल्लाळानें स्थापन केलेली गणेशमूर्ति उचलून फेकून दिली ही हकीगत पूर्वी आलेलीच आहे. कल्याणशेटींनीं जी मूर्ति फेकून दिली तीच या देवळांतील धुंडिराजाची म्हणजे धुंडि-विनायकाची मूर्ति अशी दंतकथा परंपरागत चालत आलेली आहे. म्हणून ज्या दिवशीं बल्लाळ विनायकाला लघुरुद्र व अथर्वशीर्षाचीं आवर्तनें अस-तील त्या दिवशीं आणि त्याच वेळीं आद्यपीठ म्हणून श्री धुंडिराज विनायकाला प्रथम आवर्तनें करावयाचीं अशी पद्धत प्राचीन कालापासून चालत आलेली आहे.


हें प्रकरण पुरें करण्यापूर्वीं एका वादग्रस्त मुद्यासंबधीं दोन शब्द लिहिणें आवश्यक आहे असें वाटतें. गणेश पुराणांत आणि मुद्गल पुराणांत बल्लाळाची हकीगत सिंधु देशांत पल्लीपुर येथें घडली असा उल्लेख आहे.

" सिंधुदेशेऽतिविख्याता पल्ली नाम्नाऽभवत्पुरी ।
तस्यामासीद्धनी वैश्यः श्रेष्ठः कल्याणसंज्ञकः ॥ " गणेशपुराण १।२२।८.

कित्येकांच्या मतें ही हकीगत सिंध प्रांतांत घडली; आणि बल्लाळाची कथा कुलाबा जिल्ह्यांतील पालीच्या बल्लाळाशीं निगडित आहे असा इकडील लोकांचा समज आहे. सिंधु देश कोणता याचा उलगडा झाला म्हणजे या वादाचा निकाल लागतो.

माझ्या मतें पूर्वींचा प्राचीन काळचा सिंधुदेश म्हणजे सांप्रतचें कोंकण. सिंधु याचा अर्थ समुद्र असा आहे. तेव्हां ज्या देशाला समुद्र लागून आहे तो देश आणि हें वर्णन कोंकण प्रांताला तंतोतंत लागू पडतें. म्हणून बल्लाळाची हकीगत कुलाबा जिल्ह्यांतील पाली येथेंच घडली असें मानण्यांत मुळींच चूक नाहीं.

* * *



## ४. महडचा वरदविनायक

महडच्या वरदविनायकाचें देवालय पूर्वाभिमुखी आहे. या विनायकाची सोंड डावी आहे. दगडी महिरपी नक्षीदार सिंहासनावर ही मूर्ति विराजमान झालेली आहे. या सिंहासनावर दोन हत्ती असून मध्यें देवी आहे. गणेशाची मूर्ति कांहींशी अलग आहे. आंतील सभामंडप ८ फूट लांब व ८ फूट रुंद म्हणजे चौरस आहे. मुख्य देवालयांतील गोल घुमटाची उंची २० ते २५ फूट असावी. मूळ गाभाऱ्यांत प्रवेश करतांना दगडी कोरीव ऋद्धिसिद्धीच्या मूर्ती आहेत. दोन्ही बाजूच्या देवळींत गणपतीच्या दोन मूर्ती दिसतात. उजव्या बाजूची मूर्ति संगमरवरी असून ती उजव्या सोंडेची आहे. डाव्या बाजूची मूर्ति साधी शेंदूरचर्चित आहे. देवालयांत प्रवेश करतांना वरील बाजूस गणपतीची मूर्ती दिसते. बाहेरचा सभामंडप ४० फूट × ४० फूट एवढा औरस चौरस असून चौफेर गॅलरीवजा माडी आहे.

बाहेरच्या सभामंडपांत ६ खांब आहेत आणि मध्यें हंड्या झुंबरें टांगलेलीं आहेत.

बाहेरून मूळ देवालयाऐवजीं कौलारू साधें घर दिसतें. आंतील मुख्य देवालय कोरीव दगडाचें आहे. देवळाच्या चारी बाजूंना हत्तीच्या दोन दोन मूर्ति कोरलेल्या आहेत. देवळाच्या उत्तर दिशेला गोमुख असून याच गोमुखांतून तीर्थ खालीं पडतें. देवळाच्या घुमटावर सोनेरी रंगाचा कळस आहे. घुमटावर वरच्या बाजूला नागाची नक्षी आहे.

गांवापासून सुमारें एक मैल अंतरावर पाताळगंगा या नांवाची पश्चिमवाहिनी नदी आहे. देवळाच्या पाठीमागें पश्चिम बाजूस देवाचें तळें आहे व पिंपळाचा पार आहे. या तळ्याला उन्हाळ्यांत फक्त दोन महिने पाणी नसतें. एरवी हें तळें पाण्यानें भरलेलें असतें. देवळाच्या उत्तरेला एक जुनी पडकी समाधि आहे. ती कोण्या आपटे नांवाच्या गृहस्थाची आहे असें सांगतात. याच दिशेला गांवदेवीचें देऊळ आहे. देवालयाच्या उत्तर दिशेला अखंड दगडाचा एक उत्तराभिमुखी कोनाडा आहे. प्रथम याच कोनाड्यांत श्रींची वस्ती होती. त्यानंतर वरदविनायकाची स्थापना सध्याच्या प्रमुख देवालयांत झाली.

असें सांगतात कीं ही वरदविनायकाची मूर्ती देवालयाच्या पाठीमागच्या तळ्यांतून निघाली. सन १६९० सालीं धोंडू पौडकर नांवाच्या गुरवाला दृष्टान्त झाला. त्या दृष्टान्तानुसार हा गणपति त्याला तळ्यांत मिळाला. नंतर त्यानें या गणपतीची तळ्याजवळच्या कोनाड्यांत स्थापना केली. पुढें १७१४ सालीं महड व निगडी हीं गांवें हरिहरपुरी गोसावी यांना कान्होजी आंग्रे यांनीं इनाम दिलीं. त्यावेळीं महड हा भाग कल्याण-सुभ्याला जोडून होता. कल्याणचे रामाजी महादेव बिवलकर हे पेशव्यांचे सरसुभे या नात्यानें नेहमीं गांवतपासणीकरितां येथें येत असत. त्यावेळीं कोनाड्यांतील देव त्यांनीं बघितला व त्यांनीं हें प्रस्तुत

देवालय बांधलें. हें देवालय बांधल्यावर देवळांत विनायकाची मूर्ति आणली व गुरवांना पहिली सनद १६९० सालीं शाहूमहाराजांनीं करून दिली. पेशव्यांची दुसरी सनद सुमारें १७३० सालीं, हें देवालय पूर्ण बांधल्यावर मिळाली. तिसरी सनद इंग्रजी अमदानींत १८९४ सालीं मिळाली. प्रस्तुत देवालय सन १७२० ते १७३० या दरम्यानच्या काळांत बांधलें. १७५७ सालीं हें गांव रामाजी महादेव सुभेदार यांनीं गणपतीच्या नांवानें केलें.

हरिहर गोसावी यांच्या नंतर १७३८ ते १७६० या काळांत कंचनपुरी या नांवाच्या एका तपस्व्याकडे हा गांव होता. तो त्यानें १७५१ ते १७६० या कालावधींत सीताराम कृष्ण मुळेकर यांचे आजे सदाशिवराव मुळेकर यांच्याकडे गहाण ठेवला होता. १७५७ सालीं उपरिनिर्दिष्ट कल्याणचे रामाजी महादेव बिवलकर हे देवस्थानाच्या तपासणीसाठीं आले होते. त्यावेळीं त्यांनीं हा गांव गहाणांतून सोडवून गणपतीच्या नांवें केला. १८९२ सालापासून या देवालयांत नंदादीप अखंड तेवत आहे. त्यासाठीं देण्यांत आलेल्या इनामांतून १६ रुपये मिळतात. देवस्थानच्या वहिवाटीबद्दल गुरवांना वार्षिक १६ रुपये सरकारकडून मिळतात. इनामदारांकडून एकूण ३१ रुपये मिळतात. १७३८ सालीं गणपतीच्या पूर्वेस हरिहर गोसावी यांनीं जिवंत समाधि घेतली. आज ती समाधि मोडकळीस आलेली दिसते. त्या समाधीची मूळ बांधणी मात्र छानदार आहे.

महड व सभोवतालचा प्रदेश अत्यंत निसर्गरम्य आहे. गांवची वस्ती कोकणच्या पद्धतीप्रमाणें विरळ आहे. यामुळें येथें कसलाहि गजबजाट नाहीं. एकांतवासांत राहून ज्याला तपश्चर्या करावयाची असेल किंवा धारणाध्यानादि योगाचरण करावयाचें असेल त्याला हें स्थान सर्वस्वीं अनुकूल असें आहे.

बाहेरच्या सभामंडपांत ६ खांब आहेत आणि मध्यें हंड्या झुंबरें टांगलेलीं आहेत.

बाहेरून मूळ देवालयाऐवजीं कौलारू साधें घर दिसतें. आंतील मुख्य देवालय कोरीव दगडाचें आहे. देवळाच्या चारी बाजूंना हत्तीच्या दोन दोन मूर्ति कोरलेल्या आहेत. देवळाच्या उत्तर दिशेला गोमुख असून याच गोमुखांतून तीर्थ खालीं पडतें. देवळाच्या घुमटावर सोनेरी रंगाचा कळस आहे. घुमटावर वरच्या बाजूला नागाची नक्षी आहे.

गांवापासून सुमारें एक मैल अंतरावर पाताळगंगा या नांवाची पश्चिमवाहिनी नदी आहे. देवळाच्या पाठीमागें पश्चिम बाजूस देवाचें तळें आहे व पिंपळाचा पार आहे. या तळ्याला उन्हाळ्यांत फक्त दोन महिने पाणी नसतें. एरवी हें तळें पाण्यानें भरलेलें असतें. देवळाच्या उत्तरेला एक जुनी पडकी समाधि आहे. ती कोण्या आपटे नांवाच्या गृहस्थाची आहे असें सांगतात. याच दिशेला गांवदेवीचें देऊळ आहे. देवालयाच्या उत्तर दिशेला अखंड दगडाचा एक उत्तराभिमुखी कोनाडा आहे. प्रथम याच कोनाड्यांत श्रींची वस्ती होती. त्यानंतर वरदविनायकाची स्थापना सध्याच्या प्रमुख देवालयांत झाली.

असें सांगतात कीं ही वरदविनायकाची मूर्ती देवालयाच्या पाठीमागच्या तळ्यांतून निघाली. सन १६९० सालीं धोंडू पौडकर नांवाच्या गुरवाला दृष्टान्त झाला. त्या दृष्टान्तानुसार हा गणपति त्याला तळ्यांत मिळाला. नंतर त्यानें या गणपतीची तळ्याजवळच्या कोनाड्यांत स्थापना केली. पुढें १७१४ सालीं महड व निगडी हीं गांवें हरिहरपुरी गोसावी यांना कान्होजी आंग्रे यांनीं इनाम दिलीं. त्यावेळीं महड हा भाग कल्याण-सुभ्याला जोडून होता. कल्याणचे रामाजी महादेव बिवलकर हे पेशव्यांचे सरसुभे या नात्यानें नेहमीं गांवतपासणीकरितां येथें येत असत. त्यावेळीं कोनाडयांतील देव त्यांनीं बघितला व त्यांनीं हें प्रस्तुत

देवालय बांधलें. हें देवालय बांधल्यावर देवळांत विनायकाची मूर्ति आणली व गुरवांना पहिली सनद १६९० सालीं शाहूमहाराजांनीं करून दिली. पेशव्यांची दुसरी सनद सुमारें १७३० सालीं, हें देवालय पूर्ण बांधल्यावर मिळाली. तिसरी सनद इंग्रजी अमदानींत १८९४ सालीं मिळाली. प्रस्तुत देवालय सन १७२० ते १७३० या दरम्यानच्या काळांत बांधलें. १७५७ सालीं हें गांव रामाजी महादेव सुभेदार यांनीं गणपतीच्या नांवानें केलें.

हरिहर गोसावी यांच्या नंतर १७३८ ते १७६० या काळांत कंचनपुरी या नांवाच्या एका तपस्व्याकडे हा गांव होता. तो त्यानें १७५१ ते १७६० या कालावधींत सीताराम कृष्ण मुळेकर यांचे आजे सदाशिवराव मुळेकर यांच्याकडे गहाण ठेवला होता. १७५७ सालीं उपरिनिर्दिष्ट कल्याणचे रामाजी महादेव बिवलकर हे देवस्थानाच्या तपासणीसाठीं आले होते. त्यावेळीं त्यांनीं हा गांव गहाणांतून सोडवून गणपतीच्या नांवें केला. १८९२ सालापासून या देवालयांत नंदादीप अखंड तेवत आहे. त्यासाठीं देण्यांत आलेल्या इनामांतून १६ रुपये मिळतात. देवस्थानच्या वहिवाटीबद्दल गुरवांना वार्षिक १६ रुपये सरकारकडून मिळतात. इनामदारांकडून एकूण ३१ रुपये मिळतात. १७३८ सालीं गणपतीच्या पूर्वेस हरिहर गोसावी यांनीं जिवंत समाधि घेतली. आज ती समाधि मोडकळीस आलेली दिसते. त्या समाधीची मूळ बांधणी मात्र छानदार आहे.

महड व सभोंवतालचा प्रदेश अत्यंत निसर्गरम्य आहे. गांवची वस्ती कोकणच्या पद्धतीप्रमाणें विरळ आहे. यामुळें येथें कसलाहि गजबजाट नाहीं. एकांतवासांत राहून ज्याला तपश्चर्या करावयाची असेल किंवा धारणाध्यानादि योगाचरण करावयाचें असेल त्याला हें स्थान सर्वस्वीं अनुकूल असें आहे.

## पौ रा णि क  क था

पूर्वी विदर्भ देशांतील कौंडिण्य नगरांत भीम या नांवाचा महान् पराक्रमी आणि दानशूर असा राजा होऊन गेला. त्याला पुत्रसंतति नसल्यामुळें तो आपलें राज्य प्रधानाच्या स्वाधीन करून आपल्या भार्येसह अरण्यांत निघून गेला. तेथें विश्वामित्र आपल्या आश्रमांत बसले होते त्यांच्याकडे तो गेला आणि अरण्यवास पत्करण्याचें कारण त्यानें विश्वामित्र ऋषीला सांगितलें. तेव्हां विश्वामित्रानें त्याला एकाक्षर मंत्राचा उपदेश केला आणि दक्षानें निर्माण केलेल्या देवालयांत त्या मंत्राचें अनुष्ठान करण्यास सांगितलें. नंतर विश्वामित्राची आज्ञा घेऊन तो परत आपल्या नगरांत आला आणि दक्षानें बांधलेल्या देवालयांत त्यानें तपश्चर्या केली. त्याला सर्व सृष्टि गणपतिमय दिसूं लागली. अशा प्रकारें भीमराजाला दिव्यदृष्टि प्राप्त झाल्यावर गजानन प्रसन्न झाला आणि त्याला प्रत्यक्ष दर्शन देऊन म्हणाला, " माझ्या प्रसादानें तुला उत्तम पुत्र होईल. तूं आतां जाऊन सुखानें आणि धर्मानें राज्य कर. "

पुढें त्या राजाला सुंदर आणि सुवर्णासारखी अंगकांति असलेला असा पुत्र झाला. ज्योतिष्यांनीं सांगितल्यावरून राजानें त्याचें नांव रुक्मांगद असें ठेवलें. मुलगा थोडा मोठा झाल्यावर राजानें त्याला उत्तम गुरूच्या स्वाधीन केलें. हा राजपुत्र अत्यंत बुद्धिमान असल्यानें त्यानें अल्पकाळांत पुष्कळ विद्या संपादन केली. रुक्मांगदाला तारुण्य प्राप्त झाल्यावर राजानें त्याला यौवराज्याचा अभिषेक केला. त्याचप्रमाणें त्याला एकाक्षर मंत्राचा उपदेशहि केला. इतक्या लहान वयांत त्याची गजाननावर पित्याहूनहि अधिक भक्ति जडली.

एके दिवशीं रुक्मांगद शिकारीसाठीं अरण्यांत गेला असतां त्यानें अनेक पशू मारले. पुष्कळ वेळ शिकार केल्यामुळें त्याला पुष्कळ परिश्रम झाले आणि थोडी विश्रांति घेण्यासाठीं तो एका शोभायमान आश्रमांत

गेला. तो आश्रम वाचक्नवि ऋषीचा होता. त्या ऋषीची मुकुंदा नांवाची सुंदर पत्नी होती. रुक्मांगद जेव्हां त्या आश्रमांत गेला तेव्हां ऋषि स्नानाला जाण्याच्या गडबडींत होता. रुक्मांगदानें त्याला नमस्कार केला. तेव्हा ऋषीनें रुक्मांगदाला आश्रमांत वसायला सांगून तो स्नानाला निघून गेला.

रुक्मांगदाला शिकारीच्या श्रमानें तहान लागली होती. त्यानें ऋषि-पत्नीला पाणी प्यावयास मागितलें. परंतु त्या सुंदर राजकुमाराला पाहून ती मुकुंदा काममोहित झाली. ती त्याला म्हणाली, "राजपुत्रा, तुला पाहून माझें मन कामतप्त झालें आहे तर तें आपल्या अधरामृतानें शांत कर."

हें तिचें बोलणें ऐकून रुक्मांगदाला खेद वाटला; व किंचित् रागानें तो तिला म्हणाला, "तुला तुझ्या रूपाचा अभिमान झाला असेल तर तो व्यर्थ आहे. परस्त्रीच्या ठिकाणीं माझें मन कदापि आसक्त होणार नाहीं. मला जरी तहान लागली आहे, तरी आतां तुझ्या हातचें पाणी पिण्याची माझी इच्छा नाहीं. हा ऋषीचा आश्रम आहे म्हणून मी येथें आलों, पण आतां येथून निघून जावें हें बरें."

असें बोलून तो जाऊं लागला तेव्हां मुकुंदेनें त्याचा हात धरला, आणि त्याला अडवून ती म्हणाली, "जो कोणी बलात्कारानें स्त्रीवर हात टाकतो तोच नरकांत जातो. स्त्री आपण होऊन वश झाली असतां तिचा स्वीकार करणाऱ्या मनुष्यास पातक लागत नाहीं. कृतयुगामध्यें आणि त्रेतायुगामध्यें ब्रह्मदेवानें स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें. जर तूं माझा धिक्कार केलास तर तुझें भस्म होईल किंवा तुला मी शाप देऊन राज्यभ्रष्ट करीन."

असें बोलून तिनें निर्लज्जपणानें त्याला आलिंगन दिलें. तेव्हां रुक्मांगदानें तिला दूर लोटून दिलें. त्यामुळें तिला क्षणभर मूर्च्छा आली. ती सावध झाल्यावर रुक्मांगद तिला म्हणाला, "या पापकर्मानें तूं नरकाचें साधन करीत

आहेस. कदाचित् समुद्र कोरडा पडेल पण मी अनाचाराला कधींहि प्रवृत्त होणार नाहीं. ”

रुक्मांगदानें आपला धिक्कार केला हें पाहून तिला फार राग आला आणि तिनें त्याला असा शाप दिला कीं, “ ज्या अर्थी तूं माझ्या मनाला कष्ट दिलेस त्या अर्थी तुझ्या सर्व अंगावर कोड फुटेल. ”

लागलीच रुक्मांगद आश्रमाबाहेर पडला आणि त्यानें आपल्या शरीराकडे पाहिलें, त्यावेळीं आपलें शरीर बगळ्यासारखें पांढरें आणि निस्तेज झाल्याचें त्याला दिसून आलें. तो म्हणाला, “ गजानना, मी तुझा असा कोणता अपराध केला म्हणून या दुष्टेच्या समोर तूं मला आणलेस ? तूं दुष्टांचा नाश करणारा आहेस; असें असून तूं या दुष्ट स्त्रीला कशासाठीं जिवंत ठेवलेंस ? सुवर्णासारखें माझें शरीर कोणत्या पापानें असें झालें तें तरी मला सांग. असो; तूंच कर्ता करविता आहेस. मी तुला शरण आहे. तुझी इच्छा जशी असेल तसें कर. लोकांपुढें हें असें शरीर घेऊन जाण्याची मला लाज वाटत आहे. मी नगरांत न जातां कोठें तरी बसून प्रायोपवेशनानें या शरीराचा त्याग करणार !”

असें बोलून तो एका वटवृक्षाखालीं जाऊन बसला.

रुक्मांगद कित्येक दिवस त्या झाडाखालीं बसला असतां एके दिवशीं नारद तेथें आला. रुक्मांगदानें त्याला नमस्कार करून क्षणभर आपल्याजवळ बसण्याबद्दल विनंति केली, आणि आपलें सर्व वृत्त त्याला निवेदन केलें. त्यावर नारद म्हणाला, “ रुक्मांगदा, इकडे येत असतां मी एक चमत्कार पाहिला. कदंब नगरांत एक मोठें देवालय असून त्यांत गजाननाची मूर्ति आहे. तिला चिंतामणि असें नांव आहे. त्या देवालयासमोर उत्तम पाण्याचें कुंड असून तेथें गजाननाचीं पावलें उमटलेलीं आहेत. कोणी एक वृद्ध महाकुष्ठी शूद्र यात्रा करतां करतां त्या कदंब नगरांत आला आणि त्यानें त्या कुंडांत स्नान केलें. त्याबरोबर त्याचें कुष्ठ

नाहींसें होऊन त्याला दिव्य शरीर प्राप्त झालें आणि गजाननाच्या सेव-कांनीं आणलेल्या विमानांत बसून तो उत्तम लोकांत गेला. असा चमत्कार मी नुकताच पाहिला आहे. म्हणून त्या तीर्थाच्या ठिकाणीं जाऊन तूं स्नान कर म्हणजे तत्काळ तूं कुष्ठमुक्त होशील. ''

नारदाचें हें भाषण ऐकून रुक्मांगदाला फार आनंद झाला. त्यानें नारदाची पूजा केली आणि त्या तीर्थाची माहिती करून घेतली.

आतां त्याला शाप देणारी मुकुंदा हिची हकीगत अशी :—

रुक्मांगद ऋषीच्या आश्रमांतून निघून गेल्यावर मुकुंदेच्या अंगांत उत्पन्न झालेला मदनाग्नि प्रज्वलित झाला, तिच्या अंगाची आग होऊं लागली. तिला अन्नपाणीहि गोड लागेनासें झालें. अशा स्थितींत एके दिवशीं ती अरण्यांतील एकांतांत आपल्या प्रियकराचें—रुक्मांगदाचें—ध्यान करीत बसली असतां तेथें तिला झोंप लागली. कामानें विव्हळ झालेली ती मुकुंदा त्या ठिकाणीं निजली असतां इंद्र तेथें आला आणि रुक्मां-गदाचें रूप धारण करून त्यानें तिचा उपभोग घेतला. त्याच वेळीं तिला गर्भ राहिला. नऊ महिने पुरे होतांच तिला पुत्र झाला. मुकुंदेच्या पापकर्माचा तिच्या पतीला पत्ता लागला नव्हता. यामुळें त्यानें त्या पुत्राचे जातकर्म आदिकरून संस्कार मोठ्या आनंदानें केले आणि त्याचें ' गृत्समद ' असें नांव ठेवलें. त्याचें पांचव्या वर्षीं उपनयन केलें आणि त्याला वेद पढविण्यास प्रारंभ केला. एके दिवशीं आगमोक्त आणि पुराणोक्त अशा सर्व मंत्रांहून श्रेष्ठ अशा ' गणानांत्वा ' या मंत्राचा त्याला उपदेश केला. या ऋङ्मंत्रानें गजानन प्रसन्न होऊन तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील असें वाचक्नवि ऋषीनें गृत्समदाला सांगितलें.

या गोष्टीला कित्येक दिवस गेले. नंतर इंद्राप्रमाणें प्रतापी, मदना-प्रमाणें सुंदर, कार्तिकेयाप्रमाणें पराक्रमी, बृहस्पतीप्रमाणें बुद्धिमान्, बली-प्रमाणें दानशूर आणि सर्वगुणसंपन्न अशा मगधदेशाच्या राजाच्या घरीं

श्राद्ध होतें. त्यासाठीं अत्रि वसिष्ठ इत्यादि महातपस्वी ऋषि बोलाविले होते. त्यांत गृत्समद ऋषिसुद्धां होता. हे सर्व ऋषि एकत्र बसले असतांना शास्त्राची चर्चा सुरू झाली. त्यावेळीं गृत्समद ऋषि मोठ्या अभिमानानें भाषण करीत असतां अत्रि ऋषीनें त्याचा धिक्कार केला. अत्रि म्हणाला, " गृत्समदा, आमच्यासमोर तूं अभिमानानें भाषण करण्याला योग्य नाहींस. तुझा जन्म ऋषीपासून झाला नसून तूं रुक्मांगद राजापासून निर्माण झाला आहेस. तूं वाचक्नवीचा औरस पुत्र नसल्यामुळें तुझी व आमची बरोबरी कशी होईल ? तूं आपल्या आश्रमांत परत जावें हें बरें."

अत्रीचें हें भाषण ऐकून गृत्समदाला फार क्रोध आला. तेव्हां प्रत्यक्ष अग्नीच प्रकट झाला आहे असा भास झाला. एक दोन ऋषीं-व्यतिरिक्त इतरांनीं पळ सुद्धां काढला. क्रोधानें कांपत कांपत गृत्समद म्हणाला, "अहो ऋषींनो, मी जर रुक्मांदगाच्या वीर्याचा ठरलों नाहीं तर मी तुमचें शापून भस्म करीन."

असें बोलून तो आपल्या मातेकडे आला, आणि तिला रागानें बोलला, " दुष्टे बोल, माझा जन्म कोणापासून झाला तें सांग. नाहीं तर तुझें भस्म होईल." हें पुत्राचें भाषण ऐकून मुकुंदा थरथर कांपूं लागली आणि त्याच्यापुढें हात जोडून तिनें त्याला झालेली सर्व हकीगत निवेदन केली. तेव्हां गृत्समद म्हणाला, " तूं हें जें पापकर्म केलें आहेस त्याचें फळ भोगण्यासाठीं तूं काटेरी बोर हो. तुझ्यावर पुष्कळ फळें येतील, पण एकहि प्राणी त्याला स्पर्श करणार नाहीं." हा शाप ऐकून मुकुंदाहि रागावली आणि ती म्हणाली, " माझ्या हातून कितीहि पाप घडलें असलें तरी मी तुझी माता आहे व यामुळें मी तुला पूज्यच आहे. तूं माझा अनादर करून मला शाप दिलास तर तूंहि माझा शाप घे. तुझ्यासारखा पाषाणहृदयी पुत्र जन्माला आला असतां किती दुःख

होतें याचा अनुभव यावा म्हणून मीहि तुला शाप देते कीं त्रैलोक्याला भय देणारा असा क्रूर राक्षस तुझ्या पोटीं जन्माला येईल."

याप्रमाणें एकमेकांनीं एकमेकांना शाप दिला. इतक्यांत 'गृत्समद इंद्राचा पुत्र आहे' अशी आकाशवाणी झाली. मुकुंदेचें तत्काळ शापानें रूपांतर होऊन तिचें एक मोठें बोरीचें काटेरी झाड झालें. मग गृत्समदहि लज्जित अंतःकरणानें तपश्चर्येला निघून गेला.

गृत्समदानें हिंडतां हिंडतां पुष्पक या नांवाच्या अरण्यांत प्रवेश केला. तें स्थान तप करण्याला योग्य आहे असें पाहून तेथेंच तपश्चर्या करण्याचा त्यानें विचार केला. आणि तेथें जे मुनी होते त्यांना नमस्कार करून त्यानें तपश्चर्येला प्रारंभ केला; पायाच्या एका अंगठ्यावर उभें राहून व नासाग्रीं दृष्टि ठेवून त्यानें इंद्रियांचें दमन केलें, वायूचा निरोध केला आणि एकाग्र चित्तानें सहस्र वर्षे गजाननाची तपश्चर्या केली. नंतर त्यानें एकदा आपले डोळे उघडले. त्यावेळीं त्यांतून निघालेला अग्नि त्रैलोक्याला त्रास देऊं लागला. हा ऋषि आतां कोणतें स्थान बळकावील याची देवांना धास्ती पडली. नंतर गृत्समदानें झाडांचीं वाळलेलीं पानें भक्षण करून पांच हजार वर्षें तपश्चर्या केली. त्याचें तें उग्र तप पाहून गजानन प्रकट झाला आणि म्हणाला, "हे ऋषे, मी तुला प्रसन्न झालों आहे. तुला जो वर मागायचा असेल तो माग."

हें गजाननाचें भाषण ऐकून गृत्समदानें त्याला साष्टांग नमस्कार घातला आणि तो म्हणाला, "गजानना, चौऱ्यांशी योनी भ्रमण करतां करतां मला मनुष्यदेह प्राप्त झाला. मनुष्यांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ, त्यांच्यामध्येंहि ज्ञानी श्रेष्ठ, त्या ज्ञान्यांमध्यें अनुष्ठानी श्रेष्ठ, त्यांच्यामध्येंहि ब्रह्मवेत्ते श्रेष्ठ; यासाठीं मला ब्रह्मज्ञान होवो व माझी गणना तुझ्या भक्तांमध्यें होऊन, देव व मनुष्यें यांस मी पूज्य व्हावें असें कर. तसेंच हें वन अत्यंत पवित्र आणि भक्तांना सिद्धिदायक व्हावें असें कर. तसेंच भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्याकरतां तूं

येथें वास कर. ''

गजानन म्हणाला, " गृत्समदा, मी तुला ब्राह्मणत्व दिलें आहे, इतकेंच नव्हे तर यापुढें तुझी वेदवेत्त्या ऋषींमध्यें गणना होईल. तूं ज्या " गणानां त्वा '' मंत्राचा जप केलास त्याच मंत्राचा ऋषि तूं होशील. ज्या अर्थीं मंत्राची देवता, छंद आणि ऋषि यांचा प्रथम उच्चार केल्याशिवाय मंत्राचें फळ प्राप्त होत नाहीं त्या अर्थीं 'गणानां त्वा' मंत्राचा ऋषि तूं झाल्यामुळें माझें स्मरण करण्यापूर्वीं लोक प्रथम तुझें नांव घेतील व एका शंकरावांचून जिंकला न जाणारा असा पुत्र तुला होईल. कलियुगांत या क्षेत्राला भद्रक असें नांव प्राप्त होईल. या क्षेत्रांत स्नान आणि दान करणारांच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. ''

असा वर दिल्यावर गजानन निघून गेला. नंतर गृत्समदानें तेथें उत्तम प्रकारचें देवालय निर्माण केलें, आणि त्यांतील मूर्तीचें नांव 'वरद विनायक' असें ठेवलें.

पुढें गृत्समदाच्या शिंकेपासून जास्वंदीच्या फुलाप्रमाणें तांबडयालाल रंगाचा असा एक पुत्र त्याला प्राप्त झाला. तोच त्रिपुरासुर होय. गृत्समदाच्या आईनें म्हणजे मुकुंदेनें त्याला जो शाप दिला होता त्याप्रमाणें हा पुत्र महापराक्रमी परंतु अत्यंत क्रूरकर्मा होता. त्याचा पुढें शंकरानें वध केला.

गृत्समद ही केवळ पौराणिक व्यक्ति नसून ती वैदिक आहे. गृत्समद हा गणेश सांप्रदायाचा श्रेष्ठ प्रवर्तक आहे. " गणानां त्वां गणपतिं हवामहे '' हा गणेशाचा मंत्र म्हणून मानला जातो. हा मंत्र म्हणण्यापूर्वीं 'गणानां त्वां शौनको गृत्समदो गणपतिर्जयति' असा प्रारंभीं उच्चार करावा लागतो. ज्याचा मद गळत आहे तो गृत्समद अशी या शब्दाची व्युत्पत्ति केली जाते. यावरून हा शब्द गणपतीलाहि लागू पडतो.


वैदिक वाङ्मयाच्या आधारानें आचार्य विनोबा भावे यांनीं आपल्या एका निबंधांत गृत्समदाविषयीं वर्णन केलें आहे. त्यानें ऋग्वेदाचें द्वितीय

मंडल रचलेलें आहे. ऋग्वेदांतील हें मंडल अत्यंत प्राचीन असून इतिहासाच्या आधारानें त्याचा काळ श्री. भावे यांनीं वीस हजार वर्षांपूर्वींचा असला पाहिजे असें ठरविलें आहे.

गृत्समद जसा ज्ञानी, भक्त आणि कवि होता तसा तो गणिती, विज्ञानवेत्ता, कृषिसंशोधक आणि विणकर कामांतहि सराईत होता. त्यानेंच प्रथम विदर्भांत ज्या जातीच्या कापसाची लागवड केली त्या जातीला लोकांनीं 'गार्त्स्यमदम्' असें नांव दिलें. त्यानें गणितांत गुणाकाराचा शोध लावला. गर्भाच्या वाढीवर चंद्रकिरणाचे जे परिणाम होतात त्याचें संशोधन यानेंच केलें. विनोबा यांनीं हे विचार जीवनतत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें मांडले आहेत. त्यांत पौराणिक कथांचा संबंध नाहीं.

वरील विवेचनावरून गृत्समद अत्यंत विद्वान होता हें स्पष्ट दिसून येतें. त्यानें आपल्या अपार बुद्धिमत्तेच्या बळावर विद्वत्तेच्या बाबतींत ब्राह्मणावरहि ताण केली. त्यानें पुष्पक अरण्यांत मोठी तपश्चर्या केली आणि "ब्राह्मणाहूनहि मला श्रेष्ठ तत्त्ववेत्ता कर" अशी वरयाचना केल्याबरोबर विनायकानें त्याच्या याचनेप्रमाणें वर दिला याचेंच हें फळ होय.

* * *



# ५. थेऊरचा चिंतामणि

पुण्यापासून सुमारें तेरा मैलांवर थेऊरच्या चिंतामणीचें हें अतिप्राचीन क्षेत्र आहे. याचा महादरवाजा उत्तराभिमुखी असला तरी देवाची मूर्ति मात्र पूर्वाभिमुखी आहे. हा गणपति डाव्या सोंडेचा आहे. चिंचवडचे सत्पुरुष श्री चिंतामण देव यांनीं सुमारें चाळीस हजार रुपये खर्चून गणपतिमंदिर बांधलें. त्यानंतर सुमारें शंभर वर्षांनीं थोरले माधवराव पेशवे यांनीं देवालयाचा सभामंडप बांधला व देवालयाचा विस्तार वाढविला. त्यानंतर हरिपंत फडके व अन्य अनेक भक्तांनीं या देवालयांत फेरफार करून त्याची शोभा व भव्यता वृद्धिंगत केली.

थोरल्या माधवराव पेशव्यांना हें स्थान फार आवडलें होतें. त्यांनीं येथें एक वाडा बांधला. राज्यकारभाराच्या कामांतून विश्रांति घेण्यासाठीं ते येथें येऊन रहात असत. देवळाच्या महाद्वारापासून नदीपर्यंत दगडी

सडक पेशव्यांनींच बांधली. नदीकडेला पश्चिमेस घाट बांधलेला आहे. दि. १८ नोव्हेंबर १७७२ रोजीं थोरले माधवराव पेशवे राजयक्ष्म्याला बळी पडले. त्यानंतर याच घाटावर त्यांची पत्नी श्री. रमाबाईसाहेब पेशवे या सती गेल्या. ती जागा नदीतीरीं अद्याप दृष्टीस पडते. त्या ठिकाणीं सतीचें वृंदावन आहे. तेथें प्रतिवर्षी रमामाधव पुण्यतिथीचा उत्सव होत असतो. थेऊर येथील पेशव्यांचा वाडा आतां पडलेला आहे तरी त्याच्या पडक्या भिंती मात्र अद्यापि त्याच्या वैभवाची साक्ष देतात.

सदर देवस्थान चिंचवड संस्थानच्या ताब्यांत आहे. थेऊर गांव श्री चिंतामणीस इनाम दिला आहे. या गांवाची सनद औरंगजेबानें दिली. चिंतामणीच्या उत्तर बाजूला जुनें थेऊर आहे. हल्लीं तेथें वस्ती नाहीं. फक्त देवळें आहेत. पूर्वीं थेऊरच्या भागांत अरण्य होतें. याच ठिकाणीं महान् गणपतिभक्त मोरया गोसावी यांनीं तपश्चर्या केली. तपश्चर्या करीत असतांना एके दिवशीं दोन वाघ त्यांच्या अंगावर चालून आले. परंतु मोरया गोसावी यांच्या योगसामर्थ्यामुळें त्या दोन्ही वाघांच्या शिळा बनल्या; व जेथें मोरया गोसावी तपश्चर्येला बसत असत त्या ठिकाणीं त्यांची छाया बनली. त्या शिळा व्याघ्रमुखी झाल्याचें भाविक लोक आजहि सांगतात. कांहीं भाविक असेंहि सांगतात कीं, प्रत्यक्ष विनायकच मोरया गोसावी यांच्यापुढें व्याघ्ररूपानें आला. त्याच्या स्मारकाचा एक दगड तेथें असून त्याला वाघ म्हणतात. मोरया गोसावी यांना याच स्थानीं सिद्धि प्राप्त झाली. त्यांनीं ज्या ठिकाणीं अनुष्ठान केलें तेथें चौथरा बांधलेला आहे.

थेऊर या गांवाला मुळा-मुठा नदीचा तिन्ही बाजूंनीं वेढा आहे. ही नदी पूर्वदिशेला भीमा नदीला मिळाली आहे. या नदीला नेहमी पाणी असतें. नदींतील डोहाला कदंबतीर्थ किंवा चिंतामणि तीर्थ अशी संज्ञा आहे.

## पौराणिक कथा

कोण्या एका कल्पारंभीं विराट्स्वरूपीं गणेशाच्या नाभींतून उत्पन्न झालेला ब्रह्मदेव आपल्या चार सहकाऱ्यांसह श्री गणेशाच्या कृपेनें सत्तासंपन्न होऊन सृष्टिकार्य करण्याला उद्युक्त झाला असतां त्याला गर्व झाला कीं "मीच एक सृष्टिकार्यकर्ता श्रेष्ठ आहे. माझाच अधिकार मोठा असल्यानें माझ्याकडेच हें विश्वजननाचें मुख्य आणि आद्य कार्य सोपविण्यांत आलें आहे. मी जर हें पहिलें कार्य करीन तरच इतरांना आपआपलीं कार्यें करतां येणार आहेत. माझ्यापेक्षां दुसरा कोण मोठा आहे?"

ब्रह्मदेवाला असा अहंकार झाला असतां त्याच्या बुद्धींत वास करणाऱ्या प्रभु विघ्नराजाला तो मिथ्या अहंकार आवडला नाहीं; तो क्रोधाविष्ट झाला. त्यामुळें नानातऱ्हेचीं भयंकर विघ्नें उत्पन्न होऊन तीं ब्रह्मदेवाला अत्यंत त्रास देऊं लागलीं. तेव्हां ब्रह्मदेव शुद्धीवर आला आणि एकंदर गोष्टीचा विचार करून श्रीविघ्नराजाला शरण गेला. नंतर ध्यानस्तवनादिकांच्या योगानें प्रभूची कृपा संपादन करून सृष्टिकार्य योग्य प्रकारें तो चालवूं लागला. त्यानें स्वस्थ मनानें विचार केला कीं, "आपण श्री गणेशापासूनच निर्माण झालों आणि त्याच्या कृपेनेंच सर्व सामर्थ्य प्राप्त होऊन मजकडून हें विश्वसृष्टीचें कार्य चालूं आहे. तें शरीरपातापर्यंत चालूं राहणार आहे; आणि तें माझ्या शाश्वत सुखाला कारणीभूत होणार आहे. परंतु मी माझें कार्य करीत असतांना मी स्वस्थितीचें अवधान राखण्याचा कितीहि यत्न केला तरी तें चित्तचांचल्यामुळें केव्हां सुटेल याचा नेम नाहीं; आणि एकदां का अवधान सुटलें म्हणजे मग माझ्या कार्याला विघातक अशा विघ्नांचा काय तोटा? याचा मला नुकताच अनुभव आलेला आहे. चित्ताची स्थिरता मोडल्यावर मनांत नाना तऱ्हेचे विकार निर्माण होतात आणि मग प्रभूच्या मायेचा तडाखा बसल्याशिवाय रहात

नाहीं. यास्तव सर्वसत्ताधीश प्रभु विघ्नराजाला सदैव शरण जाणें आवश्यक आहे. त्याच्या भक्तियोगाचा अवलंब केला पाहिजे. त्याच्यावाचून चित्त-चांचल्याच्या दोषांमुळें दुर्धर अशीं विघ्नें येतात तीं कायमचीं नाहींशी होणार नाहींत. ”

असा विचार करून ब्रह्मदेवानें ज्या ठिकाणीं पूर्वी एकार्णमंत्राचें अनुष्ठान करून सर्व सिद्धी मिळविल्या होत्या, त्याच ठिकाणीं आपल्या दोघी भार्या सावित्री आणि भारती यांसह भक्तियोगाचा आश्रय करून श्री स्वानंद प्रभूचा कृपाप्रसाद व्हावा म्हणून त्यानें आराधना सुरू केली. ब्रह्मदेवाला पूर्वींच्याच तपानें सर्व सिद्धी प्राप्त झाल्या होत्या आणि चित्ताला शांतीहि लाभली होती. पुढें विघ्नें येऊं नयेत एवढ्यासाठींच त्याचें हें अनुष्ठान चाललें असल्यामुळें त्यांत विघ्न येण्याचा संभव नव्हता. या कारणानें तें अनुष्ठान निर्विघ्नपणें चाललेलें होतें. त्याचे मोहबंध तुटले. तो एका स्वानंदप्रभूच्या ठिकाणींच लीन झाला. त्याच्या चित्तवृत्ती जेथें जेथें जात तेथें तेथें त्याला एका गणेशाविषयींच्याच प्रेमाचें भान होऊं लागलें. कसल्याहि भिन्न विषयाची स्फूर्ति अगर भान त्याच्या चित्तांत होईनासें झालें. अशा प्रकारें गणेशभक्तियोगाचाच अनुभव त्याला अगदी सहाजिकपणें प्राप्त झाला. श्री चिंतामणी गणेशाच्या ठिकाणीं सामरस्य निर्माण झालें. प्रभू त्याला वर देण्यासाठीं त्याच्या समोर प्रत्यक्ष उपस्थित झाले. त्यांनीं ब्रह्मदेवाला योगनिद्रेंतून जागें केलें. तेव्हां त्यानें सावध होऊन वर पाहिलें असतां आपल्याला वर देण्यासाठीं स्वानंदनाथच प्रत्यक्ष दिव्यरूपानें प्रकट झाला आहे असें त्याच्या निदर्शनास आलें. तेव्हां लागलीच त्यानें आपल्या दोन्ही भार्यांसह प्रभूला साष्टांग नमस्कार केला; आणि भक्तियुक्त अंतःकरणानें प्रभूचें पूजन आणि स्तवन केलें. नंतर ब्रह्मदेवानें हात जोडून प्रभूची याप्रमाणें प्रार्थना केली :—

“ मी पूर्वींच आपल्या कृपेनें कृतार्थ झालों आहे. यामुळें मला

प्राप्तव्य असें कांहींच उरलें नाहीं. परंतु मला माझ्या इच्छेप्रमाणें चित्त-शांति लाभलेली नाहीं. केव्हां केव्हां माझ्या चित्तांत नसते विक्षेप निर्माण होतात; त्याच्या योगानें माझें मन अस्थिर होऊन निरर्थक चिंतनानें तें त्रस्त होतें. तरी असा प्रसंग पुन्हां कधीं येऊं नये हीच माझी प्रार्थना आहे.

"पूर्वी अनेक प्रसंगीं याच स्थळीं याच हेतूनें मी आराधना केलेली असून आपणहि मला सर्व प्रकारच्या सिद्धी दिलेल्या आहेत. त्याच स्थळीं मीं सांप्रत आपलें आराधन केलें आहे. त्यामुळें आपण प्रसन्न होऊन वर देण्याला उद्युक्त झालांत; तरी आतां आपली भक्तियोगनिष्ठा मला द्यावी, आणि भक्तराज म्हणून माझा स्वीकार करावा. असें झालें म्हणजे पुन्हां विघ्नसंभव कदापि उद्भवणार नाहीं."

ब्रह्मदेवाच्या या भाषणानंतर प्रभु गणराज त्याला म्हणाले, "तुझ्या प्रेमामुळें मी सर्वथा मुग्ध होऊन तुझ्या स्वाधीनच होऊन राहिलों आहें. तुझ्या इच्छेप्रमाणें तुला सर्व कांहीं मिळालेलेंच आहे, याविषयीं मनांत शंका नको. तूं मुळापासून रजोगुणप्रधान, आणि प्रवृत्तिधर्माच्या ठिकाणीं तुझी नियुक्ति, यामुळें संभवणाऱ्या मिथ्याममत्वभावाचा प्रतिबंध तुला त्रासदायक वाटावा हें साहजिक आहे. त्या प्रतिबंधाचें निवारण कसें करावें याविषयीं तुला भीति वाटणें हेंहि खरें आहे. वस्तुतः मी तुझी सृष्टिकार्याच्या कामीं नियुक्ति केली असल्यानें तुला तशी भीति बाळगण्याचें कारण नव्हतें. परंतु तशी भीति वाटून तुझें चित्त अस्थिर झालें आणि तूं तपानुष्ठान केलेंस. तेव्हां मी जो तुझ्या चित्तवृत्तीचा प्रकाशक 'चिंतामणि' तो तुझ्यावर प्रसन्न होऊन तुझ्या चित्ताच्या ठिकाणीं वास करण्याची इच्छा करीत आहें. तेव्हां आतां यापुढें तुझ्या चित्ताला कोणत्याहि कारणानें अस्थिरता उत्पन्न होणार नाहीं हें सत्य समज. हें महत्तम स्थळ उपरिनिर्दिष्ट सिद्धिप्रसंगाचें स्मारक म्हणून आणि चित्त-स्थैर्याची शीघ्र सिद्धि देणारें "स्थावर क्षेत्र" म्हणून महत्तम क्षेत्रांत गणलें

जाईल; आणि मी " चिंतामणिधर गणेश " या विशिष्ट नांवाला धारण करून ब्रह्मदेवानुग्रहदाता, त्याला चित्तस्थैर्यरूपी सिद्धि देणारा, जीवत्वादि सकल मोह नष्ट करणारा या क्षेत्रांत अखंड वास करीन."

नंतर ब्रह्मदेवानें प्रभूंची पूजा केली. ती ग्रहण करून चिंतामणिधर गणेश ब्रह्मदेवाच्या अंतःकरणांत प्रवेश करून अंतर्धान पावले.

अशा प्रकारें स्वानंदेशप्रभु गणराजानें अत्यंत प्रसन्न अंतःकरणानें ब्रह्मदेवाच्या आकांक्षा पुरत्या सफल करून, आणि नवविद्या भक्तींतील सख्यभक्तीचें रहस्य सांगून मोठ्या गौरवानें आपला स्वीकार केला आहे आणि आपलें चित्तहि शांत झालें आहे हें पाहून ब्रह्मदेव संतुष्ट झाला; आणि आपल्या भार्यांसह परमानंद सुखाचा अनुभव घेऊं लागला. हें वृत्त विष्णु शिवादि ईश्वर, देवगण आणि भृगु आदि ऋषिगण यांना समजलें आणि ते सर्व त्या ठिकाणीं उपस्थित झाले. इतर गाणपत-श्रेष्ठहि त्यांत होते. त्या सर्व मंडळींनीं ब्रह्मदेवाचा फार मोठा गौरव केला. नंतर त्या ठिकाणीं प्रभूच्या वरदानाला अनुसरून ब्रह्मदेवानें " चिंतामणिधर गणेश " या नांवानें श्रीस्वानंदेश गणेशप्रभूंची स्थापना केली आणि त्यानें व जमलेल्या मंडळींनीं त्याचा मोठा उत्सव केला. नंतर ती मंडळी आपआपल्या ठिकाणीं निघून गेली.

त्रिमूर्ति ईश्वरांपैकीं एकेकाच्या अनुग्रहासाठीं प्रकाशित झालेल्या क्षेत्राला " प्राजापत्य " क्षेत्र म्हणतात. त्याप्रमाणें स्थावर क्षेत्र हें प्राजापत्यक्षेत्र होय. परंतु पुराणकारांनीं तें क्षेत्र 'ब्राह्मण' संज्ञक क्षेत्रांतच प्रमुख असल्याचें वर्णन केलें आहे. अविद्येमुळें उत्पन्न होणाऱ्या मोहजालानें त्रस्त झालेल्या साधकांच्या चित्तवृत्ति येथें शांत होऊन त्यांना योगसिद्धि व आत्मसाक्षात्कार सिद्धि निर्विघ्नपणें प्राप्त होतात हा या क्षेत्राचा महिमा आहे. हा अनुभव कित्येक साधकांनीं येथें अनुष्ठान करून घेतलेला आहे.

अशी सिद्धि ज्यांना प्राप्त झाली त्यांत पुराणकारांनीं कौंडिण्यमहर्षींची गणना

प्रामुख्यानें केली आहे. त्यांचा आश्रम याच क्षेत्रांत होता. ब्रह्मदेवाच्या अनुशासनाप्रमाणें या महर्षींनीं गाणेश मार्गाचा आश्रय करून उपासनायोगाच्या अनुष्ठानानें श्री चिंतामणिधर गणेश प्रभूचा प्रसाद प्राप्त करून घेतला. त्या प्रसादामुळें त्यांना सर्व योगसिद्धींचा पूर्ण लाभ झाला. स्थिरचित्त होऊन त्यांनीं भक्तियोगाचें रहस्य पूर्णपणें जाणलें आणि त्यांनीं श्री चिंतामणिधर देवाची आराधना केली. त्यांना दूर्वार्चनरूप अर्चनाचा नाद लागलेला होता. रोज लक्ष दूर्वांनीं श्री चिंतामणि प्रभूचें पूजन करण्याचा त्यांचा नियम होता. एक लक्ष दूर्वांची गणति करणें एकट्याला दुर्घट म्हणून या कामीं त्यांची भार्या, पुत्र आणि शिष्य-प्रशिष्य रोज सहाय्य करीत असत. अशा प्रकारें गाणेश भक्तियोग संपन्न असलेले भक्तश्रेष्ठ स्वतः तर पूर्ण सिद्ध तर असतातच पण ती महनीय सिद्धि लोकांना मिळवून देण्याविषयीं ते समर्थहि असतात. कौंडिण्य महर्षि आपल्या भक्तियोगनिष्ठेमुळें गाणेशभक्त सम्राट म्हणून श्री मुद्गलऋषींच्या पूर्ण प्रसादाला पात्र होऊन त्यांचे पट्टशिष्य बनले व ब्राह्मणश्रेष्ठ म्हणून प्रसिद्धि पावले. गणेशभक्तियोगाचा आद्यप्रवर्तक भक्तराज जो बल्लाळ तो आपल्या मातेच्या उदरांत असतांना, गाणेशसिद्धांतश्रवणाचा जो संस्कार त्याला घडला त्याचे प्रवर्तक हे कौंडिण्य महर्षीच होत. पुढें ते बल्लाळाचे गुरु झाले. त्यांनीं बल्लाळकृत भक्तियोग सूत्रांवर, त्यांचें हृद्गत व्यक्त करणारी कारिका रचून तिच्याद्वारें अधिक प्रसिद्धि मिळविली. अशा रीतीनें कौंडिण्यमहर्षींनीं ही जी प्रसिद्धि मिळविली किंवा ब्राह्मणांमध्यें श्रेष्ठता आणि ब्रह्मवेत्त्यांमध्यें अग्रेसरत्व मिळविलें तें सर्व श्री चिंतामणिधर गणेशांच्या सेवेनेंच मिळविलें.

### चिंतामणि क्षेत्राविषयीं दुसरी कथा :

एके दिवशीं नारद स्वर्गांतील अमरावतींत इंद्राच्या दर्शनाला गेले होते. तेव्हां इंद्रानें त्यांची नम्रतापूर्वक पूजा केली, आणि तो नारदाला

म्हणाला, "तूं कांहीं चमत्कार पाहिला असलास तर मला सांग."

नारदानें सांगितलें, "इंद्रा, मी आज मृत्युलोकीं गेलों असतां तेथें फिरतांना गौतम ऋषीचा सुंदर आश्रम माझ्या दृष्टीस पडला. त्या आश्रमांत गौतम ऋषि आपल्या अहिल्या नांवाच्या पत्नीसह बसला होता. ती स्त्री इतकी सुंदर आहे कीं, मी देखील तिला पाहून कामानें विव्हळ झालों. सावित्री, लक्ष्मी, इंद्राणी, ऊर्वशी, मेनका इत्यादि स्त्रिया तिला पाहून तिच्या रूपानें लज्जित होतील. इंद्रा, तुला खरेंच सांगतों कीं अशा तऱ्हेचें स्त्रीरत्न जेथें नाहीं अशी ती अमरावतीहि मला तुच्छ वाटत आहे."

अहिल्येच्या सौंदर्याचें वर्णन ऐकून इंद्राच्या मनांत मदनानें संचार केला. आपला विचार कार्यवाहींत आणण्यासाठीं त्यानें गौतमाचें रूप धारण केलें, आणि तो एकदम गौतमाच्या आश्रमांत गेला. गौतमऋषि त्या वेळीं स्नानाला गेले होते, ती संधि पाहून तो अहिल्येजवळ गेला, आणि "शय्येवर चल" असें तिला म्हणाला. अहिल्येनें त्याला प्रश्न केला, "पतिराज, ही आपली नित्याची जपजाप्याची वेळ असतां तें नित्यकृत्य सोडून दिवसा ढवळ्या भलतीच गोष्ट काढतां याला काय म्हणावें?"

यावर तो गौतमवेषधारी इंद्र तिला म्हणाला, "प्रिये, मी नदीवर स्नानाला गेलों असतांना मला तेथें एक सुंदर अप्सरा दिसली. तिच्या त्या साहजिकच शृंगारचेष्टा पाहून माझ्या अंगांत कामवासना निर्माण झाली, आणि मी तसाच तेथून परत आश्रमांत आलों. प्रिये, या वेळीं मी काममोहित झालों आहें. माझी इच्छा पूर्ण केली नाहींस तर माझे प्राणहि निघून जातील. या वेळीं तूं माझ्या मनाप्रमाणें वागली नाहींस तर मी तुला शाप देईन, किंवा संन्यास घेऊन कोठें तरी निघून जाईन."

पतिरूपी इंद्राचें हें भाषण श्रवण करून अहिल्या म्हणाली, "प्राणनाथ, आपल्या आश्रमाला योग्य अशी जप, तप, होम इत्यादि कर्मे

सोडून आपणाला भलत्याच वेळीं भलतीच इच्छा झाली हें वरें नाहीं. मी अवलेनें तुम्हांला उपदेश करणें हें योग्य नाहीं. मी आपली धर्मपत्नी असल्यामुळें आपली आज्ञा मानण्याला तयार आहें."

असें वोलून तिनें पतीची इच्छा पूर्ण केली. थोड्या वेळानें इंद्राच्या अंगाला सुगंध आल्यामुळें तिला शंका आली आणि मोठ्या त्वेषानें ती इंद्राला म्हणाली, "नीचा, दुर्जना, माझ्या पतीचें रूप घेऊन मला फशी पाडणारा तूं आहेस तरी कोण तें मला लवकर सांग. नाहीं तर मी तुझें शापून भस्म करीन."

हें अहिल्येचें क्रोधयुक्त भाषण ऐकून, इंद्रानें गौतमाचें रूप टाकून दिलें आणि त्यानें आपलें रूप प्रकट केलें. तो थरथर कांपूं लागला आणि इन्द्र असल्याचें त्यानें तिला सांगितलें. तो म्हणाला, "तुझ्या रूपाची कीर्ति ऐकून मी मोहित झालों आणि मीं हें दुष्कृत्य केलें हें खरें आहे. झाली गोष्ट आतां परत येत नाहीं. आतां तूं माझ्यावरोवर चल. मी सर्व देवांचा राजा इन्द्र आहें."

इंद्राचें हें उद्धटपणाचें भाषण ऐकून अहिल्येचा कोप अनावर झाला आणि तिच्या नेत्रांतून अग्नीचा वर्षाव होत असल्याचा इंद्राला भास झाला. ती त्याला म्हणाली, "मूर्खा, तूं माझें पातिव्रत्य भ्रष्ट केलेंस आणि आपण होऊन आपल्यावर केवढा भयंकर प्रसंग ओढवून घेतला आहेस याची तुला कल्पनाहि नसेल," असें म्हणून ती दुःखानें व्याकुळ झाली.

अहिल्या आणि इंद्र यांचें असें भाषण चालू असतां गौतमऋषि स्नानाहून परत आले. अहिल्या रोज गौतमाचे पाय धुण्यासाठीं पाणी घेऊन त्याची वाट पहात बसायची, पण त्या ऋषीला ती आसपास कोठें दिसली नाहीं. तेव्हां त्यानें तिला हाक मारली आणि "आज रोजच्याप्रमाणें आसनसुद्धां कां मांडून ठेवलें नाहींस?" असें त्यानें तिला विचारलें. तें ऐकून अहिल्या कांपत कांपत त्याच्यापुढें येऊन उभी राहिली.

तिचें पातिव्रत्य भग्न झालेलें असल्यामुळें तिला आपल्या पतीकडे वर तोंड करून पाहण्यास धीर होईना. तिनें गौतमाला साष्टांग नमस्कार घातला, आणि झालेली सर्व हकीगत सांगितली. हें वर्तमान ऐकून गौतमाला पराकाष्टेचा राग आला. तो तिला म्हणाला, "अगे दुःशीले, तुला माझा इतका सहवास झाला असतांना तुला इंद्राचें कपट ओळखतां आलें नाहीं! धिक्कार असो तुला! तूं आपल्या शीलापासून भ्रष्ट झालीस, यासाठीं तूं शिळा होऊन पड. भगवान् रामचंद्र वनवासासाठीं भ्रमण करीत जेव्हां येथें येतील तेव्हां त्यांच्या पादस्पर्शानें तुझा उद्धार होईल."

याप्रमाणें तिला गौतमानें शाप दिला तेव्हां लागलीच ती शिळा होऊन पडली. हें पाहून इन्द्र थरथर कांपूं लागला. आपण काय करावें, कोठें जावें, हें त्याला कळेना. तितक्यांत तो मांजराचें रूप घेऊन आश्रमांतून बाहेर जाऊं लागला. परंतु गौतमानें आपल्या अंतर्ज्ञानानें त्याला ओळखलें आणि म्हटलें, "अरे नीचा, तूं सर्व देवांचा राजा आहेस म्हणून मी तुझें शापून भस्म करीत नाहीं. तरीपण या निंद्य कर्माबद्दल तुला थोडें शासन केलेंच पाहिजे. तुझ्या अंगावर सहस्र भगें उत्पन्न होवोत."

इन्द्रानें त्या ऋषीचे उद्गार ऐकले तोंच आपल्या अंगावर हजारो भगें निर्माण झालेलीं इन्द्राच्या दृष्टीस पडलीं. हें पाहून त्याला अत्यंत दुःख झालें.

इन्द्र गौतमाला म्हणाला, "आजपर्यंत मला वृद्ध अशा गुरूंनीं पुष्कळ उपदेश केला, पण त्यांचें मी ऐकलें नाहीं त्याचें हें फळ मला मिळालें! आतां देवांसमोर पुन्हा जाण्यास मला तोंड राहिलें नाहीं. ज्या मदनानें माझी अशी अवस्था केली त्याला धिक्कार असो! प्राणी जें शुभाशुभ कर्म करतात त्या कर्माचें शुभाशुभ फळ भोगल्यावांचून त्यांची सुटका व्हायची नाहीं." असें म्हणून इन्द्रानें इन्द्रगोप किड्याचें रूप घेतलें आणि तो कमळाच्या देठांत लपून बसला.

इंद्र कमळाच्या देठांत लपून वसला आहे हें वर्तमान नारदाला समजलें तेव्हां तो अमरावतीमध्यें गेला आणि त्यानें बृहस्पती-सह सर्व देवांना हें वर्तमान सांगितलें. तें ऐकून देवांना काळजी लागली. नंतर सर्व देव गौतमापाशीं आले आणि त्याला म्हणाले, " अहो ऋषि-वर्य, आपल्या सामर्थ्याचें वर्णन करण्यास आम्ही असमर्थ आहों. हिमा-लयाचें महत्त्व, पावसाचे थेंब, गंगेच्या वाळवंटांतील वाळू आणि विष्णूचे गुण यांची गणना करण्याला जसा कोणी समर्थ नाहीं तसें तुझ्या सामर्थ्याचें वर्णन करण्यास कोणीहि समर्थ होणार नाहीं. तुमच्यासारख्या ऋषींची शक्ति अपार असते. कोणी सकाळीं धान्य पेरून मध्यान्हकाळीं धान्याची मळणी करतात, वालखिल्यांनीं यज्ञ करून दुसरा इंद्र निर्माण केला, अगस्तीनें एका आचमनांत समुद्र प्राशन केला. आपलें दर्शन किंवा भाषणहि पापांचा नाश करतें. अहो ऋषिवर्य, इंद्रासाठीं आम्ही सर्वजण तुमच्याकडे आलों आहों. तरी आमच्या इच्छा पूर्ण करा. "

हें ऐकून गौतम म्हणाले, " कपटी, शठ, दुष्ट, अविचारी अशा त्या इंद्रानें मोठा अपराध केला आहे. तथापि, देवाधिदेव जो गजानन याची जर त्यानें तपश्चर्या केली तर त्याचा उद्धार होईल. त्या गजाननाला प्रसन्न करून घेण्याचा मी एक मंत्र तुम्हांला सांगतो. त्या मंत्राचा तुम्ही इंद्राला उप-देश करा. म्हणजे गजाननाच्या कृपेनें तो माझ्या शापापासून मुक्त होईल. माझा शाप मात्र कधींहि खोटा होणार नाहीं. म्हणून त्याच्या अंगावर जीं भगें आहेत त्यांच्या जागीं त्याला नेत्र प्राप्त होतील; आणि यापुढें त्याला सहस्राक्ष असें नांव प्राप्त होईल. "

हें ऐकून देवांना समाधान वाटलें आणि गौतमाला नमस्कार करून ते इंद्राकडे गेले.

देवांनीं इंद्राला हाक मारून त्याला गौतम प्रसन्न झाल्याचें सांगितलें. तेव्हां तो कमळाच्या देठांतून बाहेर आला. त्या वेळीं त्याच्या अंगाची

इतकी दुर्गंधि सुटली होती कीं, देवांनीं त्याला नमस्कार केला तेव्हां त्यांना आपलीं नाकें बंद करावीं लागलीं. नंतर इंद्रानें स्नान केलें आणि प्राणायाम केला. बृहस्पतीनें त्याला षडक्षर मंत्राचा उपदेश केला. त्या मंत्राच्या प्रभावानें इन्द्राला दिव्य देह प्राप्त झाला. त्याच्या अंगावरील भगांच्या ठिकाणीं नेत्र निर्माण झाले. नंतर इन्द्र देवांना म्हणाला, " देव-हो, मी जें पापकर्म केलें होतें त्याचें फळ मला यथायोग्य असें मिळालें. परदारागमन करणारा कितीहि पराक्रमी असो, त्याला आपल्या पापाचें फळ मिळाल्यावांचून त्याची सुटका नाहीं. तसेंच गजाननाच्या मंत्राचा प्रभाव कसा आहे हें तुमच्या लक्षांत आलेंच आहे. त्या महातपस्वी आणि शांत गौतमांनीं माझें भस्म केलें नाहीं, आणि त्यानें तुम्हांला माझ्या कल्याणाचा मार्ग सांगितला म्हणूनच मला हे सहस्र नेत्रांनीं युक्त असें शरीर प्राप्त झालें."

इन्द्राला त्याचें मूळ स्वरूप प्राप्त झालें हें पाहून त्याची गजाननावर दृढभक्ति जडली. त्यानें एका वृक्षाखालीं आसन घालून एकाग्र चित्तानें नासाग्रीं दृष्टि ठेवून षडक्षर मंत्राचा जप करण्यास प्रारंभ केला. हजार वर्षें तेथें तपश्चर्या करीत बसल्यावर त्याच्या अंगावर वारुळें वाढलीं. त्याची अशी तपश्चर्या पाहून गणेश प्रसन्न झाला, आणि अग्नि किंवा सूर्य यांच्या तेजाला मागें टाकणारें असें तेजस्वी रूप धारण करून तो इन्द्रा-पुढें उभा राहिला. त्याच्या तेजानें इन्द्राचे हजार नेत्र दिपून गेले आणि तो भयभीत झाला. त्याला मंजुळवाणीनें हाक मारून गजानन म्हणाला, " इन्द्रा, भिऊं नकोस. तूं ज्याची आराधना करीत आहेस तोच मी तुझ्याजवळ आलों आहें. तुझ्यावर मी प्रसन्न झालों आहें. तरी इच्छित वर मागून घे. "

देवाचें हें भाषण ऐकून इन्द्र निर्भय झाला. नंतर त्यानें आपले नेत्र उघडले आणि तो गजाननाची स्तुति करूं लागला, " हे देवा,

तुझें वर्णन करण्याला मी असमर्थ आहें, तुला कशाचाच आधार नसून तूं या विश्वाचा आधार आहेस. तूं नित्य ज्ञानयुक्त असल्यामुळें तूं सदोदित आनंदाचाच उपभोग घेत आहेस. उग्र तपश्चर्या करून सनकादिकांना सुद्धां तुझें ज्ञान झालें नाहीं, पण तुझ्या षडक्षरी मंत्राचा प्रभाव मोठा म्हणूनच मला तुझें प्रत्यक्ष दर्शन घडलें आहे. देवा, आपण प्रसन्न झालां आहांत तरी मला आपलें कदापि विस्मरण होऊं नये असा वर मला द्या. तसेंच ज्या कदंब वृक्षाखालीं मीं आपली तपश्चर्या केली त्या वृक्षाखालीं एक मोठें नगर उत्पन्न होऊन त्याला कदंबनगर असें नांव प्राप्त व्हावें. तुझ्या मंत्राचा जयजयकार करण्यापूर्वी मी ज्या सरोवरांत स्नान केलें त्या सरोवराला चिंतामणि असें तुझें नांव मिळावें; आणि या तीर्थामध्यें जे कोणी स्नान करतील किंवा येथें जे कोणी दान करतील त्यांच्या सर्व इच्छा परिपूर्ण व्हाव्यात. ”

गजानन म्हणाले, “ इन्द्रा, ही तुझी इच्छा पूर्ण होईल. याशिवाय मी तुला आणखी एक वर देतों. ज्या ज्या वेळीं तुझ्यावर संकट येईल त्या त्या वेळीं तूं माझी प्रार्थना कर म्हणजे तुला दर्शन देऊन मी तुला त्या संकटापासून मुक्त करीन. ” असें वरप्रदान झाल्यावर इन्द्रानें स्वर्गलोकांतून गंगा आणली आणि गजाननाला स्नान घातलें आणि त्याच्या परिवारासह त्याचें पूजन केलें. गणपति अंतर्धान पावल्यावर इन्द्रानें त्या ठिकाणीं स्फटिकाची सुंदर मूर्ति स्थापन केली आणि तो स्वर्गलोकीं गेला.

## रुक्मांगदाची कुष्टमुक्तता

मागें गृत्समदाच्या कथानकांत नारदानें रुक्मांगदाला “ चिंतामणितीर्थांत स्नान केल्यानें तुझें कुष्ट नाहींसें होईल ” असें सांगितलें आहे. नारद निघून गेल्यावर रुक्मांगदाचें सैन्य त्याचा शोध काढीत त्याच्या-

जवळ आलें. आपला स्वामी आपल्याला भेटला यामुळें सैनिकांना आनंद झाला; पण त्याचें सौंदर्य नाहींसें होऊन त्याच्या सर्व अंगावर कुष्ट उत्पन्न झालेलें पाहून त्यांना फार वाईट वाटलें. अशी अवस्था कशानें झाली असें त्यांनीं रुक्मांगदाला विचारलें. त्या वेळीं राजपुत्रानें घडलेली सर्व हकिगत त्यांना सांगितली, आणि तो म्हणाला, " नारदानें सांगितल्याप्रमाणें मी आतां कदंब नगरांतील चिंतामणितीर्थावर स्नाना-साठीं जाणार आहें. तुमची इच्छा असेल तर तुम्हीहि मजबरोबर चला. त्या ठिकाणीं तुम्ही जाऊन तीर्थांत स्नान करून दान-धर्म केलांत तर तुम्ही पवित्र व्हाल. नंतर आपण पुन्हां आपल्या नगराकडे जाऊं."

रुक्मांगदाच्या या भाषणानें सर्वांना आनंद झाला आणि ते सर्व रुक्मां-गदाबरोबर चिंतामणितीर्थाकडे गेले. त्या तीर्थांत स्नान केल्याबरोबर रुक्मां-गदाचा देह पूर्वीपेक्षां अधिक सुंदर झाला. त्याच्या बरोबरच्या सैन्यानेंहि त्या ठिकाणीं स्नान केलें आणि त्यांनाहि उत्तम देह प्राप्त झाले. इतक्यांत कोटिसूर्याप्रमाणें तेजस्वी अशीं विमानें घेऊन गणेशाचे दूत खालीं उत-रले. रुक्मांगदानें त्यांना नमस्कार करून विमानें आणण्याचें कारण विचा-रलें. तेव्हां दूत म्हणाले, " रुक्मांगदा, तूं धन्य आहेस. तूं या चिंतामणी-तीर्थांत स्नान करून गजाननाचें पूजन केलेंस यामुळें तुझीं सर्व पातकें नाहींशीं झालीं आहेत. आमच्या स्वामीनें तुझी भक्ति पाहून तुला विमानांतून आपल्यापाशीं आणण्याची आम्हांला आज्ञा केल्यावरून आम्ही येथें आलों आहों."

हें ऐकून रुक्मांगद म्हणाला, " तुम्ही माझ्याकरतां विमान आणलें हें ठीक आहे, परंतु मला इतक्यांत त्याचा स्वीकार करतां येणार नाहीं. माझ्या घरीं माझे आईवडील आहेत ते माझी वाट पहात असतील. त्यांनीं मनोभावानें गजाननाची आराधना केली आहे. त्यांचा उद्धार झाल्या-वांचून मला त्यांच्या अगोदर गजाननापाशीं येतां येणार नाहीं."


तेव्हां देवदूत म्हणाले, " अशी तुझी इच्छा आहे तर तूंच त्यांच्या-साठीं या तीर्थांत स्नान कर, आणि त्या स्नानाचें पुण्य त्यांना दे म्हणजे त्यांचा उद्धार होईल, आणि तुझ्याबरोबर त्यांनाहि विमानांतून घेऊन जाऊं."

हें ऐकून रुक्मांगदानें दर्भाच्या दोन प्रतिमा केल्या आणि त्यांना उद्देशून तो म्हणाला, " हे कुशा, तूं कुशाचा पुत्र आहेस. सृष्टि निर्माण करतांना ब्रह्मदेवानें तुला प्रारंभीं निर्माण केलें आहे. तुला मी स्नान घालतों. या स्नानानें ज्यांना उद्देशून तुझी प्रतिमा केली आहे त्यांचा उद्धार होवो."

अशा अर्थाचा मंत्र म्हणून रुक्मांगदानें पुन्हां त्या तीर्थाचें स्नान केलें आणि त्या स्नानाचें पुण्य आपल्या मातापित्यांना अर्पण केलें. नंतर त्यानें गजाननाच्या दूतांच्या आज्ञेनें विमानांत आरोहण केलें. दूतांनीं तें विमान कौंडिण्यनगरांत नेलें. नंतर रुक्मांगदानें आपल्या मातापित्यांनाच नव्हे तर नगरांतील सर्व लोकांना तीर्थस्नानाचें पुण्य दिलें. त्या पुण्यानें गजानन प्रसन्न झाला आणि त्यानें आणखी विमानें पाठवून सर्वांना आपणा-जवळ नेलें.

थेऊर येथील कदंबतीर्थाचा महिमा हा असा आहे.

* * *



# ६. लेण्याद्रीचा गिरिजात्मज गणपति

जुन्नरच्या उत्तरेस कुकडी नदीच्या पलीकडे एका डोंगरावर हें रम्य स्थान आहे. हें देवालय दक्षिणामुखीं आहे. या देवस्थानाला गणेश-लेणींहि म्हणतात, कारण हें देवालय डोंगरांत प्रत्यक्ष कोरलेलें आहे. सभोंवतालीं सारेंच खोदकाम आहे. देवासमोरील विस्तीर्ण सभामंडपांत दर्शनी दिसणारे कोरलेले सहा दगडी खांब आहेत. डोंगरांत सर्वत्र खोदकाम करून हें देवालय निर्माण झालेलें असल्यामुळें तेथील वातावरणाला एक प्रकारची भव्यता निर्माण झालेली आहे. देवालयाला दोन्ही बाजूंना मिळून सतरा अठरा कोरलेल्या ओवऱ्या आहेत. देवासमोरच्या विस्तीर्ण मंडपांत थोडीशी संगमरवरी फरशीहि आहे. प्रत्यक्ष देवालयांतील सभा-मंडप उंचीनें लहान आहे. बाहेरचा सभामंडप प्रशस्त व उंच आहे. सभामंडप ओलांडून गेलें कीं, पुढें आठ कोरीव खांब आहेत. खांबांच्या

वरच्या बाजूला गाय, हत्ती इत्यादि मुखवटे कोरलेले आहेत. कांहीं पायऱ्या उतरून गेल्यानंतर बुद्धाचा एक प्रचंड स्तूप आहे. त्याला भीमाची गदा म्हणून ओळखतात. कारण त्या स्तूपाचा आकार गदेसारखाच आहे. याहि ठिकाणीं वाघ, सिंह, हत्ती इत्यादिकांचे मुखवटे कोरलेले आहेत. येथील हे मुखवटे बरेच सुबक वाटतात. याच परिसरांत सुमारें वीस दगडी कोरीव खांब आहेत. खांबांना खालीं व वर डौलदार गोलाई असून त्या खांबांच्या सर्वांत खालीं चौकोनी यज्ञकुंडाच्या आकाराची बैठक आहे. वरची तक्तपोशीहि गोलाकार आहे. या भागांत आवाज चांगलाच घुमतो.

कुकडी नदी ओलांडून गेलें म्हणजे थोड्याच अंतरावर डोंगरावर हें देवालय आहे. पावसाळ्यांत कुकडी नदीला पूर आला म्हणजे पलीकडील भागांत जायला होडींत बसावें लागतें. देवळांत पोचायला २८३ पायऱ्या चढून जाव्या लागतात माणूस श्रमानें श्रांत झाला तरी डोंगरावरील रम्य वातावरणांत त्याचा शीणभर तत्काळ हलका होतो. देवालयाच्या बाहेरच डोंगरमाथ्यावर पाण्याचीं दोन टाकीं आहेत. त्यांचें पाणी गार आणि रुचकर आहे.

देवळांतील मूर्ति मुळींच रेखीव नाहीं. भाविक भक्तांनीं गणेशाला हवा तसा शेंदराचा आकार दिला असावा असें वाटतें. या शेंदूरमूर्तीखालीं दगडाचा थोडा कोरीव भाग दिसतो. कोरीव कोनाड्याच्या मध्यंतरीं गणेश विसावले आहेत. देवावर थापलेलें शेंदुराचें कवच कांहीं वर्षांपूर्वी पडलें होतें अशी माहिती मिळते. देवाच्या डाव्या उजव्या अंगाला लहान ओट्यावर मारुति, गणपति आणि शंकर हे नवीनच प्रस्थापित केलेले देव बसले आहेत. दि. २० जून १९४९ रोजीं देवाचें नवीन लाकडी मखर तयार झालें. त्याचप्रमाणें दारें व खिडक्याहि नवीन आहेत. बाजूला खिडक्यांचीं दारें मात्र पूर्वीचींच आहेत.

या ठिकाणीं देवाची पाठपूजाच चालू आहे असें म्हणतात. म्हणजे देवाचें मुख विरुद्ध बाजूला असून देव पाठीवर पूजा घेत आहे, असा समज प्रचलित आहे. देवाच्या विरुद्ध दिशेला म्हणजे ज्या दिशेला देवाचें तोंड आहे असें म्हणतात त्या डोंगराच्या दिशेनें नानाफडणिसांनीं आंत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता अशी आख्यायिका आहे. परंतु आंत प्रवेश केल्यावर त्यांना असंख्य भुंग्यांनीं दंश केला म्हणून त्यांना पुढें जाण्याचा प्रयत्न सोडून माघारीं परतावें लागलें. दुसरीहि एक आख्यायिका या भागांत प्रचलित आहे. एक गुराखी होता. तो या डोंगरावर आपलीं गुरें चारीत असे. त्या गुरांत देवाची एक गाय येऊन चरत असे. त्या गायीचीं राखोळी त्याला हवी होती. पण गायीचा मालक त्याला गवसेना. शेवटीं एके दिवशीं त्या गायीचें शेपूट धरून तिच्याबरोबर तो चालू लागला. ती गाय त्या देवस्थानीं गेली. भुयारांतून आंत जात असतांना ऋषिमुनी होम करीत असलेले त्याला दिसले. तें दृश्य पाहून त्याला भीति वाटली, म्हणून तो बाजूला लपून बसला. परंतु त्या ऋषिमुनींना तें कळलें. त्यांनीं त्याला बोलावून घेऊन त्याला येण्याचें कारण विचारलें. तेव्हां तो गुराखी म्हणाला, “ ही गाय माझ्या गुरांत रोज चरते. मी तिची राखोळी मागण्यासाठीं आलों आहें.” त्या ऋषींनीं त्याला जेवण दिलें, आणि त्याच्या घोंगडींत देवापुढील कोळसे बांधून दिले. बाहेर येऊन त्या गुराख्यानें ते कोळसे फेकून दिले. तेव्हां त्याला त्या घोंगडींत एक मोहोर मिळाली. बाकीचे कोळसे नाहींसे झाले.

डोंगराच्या अगदीं माथ्यावर पीर आणि महादेव आहेत. या भागांतील लोक या पीराला भजतात, आणि मलिदा देतात. पूर्व बाजूला सीतेची न्हाणी असून पश्चिम बाजूला गुरांसाठीं पाणी पिण्याचीं तळीं आहेत.

हीं डोंगरलेणीं पुराणवस्तु संशोधन खात्याच्या ताब्यांत आहेत. हें देऊळ मात्र स्वतंत्र आहे. जुन्नरचे सरदार देशपांडे हे या देवालयाचे

सरपंच आहेत.

**पौ रा णि क क था**

गजानन आपला पुत्र व्हावा म्हणून लेण्याद्रि नामक डोंगरावरील एका गुहेंत पार्वतीनें तपश्चर्या केली. एका भाद्रपद शुद्ध चतुर्थीला पार्वतीनें गजाननाची पार्थिव मूर्ति तयार केली. तीच मूर्ति सचेतन होऊन पार्वतीपुढें पुत्ररूपानें उभी राहिली व तिनेंच पुढें सिंधु दैत्याचा वध केला. हा अवतार गणेश नांवानें प्रसिद्ध आहे. ही पार्वतीच्या तपश्चर्येची गुहा डोंगराच्या पलीकडे आहे. तिकडे कोणास जातां येत नाहीं. या गुहेच्या मागील बाजूस एक मूर्ति कोणा सत्पुरुषानें डोंगरांत खोदविली आहे. त्या मूर्तीचीच 'गिरिजात्मज' म्हणून पूजा होते.

गणेशानें सिंधु दैत्याचा वध केल्यानंतर गणेश मयूर नगरींत गेला ही हकीगत मयूरेश्वर क्षेत्राच्या वर्णनांत दिलेलीच आहे. गणेशाच्या जन्मापासून सिंधूशीं त्याचें युद्ध झुंपेपर्यंत गणेशाच्या अवतारांतील कथा या प्रकरणांत देत आहोंत.

पुत्रप्राप्तीचा वृत्तान्त ऐकून शंकराला अत्यंत आनंद झाला. नंतर ऋषींना बोलावून त्या बालकाचें विधिपूर्वक जातकर्म केलें तेव्हां ऋषींनीं त्या मुलाची जन्मकुण्डली सांगितली ती अशी : भाद्रपद शुद्ध चतुर्थी, सोमवार, स्वातीनक्षत्र, सिंह राशी, पांच शुभग्रह, अशा प्रकारच्या शुभमुहूर्तावर याचा जन्म झाला असल्यामुळें हा पुत्र महापराक्रमी होईल. असें त्या कुण्डलीचें फळ सांगून ऋषि निघून गेले. पुढें अकराव्या दिवशीं देवांनीं त्याचें नांव गणेश असें ठेवलें. कोणत्याहि कार्याच्या आरंभीं याचें स्मरण केल्यास तें कार्य निर्विघ्नपणें तडीला जाईल असा शंकरांनीं त्या नांवाला आशीर्वाद दिला.

पुढें दूतांनीं गणेशजन्माचें वृत्त सिंधूला कळविलें. तोंच, ‘ अरे सिंधो तुला ठार मारणारा कोठेंतरी जन्माला आला आहे, ’ अशी आकाशवाणी झाली. ती ऐकून सिंधूनें आपल्या शत्रूचा वध करण्याची एकदम राक्षसांना आज्ञा दिली व त्याप्रमाणें कित्येक राक्षस मेरुपर्वतावरील त्रिसंध्य आश्रमांत आले.

गणेश दिवसेंदिवस वाढूं लागला. आपल्याला नातू झाल्याची वार्ता हिमालयाला समजली तेव्हां तोहि पार्वतीला भेटण्यासाठीं मेरुपर्वतावर आला. त्यानें सुवर्णाचे व रत्नाचे अलंकार गणेशाला दिले आणि त्याचें ‘ हेरंब ’ असें नांव ठेवलें.

एकदां बालगणेश अंगणामध्यें होता. त्यावेळीं आकाशांत एक मोठा गृध्रपक्षी घिरट्या घालीत होता. त्यानें एकदम त्या बालकावर झडप घातली आणि त्याला उचलून वर नेलें. गणेशानें त्याची चोंच घट्ट आवळून धरली यामुळें त्या पक्ष्याचा गुदमरून प्राण गेला, आणि तो खालीं जमिनीवर पडला. परंतु गणेशाला यत्किंचित्सुद्धां इजा झाली नाहीं. इतकेंच नव्हे तर तो त्या पक्ष्याचा छातीवर खेळत असलेला आढळला.

गणेश दोन महिन्यांचा असतांना पार्वतीनें त्याला पाळण्यांत निजविलें होतें. तेव्हां क्षेम आणि कुशल या नांवाचे दोन दैत्य गणेशाला मारण्यासाठीं उंदरांच्या रूपांनीं तेथें आले. आपसांत भांडतां भांडतां त्यांनीं पाळण्यांतील बालकावर उड्या मारल्या परंतु गणेशानें त्यांना लाथा बुक्या मारून बेजार केलें. तेव्हां ते प्राणाला मुकले आणि त्यांच्या जागीं दोन भयंकर राक्षसांचीं प्रेतें दिसूं लागलीं. तसेंच एके दिवशीं पार्वतीला झोंप लागली असतां क्रूर नांवाचा एक राक्षस मांजराचें रूप घेऊन तेथें आला. त्यानें उडी मारून गणेशाची मान आपल्या तोंडांत धरली. त्या वेळींसुद्धां गणेशानें पुष्कळ लाथा मारल्या. त्याबरोबर तोहि तत्काळ मरून

पडला.

गणेशाला चौथा महिना लागला. तेव्हां पार्वतीनें एके दिवशीं हळद-कुंकवाचा समारंभ केला. त्यावेळीं बालासूर या नांवाचा एक दैत्य बालरूप घेऊन गणेशाजवळ आला, व गजाननाच्या डोक्यावर लाथ मारूं लागला. तेव्हां गणेशानें आपल्या लहान हातांनीं त्याचा गळा दाबून धरला, त्यामुळें त्याचा प्राण गेला आणि त्याचें प्रचंड आणि अक्राळविक्राळ स्वरूप दिसून आलें.

गणेश पांच महिन्यांचा झाला असतां मरीचिऋषि गणेशाला पाहण्यासाठीं आले. त्यांनीं पार्वतीला सांगितलें कीं, " मोठे मोठे योगी ज्याचें निरंतर ध्यान करतात तो हा परमात्मा तुझ्या उदरीं आला आहे. यानें हा मनुष्य देह धारण केला आहे म्हणून तूं याचें राक्षसांपासून रक्षण कर. "

पार्वती म्हणाली, " लहानपणापासून या बालकानें कित्येक राक्षस मारले आहेत. त्याला दैत्य त्रास देतात हें खरें आहे. त्याला राखण म्हणून ताईत वगैरे कांहीं बांधाल तर बरें होईल. "

पार्वतीच्या इच्छेप्रमाणें, पिशाच–भीति नाहींशी व्हावी म्हणून ऋषींनीं गणेशकवचाचा जप करून त्याचा ताईत बालगणेशाच्या गळ्यांत बांधला.

नंतर एके दिवशीं पार्वतीनें गौतम आणि इतर ऋषींना मुलाचा उपवेशनाचा संस्कार करण्याविषयीं प्रार्थना केली. त्या संस्काराची धांदल चालली असतांना गणेशाचा नाश करण्यासाठीं तेथें व्योमासुर नामक राक्षस आला, आणि तो आश्रमाजवळच्या एका झाडांत शिरला. नंतर त्या राक्षसानें तें झाड इतक्या जोरानें हालविलें कीं तें झाड आतां मोडून पडणार असें सर्वांना वाटलें, आणि प्रत्येकजण भीतीनें पळत सुटला. या गडबडींत गणेश मात्र आश्रमांतच राहिला. इतक्यांत तें झाड आश्रमावर पडलें. तेव्हां गणेशानें तें झाड आपल्या दोन्ही हातांनीं धरून आकाशांत उंच झोकून दिलें. यामुळें राक्षसाचा मात्र जमिनीवर आपटून

जीव गेला.

या व्योमासुराची शतमहिषा नांवाची बहीण होती. ती रोज शंभर रेडे खात असे. तिला भावाच्या मरणाचें दुःख झालें आणि ती गणेशाला मारण्याच्या हेतूनें मेरुपर्वतावर आली. पार्वतीला नमस्कार करून ती म्हणाली, "हे जगज्जननी, माझा नवरा नाहींसा झाल्यानें मी दुःखी-कष्टी आहे. माझा पति इंद्र राक्षसांच्या भीतीनें कोठें लपून बसला आहे हें समजत नाहीं."

पार्वती म्हणाली, "इंद्राणी, तूं काळजी करूं नकोस. माझ्या घरीं परमात्म्यानें अवतार धारण केला आहे. तो देवांचें कल्याण करील यांत शंका नाहीं."

पार्वतीनें तिचें आदरातिथ्य केलें. नंतर शतमहिषा पलंगावर जाऊन पडली, आणि पार्वतीच्या सख्यांना म्हणाली, "बायांनो, देवांना संकटां-पासून मुक्त करणाऱ्या त्या बालकाला माझ्याजवळ घेऊन या. मला एकदा त्याला पाहूं द्या."

ती खरीच इंद्राणी आहे असें समजून त्यांनीं गणेशाला तिच्यापाशीं नेलें. ती कपटी राक्षसीण आहे हें गणेशाला समजलें आणि तिचें नाक आणि कान जोरानें ओढून तिच्या अंगावर एखाद्या पर्वताप्रमाणें गणेशानें भार टाकला. त्याबरोबर तिचा जीव निघून गेला.

सातव्या महिन्यांत एका रात्रीं कमठासुर नांवाच्या राक्षसानें भूमीचें रूप धारण करून तो शिवमंदिराच्या अंगणांत पडून राहिला. दिवस उगवल्यावर पार्वतीच्या दासींनीं नित्याप्रमाणें गणेशाला नेऊन अंगणांत ठेवलें. गणेशानें त्या राक्षसाचें कपट ओळखून त्याच्यावर चौदा भुव-नांचा भार टाकला. त्या बरोबर त्या राक्षसाचा प्राण गेला आणि त्याचा मृत देह अंगणभर पडलेला सर्वांच्या दृष्टीस पडला.

गणेशाला आठवा महिना लागला. उकाडा फार होऊं लागल्यामुळें

पार्वतीनें गणेशाला आश्रमाजवळच्या बागेंत नेलें, आणि ती तेथें पलंगावर पडून राहिली. तिला झोंप लागल्यावर मंचकासुर राक्षसानें पलंगामध्यें प्रवेश केला; त्यानें गणेशासह पार्वतीला घेऊन आकाशांत उड्डाण केलें. तेव्हां गणेशानें मंचकासुराला लाथा मारल्या आणि एका हातानें राक्षसाची शेंडी धरून दुसऱ्या हातानें पार्वतीला आकाशांत सावरून धरलें. नंतर भूमीवर उतरतां उतरतांच मध्येंच त्या राक्षसाला हातांतून सोडून दिलें, यामुळें राक्षसाच्या शरीराचा चेंदामेंदा झाला. गणेश मात्र पार्वतीसह जमिनीवर सुखरूप खालीं आला.

एके दिवशीं दुंदुभि नांवाचा राक्षस बालरूप घेऊन आला आणि तो गणेशाला खेळण्यासाठीं बोलावूं लागला. गणपति त्याच्याजवळ गेला. राक्षसानें त्याला एक विषारी फळ खावयास दिलें. त्यानें तें खाऊन टाकलें आणि तो राक्षसाला आणखी तशीं फळें मागूं लागला. शेवटीं गणेशानें त्याची शेंडी जोरानें पकडून ओढली तेव्हां त्या राक्षसाचें मुंडकें त्याच्या धडापासून निखळून वेगळें झालें.

गणेक्षाला दहावा महिना लागला. तेव्हां अजगर नांवाचा राक्षस गणेशाला मारण्यासाठीं आश्रमांत आला. गणेश त्याच्याजवळ गेला आणि अजगरानें आपला जबडा पसरतांच गणेश त्याच्या तोंडांत शिरला; व तात्काळ त्याचें पोट फोडून बाहेर आला.

गणेश अकरा महिन्याचा झाला तेव्हां त्यानें हरतऱ्हेनें कौतुकास्पद अशा गोष्टी करण्याला प्रारंभ केला. कोणी त्याचा मुका घेतला तर लगेच त्यानें मुका घेणाराचा मुका घ्यावा, आपल्या आईचेंच काय पण इतर स्त्रियांचेंहि बळजबरीनें स्तनपान करावें, अशा त्याच्या अनेक बालचेष्टा सुरू झाल्या. याच वेळेस शलभासुर नांवाचा एक राक्षस टोळाच्या रूपानें गणेशाला मारण्यासाठीं आला. तो टोळ दिसल्याबरोबर गणेशानें त्याचा पाठलाग केला आणि त्याला

पकडलें. त्यानें प्रथम त्याचे पंख उपटून टाकले तरी तो गणेशाला चावूं लागला तेव्हां गणेशानें त्याला जोरानें जमिनीवर आपटलें. त्यामुळें त्याचा प्राण गेला आणि टोळाच्या ठिकाणीं एक भयंकर राक्षस तेथें मरून पडल्याचें आढळून आलें.

गणेशाला जन्माला येऊन बारा महिने झाले. एके दिवशीं पार्वतीनें त्याच्या अंगावर कोटिसूर्याप्रमाणें तेजस्वी अलंकार घातले आणि तिनें त्याला नाचावयास सांगितलें. त्याबरोबर तो नाचूं लागला. तेव्हां आपणहि नाचावें अशी शंकराला इच्छा उत्पन्न झाली, आणि तोहि नाचूं लागला. तें पाहून शिवाचे गणमुनी, सिद्ध, चारण, गंधर्व, यक्ष, किन्नर, यांनीं नृत्य सुरू केलें; आणि लागलीच पार्वतीसुद्धां नाचूं लागली. अशा रीतीनें पुष्कळ वेळ सर्वांनीं नृत्य केल्यावर आतां हें नृत्य पुरें करावें असें पार्वतीला वाटलें आणि तिनें गणेशाला हातीं धरून मांडीवर घेतलें. पण त्या वेळीं तो अत्यंत जड झालेला आढळला. कारण एक राक्षस त्याच्या पायांतील घागऱ्यामध्यें शिरला होता. तेव्हां पार्वतीनें गणेशाला म्हटलें, " अरे, तूं आज इतका जड कशानें झालास ? "

तें ऐकून गणेश आपले पाय झाडीत उठला. त्याबरोबर तो व्योमासुर राक्षस आकाशांत उडाला आणि उंचावरून खालीं जमिनीवर आपटला, त्यामुळें तो तात्काळ प्राणास मुकला.

एके दिवशीं आश्रमांतील मुलें एकत्र जमून गणेशाबरोबर कुस्त्या खेळत होतीं. त्या वेळीं मेघासुर नांवाचा एक राक्षस गणेशाच्या मागल्या बाजूस जाऊन त्याच्या पाठींत आपलीं शिंगें खुपसणार तोंच गणेशानें एकदम उडी मारली आणि तो त्याच्या पाठीवर बसला. नंतर खालीं उतरून गणेशानें त्या राक्षसाचीं दोन्ही शिंगें आपल्या दोन्हीं हातांनीं धरलीं आणि त्याला जमिनीवर आदळलें, त्याबरोबर तो गतप्राण झाला.

गणेशाला दुसरें वर्ष लागल्यावर एके दिवशीं तो आपल्या सोबत्यां-

बरोबर बागेंत खेळायला गेला होता. तेव्हां कूटासुर या नांवाचा एक राक्षस त्या ठिकाणीं आला. त्यानें बागेंतील तलावांत विष कालवून ठेवलें आणि तो जवळच लपून बसला. गणेशाचे सोबती खेळतां खेळतां दमले. त्यांना तहान लागली म्हणून ते त्या तलावांतील पाणी प्याले त्याबरोबर ते मरून पडले. हें वर्तमान त्या मुलांच्या आई-बापांना समजलें तेव्हां ते, मुलें जेथें मरून पडलीं होतीं तेथें आले आणि अत्यंत दुःख करूं लागले. इतक्यांत गणेशानें त्या आपल्या मृतमित्रांवर आपली अमृतदृष्टि टाकली त्याबरोबर त्याचे मृत मित्र जिवंत झाले. गणेशानें क्रोधानें त्या राक्षसावर दृष्टि फेकली त्याबरोबर त्या राक्षसाचें भस्म झालें.

एके दिवशीं गणेश ऋषिपुत्रांबरोबर आश्रमाजवळच्या नदीवर खेळायला गेला. तेव्हां तीं सर्व मुलें नदींत शिरलीं. तोंच एका राक्षसानें माशाचें रूप घेऊन गणेशाला नदींत ओढलें. ती भयंकर बातमी ऋषिकुमारांनीं पार्वतीच्या कानांवर घातली. ती ऐकून पार्वती मूर्च्छित पडली. पण थोड्याच वेळांत गणेशानें त्या मत्स्यासुराचा वध केला आणि तो नदीच्या डोहांतून बाहेर आला. हें वर्तमान ऋषिपुत्रांनीं जेव्हां पार्वतीला सांगितलें तेव्हां तिला आनंद झाला. परंतु या अचपळपणाबद्दल गणेशाला शिक्षा करावी म्हणून ती त्याला धरायला गेली तेव्हां तो तेथून निसटून पळून गेला. तो पळत असतांना कर्दमासुर नांवाचा एक दैत्य गणेशाला मारण्यासाठीं तेथें आला. हां हां म्हणतां त्या राक्षसानें गणेशाला गिळून टाकलें. इतक्यांत तो राक्षस फारच वाढला आणि गणेशाला आपल्या मुखांतून बाहेर काढून त्याला घेऊन चालूं लागला, तेव्हां गणेशानें त्या राक्षसापेक्षांहि मोठें रूप धारण केलें आणि त्या राक्षसाला आपल्या पायाखालीं चिरडून टाकलें.

गणेशाला पांचवें वर्ष सुरू झालें तेव्हां एके दिवशीं सर्व मुलें गणेशासह युद्धाचा खेळ खेळूं लागलीं; तेव्हां तेथें खड्ग नांवाचा एक राक्षस

आला. त्यानें त्यावेळीं मोठ्या उंटाचें रूप धारण केलें होतें. तो मोठ्या जोरानें गणेशावर चाल करून आला. उंट आपल्यावर चाल करून येत असल्याचें पाहून गणेशानें प्रचंड देह धारण केला आणि त्या उंटाच्या टाळक्यावर एक गुद्दा मारला. त्या प्रहारानें उंटाचें हृदय फुटून त्यानें प्राण सोडला. पुढें त्या राक्षसाचा मित्र छायासुर या नांवाचा एक मायावी राक्षस गणेशाजवळ जाऊन त्याची जमिनीवर पडलेली छाया धरून ओढूं लागला. त्यामुळें गणेश खालीं पडला. नंतर त्यानें अंतर्ज्ञानानें ओळखून एक मोठा दगड घेऊन त्या छायेवर आपटला त्याबरोबर त्या छायासुराचा प्राण गेला.

नंतर चंचल या नांवाचा एक राक्षस गणेशाबरोबर चेंडू खेळूं लागला चेंडू फेकल्यावर जर तो एखाद्यानें झेलला तर झेलणारानें चेंडू फेकणाऱ्याच्या पाठीवर बसावयाचें असें ठरलें. त्याप्रमाणें एकदा गणेशानें फेकलेला चेंडू त्या राक्षसानें झेलला व तो गणेशाच्या पाठीवर बसला, आणि त्यानें सगळा भार गणेशावर घातला. गणेशानें राक्षसाचें कपट ओळखलें, आणि कांहीं वेळ गेल्यावर गणेशानें त्या राक्षसाचा चेंडू झेलला आणि तो त्याच्या पाठीवर बसला. तेव्हां एकाएकीं गणेशानें हिमालय पर्वताइतका भार त्या राक्षसावर टाकला, त्याबरोबर तो राक्षस मेला.

नंतर तीं मुलें त्याच ठिकाणीं नानातऱ्हेचे खेळ खेळूं लागलीं. खेळत खेळतां दिवस किती गेला याचें भान त्या मुलांना राहिलें नाहीं. शेवटीं मुलांचे आईबाप त्यांचा शोध करीत तेथें आले. तेव्हां गणेश गुप्त झाला, आणि बऱ्याच अंतरावर तो प्रकट झाला. त्यानें सर्व मुलांना आपणांकडे बोलावून घेतलें आणि त्यांना तो म्हणाला, "तुम्हांला भूक लागली असेल तर माझ्याबरोबर चला, मी तुम्हांला सुग्रास अन्न खावयास देतों." असें म्हणून गणेश त्यांच्यासह गौतमाच्या आश्रमांत गेला. त्यानें अहल्येची नजर चुकवून स्वयंपाकघरांतील भाताचें भांडें उचलून आणलें आणि त्यांतील

भात मुलांना वाटला. थोड्या वेळांत हा प्रकार अहल्येला व गौतमाला समजला, व त्यांनीं त्यावद्दल पार्वतीकडे तक्रार केली. तेव्हां पार्वतीला गणेशाचा फार राग आला. तिनें एक छडी घेऊन गणेशाला थोडासा चोप दिला, आणि गौतमाच्या देखत तिनें गणेशाचे हातपाय बांधून त्याला खोलींत कोंडून ठेवलें. इकडे त्याला कोंडून ठेवलें तरी गणेश मुलांबरोबर खेळत आहे असें दिसत होतें. हें तिला कळलें तेव्हां जेथें मुलें खेळत होतीं तेथें पार्वती गेली, त्या ठिकाणीं गणेश तिच्या दृष्टीस पडला. हा चमत्कार पाहून तिला प्रेमाचा पान्हा आला. म्हणून ती गणेशाजवळ गेली त्या वेळीं गणेश तिला म्हणाला, " मी तुझा गणेश नाहीं. " त्यावरोबर पार्वती घरांत आली आणि खोली उघडून पाहूं लागली तों बांधून ठेवलेला गणेश जसाच्या तसा तिला दिसला.

गणेशाला जेव्हां सातवें वर्ष लागलें तेव्हां शंकरानें त्याच्या मुंजीची तयारी केली. त्यानें गौतमऋषीला बोलाविलें आणि इतर वेदवेत्ते ऋषीहि बोलाविले. चौलकर्म झाल्यावर बटूला वेदीजवळ आणलें. ऋषिमुनींनीं अंतर्पाट धरला. या प्रसंगीं काल आणि कृतांत असे दोन राक्षस हत्तींचीं रूपें घेऊन गणेशावर चाल करून आले. त्यावेळीं सर्व लोकांना भीति वाटली. पण गजाननानें न भितां आपल्या हातांनीं त्यांच्या सोंडा धरल्या, आणि त्यांचीं मस्तकें एकमेकांवर जोरानें आपटलीं, त्यामुळें ते दोघेहि राक्षस आपल्या जिवाला मुकले.

नंतर गणेशाला गायत्री मंत्राचा उपदेश करण्यांत आला, आणि ब्रह्मदेवादिकांनीं त्याला भिक्षावळी घातल्या. अदिति आणि कश्यप हेहि त्यावेळीं तेथें आले होते. त्यांनीं जेव्हां बटूची पूजा केली तेव्हां बटूनें त्यांना आपलें पूर्वावतारांतील विनायकाचें रूप दाखविलें. तें पाहून अदितीला पान्हा फुटला, आणि कश्यपानें त्याला प्रेमानें आलिंगन दिलें.

तीं उभयतां गणेशाला म्हणालीं, "बाबारे, आम्हांला अंतर देऊं नकोस." तेव्हां गजानन त्यांना म्हणाला, " मी तुम्हांला पुन्हां एकदा दर्शन देईन असें वचन दिलें होतें, त्या वचनाप्रमाणें आज भेटलों. मी सर्वांतर्यामीं असल्यामुळें नेहमीं तुमच्यापाशीं आहेच असें समजा."

एकदा शेष पाताळांत सभेमध्यें बसला असतां वासुकी आदि परिवार त्याच्या सभोंवतालीं गोळा झाला. इतक्यांत सर्पाची माता कद्रू तेथें आली आणि म्हणाली, " मुलांनो, तुमची सावत्र आई जी विनता तिच्या भेटीला आज मी गेलें होतें पण तिनें वाईटसाईट बोलून माझा अपमान केला आहे. त्यामुळें मला मरणप्राय दुःख झालें. जर तुमच्या अंगांत पराक्रम असेल तर मला सहाय्य करा नाहींतर मला जीव दिल्यावांचून गत्यंतर नाहीं."

मातेचें हें भाषण ऐकून शेष संतापला आणि त्यानें वासुकीला सैन्यासह विनतेच्या आश्रमांत पाठविलें. वासुकी आणि इतर सर्प यांनीं विनतेला वेढा टाकला आणि त्यांनीं तिला बांधून शेषापाशीं आणलें. त्या वेळीं विनतेनें गरुडाचें स्मरण केलें त्याबरोबर तो आपल्या मातेजवळ आला. त्याच्याच बरोबर श्येन, संपाति, जटायु वगैरे मोठमोठे पक्षीहि सर्पांबरोबर लढण्यासाठीं आले होते; परंतु सर्पांनीं त्यांचा पराभव केला. हें पाहून गरुडानें सूक्ष्म रूप धारण केलें आणि विनतेला घेऊन तो पळून गेला. विनतेचा पति जो कश्यप त्याला हें सर्व वर्तमान निवेदन केलें, तेव्हा कश्यप म्हणाला, "विनते, तूं भिऊं नकोस, तुला पुन्हा गर्भ प्राप्त होईल. त्यापैकीं एक अंडें होईल. तें जेव्हां गजानन फोडील तेव्हां त्यांतून उत्पन्न होणाऱ्या पक्ष्याच्या केवळ शब्दानेंच सर्पांचा पराभव होईल."

हें ऐकून विनतेला आनंद झाला. कांहीं कालानें तिनें एक अंडें घातलें व तें मातीमध्यें वल्कलांत गुंडाळून सुरक्षित ठेवलें.

गणेशाचा व्रतबंध झाल्यावर एके दिवशीं त्याच्या सोबत्यांना अध्ययन

करण्याची इच्छा झाली; म्हणून गणेशानें त्या सर्वांच्या मस्तकावर आपला हात ठेवला; त्याबरोबर त्यांना ज्ञान प्राप्त झालें आणि ते तत्काळ वेदघोष करूं लागले. ऋग्वेद आणि यजुर्वेद यांचीं पारायणें झाल्यावर त्या मुलांनीं सामगायन केलें. त्या मंजुळ गाण्यानें त्या आश्रमांतील पशु व अनेक ऋषीहि आश्चर्यानें थक्क झाले.

इतक्यांत तेथें विलक्षण श्वापदाचें रूप घेऊन एक राक्षस आला. त्याचें मायावी स्वरूप ओळखून गणेशानें आपला पाश त्याच्यावर टाकला. त्याबरोबर त्या राक्षसाचा श्वास कोंडून तो मृत्यु पावला. ज्या ठिकाणीं हा प्रकार घडला तेथें जवळच विनता आपलें अंडें उबवीत बसली होती. तिची नजर चुकवून गणेशानें तें अंडें फोडलें तेव्हां त्यांतून एक मोठा पक्षी बाहेर पडला. तो उपजल्याबरोबर गणेशाशीं आणि इतर मुलांशीं युद्ध करूं लागला. तेव्हां गणेशानें आपलीं चारहि आयुधें त्याच्यावर सोडलीं. त्यांना दाद न देतां त्या पक्ष्यानें आकाशांत उड्डाण केलें. बालकांवर झेप घातली. इतक्यांत गणेशानें चपळाई करून तो त्या पक्ष्याच्या पाठीवर बसला. तेव्हां विनतेनें गणेशाला ओळखलें आणि ती त्याला म्हणाली, " देवाधिदेवा, ज्या अर्थी तूं हें अंडें फोडलेस त्या अर्थीं हा माझा पुत्र तुझें वाहन होईल. सर्पाचा संहार करून हा माझ्या पुत्रांची बंदींतून सुटका करील असें माझ्या पतीनें भविष्य केलें आहे. यासाठीं गणेशा तूं याला सहाय्य कर, आणि कार्य सिद्धीला ने. तसेंच याच्या नामासह तुझा उच्चार लोकांनीं करावा असा याला वर दे. "

विनतेच्या इच्छेप्रमाणें गणेशानें त्याला वर दिले आणि यापुढें आपल्याला मयूरेश्वर म्हणावें असें गणेशानें मुलांना सांगितलें. नंतर गणेश त्या मयुरावर बसला आणि आपल्या आश्रमांत आला.

गणेशाला नववें वर्ष लागलें असतांना तो आश्रमाजवळ एका तलावावर गेला होता. इतक्यांत तेथें एक राक्षस घोड्याच्या रूपानें

आला, आणि बालकांना त्रास देऊं लागला. हें पाहून गणेश त्या घोड्यावर बसला. इतक्यांत घोड्यानें तलावांत उडी मारली. बऱ्याच वेळानें गणेश पाण्याच्या वर आला. तो एका हातानें घोड्याला पाण्यांत बुचकळीत आहे असें दिसून आलें. शेवटीं घोड्याच्या नाका-तोंडांत पाणी शिरल्यामुळें तो गतप्राण झाला.

पुढें मयूरेशानें अनेक खेळ खेळून मुलांना आपल्या हातांपायांचें विराट सामर्थ्य दाखविलें. इतक्यांत त्या तलावामध्यें कित्येक नागकन्या जलक्रीडा करावयास आल्या. त्यांनीं मयूरेशाला पाहिल्याबरोबर त्या मोहित झाल्या व गणेशाजवळ येऊन त्या म्हणाल्या, " महाराज, आपणाला पाहून आमचीं मनें विव्हळ होत आहेत. आपण जर आमच्या घरीं याल तर आम्ही कृतार्थ होऊं."

शेवटीं त्या सर्व नागकन्यांनीं त्याला धरलें आणि बलात्कारानें त्याला पाताळांत नेलें. हें पाहून त्याचे खेळगडी आश्रमांत जाऊं लागले. भगासुर नांवाच्या राक्षसानें त्यांच्या वाटेवर आपलें खळग्यासारखें तोंड उघडून ठेवलें होतें. आपल्या सोबत्यांवर हें संकट आलेलें पाहून गणेशानें एका क्षणाच्या आंत दुसरें रूप धारण केलें आणि तो त्यांच्यापाशीं आला, आणि त्या राक्षसाच्या पोटांत शिरला. राक्षसाच्या पोटांत शिरल्यावर गणेशानें आपलें शरीर मोठें करण्यास सुरुवात केली. यामुळें त्या राक्षसाचे दोन तुकडे झाले. संध्याकाळ झाली तरी मुलें घरीं परत आलीं नाहींत म्हणून ऋषींना काळजी लागली. हें जाणून गणेशाला त्यांची करुणा आली, आणि जितकीं मुलें खेळायला आलीं होतीं तितक्यांचीं रूपें घेऊन तो त्यांच्या घरीं गेला.

इकडे त्या नागकन्या मयूरेश्वराला बरोबर घेऊन आपल्या पित्यापाशीं आल्या. त्या वासुकिराजाच्या मस्तकामध्यें एक अत्यंत तेजस्वी असें रत्न होतें. मयूरेश्वरानें तें काढून घेतलें आणि त्याला जबरीनें धरून ठेवून

तो चालूं लागला. ही हकीगत शेषाला कळली तेव्हां तो मयूरेश्वरावर चालून आला. त्यावेळीं मयूरानें गणेशाला नमन केलें आणि तो सर्पांचा नाश करूं लागला. शेष त्यामुळें हतवीर्य झाला. शेषानें मयूरेशाची स्तुति केली आणि त्यानें संपाति, जटायु इत्यादि विनतापुत्रांना बंदींतून मुक्त केलें. याप्रमाणें गणेशानें मयूराकडून प्रताप गाजवून विनतेचें कार्य केलें. नंतर त्या सर्व विनतापुत्रांना घेऊन गणेश पृथ्वीवर आला. त्यानें राक्षसाच्या शरीरांत योगनिद्रेनें सुषुप्तींत ठेवलेल्या आपल्या सोबत्यांना जागें केलें व त्यांसह तो आश्रमाकडे येण्यास निघाला. मुलांचा आरडा ऐकून आश्रमांतील ऋषी बाहेर आले आणि पहातात तों सर्व मुलें पूर्वी-प्रमाणें आश्रमांत असून, बाहेरहि आरडाओरड करीत आहेत, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ते अत्यंत आश्चर्यचकित झाले.

ब्रह्मदेव एकदा मयूरेश्वरपुरीं गणेशाच्या दर्शनाला गेला होता. त्यानें व्यासाला सांगितलें कीं, " मी त्या आचारभ्रष्ट मुलाला नमस्कार केला हें बरें केलें नाहीं व त्यामुळें माझें ज्ञान आणि माझें महत्त्व कमी झालें असें मला वाटलें. म्हणून मी गर्वानें त्या ठिकाणांतील सर्व सृष्टि गुप्त केली. हें पाहून गणेशानें अंतर्ज्ञानानें हें कृत्य माझें आहे असें ओळखलें; आणि त्यानें आपल्या मायेनें मयूरेश्वरासह सर्व सृष्टि निर्माण केली. त्यामुळें माझा गर्व नाहींसा होऊन मी त्याची क्षमा मागितली आणि " मला पुन्हां गर्व न होवो " असा त्याच्यापाशीं वर मागितला. "

एकदा मयूरेश्वराच्या नगरांत विश्वेदेव या नांवाचा ब्राह्मण पार्वतीकडे अतिथि आला. वेळ दुपारची होती. तो आपोशन घेऊन जेवायला सुरवात करणार इतक्यांत त्याला, विष्णूचें दर्शन आणि त्याचें तीर्थ न घेतल्याची आठवण झाली. यामुळें तो चिंताक्रांत होऊन स्वस्थ बसला. त्याची दृढभक्ति पाहून गणेशानें आपलें रूप गुप्त करून लगेच विष्णु-रूप धारण केलें. जेवण झाल्यावर त्याच्या मनांतील भेदभाव नाहींसा

व्हावा म्हणून त्याला गणेशानें चमत्कार दाखविला, तो असाः— त्या नगरांत वसिष्ठ ऋषीचा नातू पराशर या नांवाचा एक लहान मुलगा होता. त्यानें वाळलेल्या पानाची माळ करून ती गणेशाला वाहिली. चंदनाच्या ऐवजीं चिखल लावला. मातीचेच मोदक करून त्यांचा नैवेद्य दाखविला. तो नैवेद्य गणेशानें भक्षण करावा म्हणून पराशरानें हट्ट घेतला. त्याची एकनिष्ठ भक्ति पाहून त्याच्यापुढील मृत्तिकेची मूर्ति सजीव झाली आणि तिनें ते लाडू, मोदक वगैरे पदार्थ आवडीनें भक्षण केले. हा सर्व प्रकार विश्वेदेवानें पाहिला. पण तो एकाच मूर्तीकडे पहात असतांना एकदा विष्णूची तर एकदा गजाननाची अशी मूर्ति त्याला आलटून पालटून दिसूं लागली. तेव्हां त्या ब्राह्मणाची भेद-बुद्धि नाहींशी झाली; गणेश आणि विष्णु एकच आहेत अशी त्याच्या मनाची खात्री झाली.

'गणेश' असें नांव पडण्याचें कारणः— एके दिवशीं शंकर निजले असतां गणेशानें त्यांच्या मस्तकावरील चंद्र काढून घेतला आणि तो खेळण्यासाठीं घेऊन गेला. इतक्यांत मंगल या नांवाचा एक राक्षस डुकराचें रूप घेऊन तेथें आला. तेव्हां गणेशानें एका हातानें त्याचे दांत व दुसऱ्या हातानें त्याचा ओठ धरून त्या डुकराच्या दोन चिरफळ्या केल्या.

इकडे शंकर जागे झाले तेव्हां आपल्या मस्तकावरील चंद्र नाहींसा झाला असल्याचें त्यांना आढळून आलें. त्यांनीं गणांपाशीं चौकशी केली तेव्हां मयुरेश्वराच्या हातांत चंद्र पाहिल्याचें त्यांनीं सांगितलें. तेव्हां शंकरांनीं गणेशाला पकडून आणण्याबद्दल आपल्या गणांना आज्ञा केली. तेव्हां ते गण आणि नंदी मोठ्या गर्वानें गणेशाला पकडण्यासाठीं निघाले. त्यावेळीं गणेश एकदा गुप्त होई तर एकदा प्रकट होई. एकदा जड होई तर एकदा दीर्घ श्वास सोडून गणांना पिटाळून लावी. अशा रीतीनें गणेशानें

त्यांची शक्तीची घमेंड उतरविली. नंतर गणेश शंकराच्या पायापाशीं बसलेला आहे आणि चंद्र शंकराच्या मस्तकावर आहे असें दृश्य सर्वांच्या दृष्टीस पडलें. "चंद्र तर आपल्या मस्तकावरच आहे" असें गणांनीं शंकरांना सांगितलें. शंकरांनीं आपल्या मस्तकावर चापसून पाहिलें तेव्हां चंद्र त्यांच्या हाताला लागला. त्या दिवसापासून शिवगण गणेशाच्या आज्ञेंत वागूं लागले. म्हणून त्याचें 'गणेश' म्हणजे गणांचा स्वामी असें नांव पडलें.

गणेशाला चवदावें वर्ष लागलें असतां एकदा गौतमादि ऋषी शंकराच्या दर्शनाला आले होते. तेव्हां त्यांना पार्वतीनें विचारलें कीं, "राक्षसांचीं विघ्नें निवारण करण्यासाठीं काय उपाय करावा?" तेव्हां त्यांनीं "इंद्रयाग करावा" असें पार्वतीला सुचविलें. त्याप्रमाणें पार्वतीनें शंकरांची आज्ञा घेऊन ऋषीकडून इंद्रयागाला प्रारंभ करविला. तो समारंभ पाहण्यासाठीं गणेश तेथें आला. इतक्यांत कल आणि विकल हे दोन राक्षस रेड्यांचीं रूपें घेऊन तेथें आले. तेव्हां गणेशानें त्यांना गरगर फिरवून दूर फेकून दिलें. त्याबरोबर ते मरून खालीं पडले. नंतर गणेश यज्ञमंडपांत गेला, आणि तो म्हणाला, "बोकडाची कितीहि पूजा केली तरी तो कामधेनूप्रमाणें फळ देईल काय?" असें बोलून आहुतीसाठीं तयार कलेलें पायसादि सर्व अन्न त्यानें खाऊन टाकलें.


आपल्या यज्ञाचा गणेशानें विध्वंस केला हें पाहून इंद्राला राग आला, आणि त्यानें सर्व देवांना गणेशाची खोडकी जिरविण्याची आज्ञा केली. इंद्राच्या आज्ञेप्रमाणें मयूरेशपुरांतून अग्नि नाहींसा झाला. त्यामुळें लोकांची फार गैरसोय झाली. तेव्हां गजाननानें अग्नीचें रूप घेऊन नागरिकांची सोय केली. त्यानंतर इंद्रानें प्रथम वायूला आणि नंतर सूर्याला गुप्त होण्याची आज्ञा दिली. अशा प्रकारें इंद्रानें जे जे प्रयत्न केले ते ते सर्व गणेशानें हाणून पाडले आणि निष्फळ केले. तेव्हां इंद्राच्या गर्वाचा

परिहार होऊन तो गणेशाला शरण गेला.

गणेश पंधरा वर्षांचा झाला. एके दिवशीं तो कमण्डलु नदीवर आपल्या सोबत्यांसह स्नानासाठीं गेला. तेथें एक राक्षस भयंकर वाघाचें रूप घेऊन आला. त्याला पाहून गणेशाचे सोबती भीतीनें पळून गेले. परंतु गणेश यत्किंचित् सुद्धा न डगमगतां आपल्या जागेवर उभा राहिला, आणि तत्काळ त्यानें त्या राक्षसाचा वध केला. इकडे त्याचें सोबती पळतां पळतां दमले आणि ते एका वृक्षाखालीं निजले. परंतु ते सर्व दक्षिणेकडे पाय करून निजल्यामुळें यमाला राग आला आणि त्यानें त्या सर्व मुलांना यमलोकीं नेलें. गणेशाला अंतर्ज्ञानानें हा प्रकार समजला तेव्हां तो यमलोकीं गेला आणि त्यानें यमाच्या खांद्यावर पटकन् उडी मारली. त्याचें तें विलक्षण धाडस पाहून गणेशाच्या पराक्रमाबद्दल त्याची खात्री झाली आणि इंद्राप्रमाणें तोहि गणेशाला शरण गेला.

गिरिजात्मज गणेशाचे पूर्ववयांतील पराक्रम हे असे आहेत. त्याच्या चरित्रांतील पुढील भाग पूर्वी मयूरेश्वराच्या चरित्रांत आलाच आहे.

* * *



# ७. विघ्नहर-ओझर

पुणें जिल्ह्यांतील जुन्नर तालुक्यांत ओझरला विघ्नहराचें स्थान आहे. विघ्नहराचें देवालय पूर्वाभिमुखी आहे. पूर्णाकृति बैठी मूर्ति, डावी सोंड, दोन डोळ्यांत माणकें, कपाळावर हिरा असा मूर्तीचा थाट आहे. बेंबींतहि खडा आहे पण तो शेंदुरानें लिंपून गेला आहे. विघ्नहराच्या दोन्ही बाजूंच्या कमानींत रिद्धिसिद्धीच्या पितळेच्या मूर्ती आहेत. विघ्नहराची मूर्ति महिरपि डौलदार अशा कमानींत आहे. कमानीवर उत्कृष्ट रंगकाम केलेलें आहे.

आंतील सभामंडपाची तक्तपोशी सुमारें वीस फूट उंच असून त्या तक्तपोशीवरहि चित्रें रेखाटलीं आहेत. गाभाऱ्यांत चारी बाजूला छोटे कोनाडे असून त्यांत पंचायतनाच्या मूर्ती आहेत. आंतील गाभाऱ्यांत दोन गवाक्षें असून त्यांना कांचा लावल्या आहेत. आंत चारी बाजूंना

आरशांची रांग आहे. श्रींच्या डावीकडे भिंतीवर कमलस्थित लक्ष्मी असून, उजवीकडील भिंतीवर विष्णूचें चित्र रेखाटलें आहे.

विघ्नहराचें देवालय बंदिस्त आहे. चारी बाजूंना उत्कृष्ट स्थितींत असलेला दगडी तट आहे. मुख्य देवाच्या मूर्तीसमोरील सभामंडप फार तर औरसचौरस दहा फूट असेल. त्यानंतर देवळाच्या कांहींशा खुज्या दरवाजांतून बाहेर आलें म्हणजे दाराशींच काळ्या गुळगुळीत पाषाणाची उंदराची मूर्ति आहे. ही मूर्ति जणूं पळण्याच्या ऐन तयारींत एका दगडी आसनावर उभी आहे. पहिल्या सभामंडपाला लागूनच पांच फुटांचा एक औरसचौरस असा दुसरा सभामंडप लागतो. देवाची शेज आंतच होते. या दुसऱ्या सभामंडपानंतर बाहेर सुमारें २० फुटांचा, दगडी फरशी असलेला सभामंडप आहे. त्या सभामंडपाच्या दक्षिणेला व उत्तरेला बाहेर पडण्याचीं द्वारें आहेत. तिसऱ्या सभामंडपांत धुंडिराजाची मूर्ति आहे. या सभामंडपांतून बाहेर पडतांना पांच पायऱ्या उतरून गेलें म्हणजे खुलें दगडी अंगण लागतें. तें चांगलें तीस फूट रुंद व चाळीस फूट लांब असावें. या अंगणाच्या परिसरांत मुख्य दरवाजाच्या भोंवतीं प्रदक्षिणा घालण्यासाठीं पंधरा फुटांची जागा आहे. अंगण संपलें कीं अंगणाच्या कडेला दोन्ही बाजूंना प्रत्येकीं २५–३० फूट अशा दगडी ओवऱ्या आहेत. त्या ओवऱ्यांना अंतर्बाह्य अशा दगडी डौलदार कमानी आहेत. या ओवऱ्यांतून बाहेर पडण्याला पांच फुटी रस्ता आहे. एका ओवरीच्या खालीं तळघर असून त्यांत हंड्या, झुंबरें, पालखी इत्यादि श्रींचें सामान आहे. दुसऱ्या ओवरींत भैरवनाथाची शेंदूरचर्चित मूर्ति आहे. देवळाच्या भिंतीवरून चालण्यासाठीं वाट आहे. देवालयाच्या अंगणांत दोन दगडी दीपमाळी चहूंबाजूंनीं जणूं हात पसरून दिवे धारण करण्यास सिद्ध अशा उभ्या आहेत. या दीपमाळींवर त्रिपुरी पौर्णिमेपासून चतुर्थीपर्यंत पांच दिवस पणत्यांची रोषणाई केली जाते.

मुख्य देवालयाच्या घुमटावर असंख्य मूर्ती कोरलेल्या आहेत. घुमट वर निमुळता होत जाऊन वर सोनेरी कळस आहे. सभामंडपावरहि कळस आहे. या पूर्वाभिमुखी देवालयांत प्रवेश करतांना १० पायऱ्या लागतात. नंतर चार पायऱ्या उतरल्या म्हणजे अंगण लागतें. प्रमुख देवळांत शिरतांना दोन्ही बाजूंना कोरलेले दगडी भालदार चोपदार आपलें स्वागत करतात. देवळाचा दर्शनी भाग कोरीव असून त्यावर दोन ऋषींच्या मूर्ती कोरल्या आहेत. त्यांपैकीं एका ऋषीच्या हातीं माळ आहे तर दुसऱ्या ऋषीच्या समोर पुस्तक आहे. वरच्या बाजूला एक वीणाधारी मूर्ति आहे. दक्षिण बाजूनें देवालयांत प्रवेश केला म्हणजे आंत शिरतांना २५ पायऱ्या लागतात. नदीकडून येतांना प्रथम इनामदारांचा वाडा, नंतर महादेवाचें देवालय आणि नंतर २५ पायऱ्या चढल्या कीं विघ्नहराच्या मंदिरांत येतां येतें. देवळाच्या उत्तर बाजूला पायऱ्या नाहींत. देवळाच्या समोर पूर्वदिशेला धर्मशाळा, राममंदिर, मुंजाबाचा पार व पिंपळाचें झाड आहे. देवळाच्या बाहेर पडलें कीं हें सारें लागतें. देवळांत प्रवेश केला कीं, एक कासव आहे. अंगणांत दोन सुरूचीं झाडें, दोन मांदार, दोन शमी, कण्हेर, जाई, पारिजातक असे विविध वृक्ष-वेल आहेत. देवालयाचें इनामी उत्पन्न आतां खालसा झालें असून हल्लीं देवळाची व्यवस्था गांवकरीच बघतात.

या गांवची नदी कुकडी. ती ओलांडण्यापूर्वी देवालय नदीकांठावरूनच दिसतें. ओझरला ही नदी बरीच रुंदावली आहे. जुन्नरला मात्र ती निरुंद आहे. या नदीच्या कडेला एक बारीक धबधबा आहे. त्याच्या उत्तरेला परटांचीं घरें आहेत. अशी एक आख्यायिका सांगतात कीं, या परटांपैकीं एक परीट धुण्यासाठीं या धबधब्यावर गेला असतां तो त्या धबधब्याखालीं बुडाला. विटाळशीचे कपडे त्यानें घाटावर धुतले म्हणून तो खालीं ओढला गेला. तेरा दिवसांनीं तो बाहेर आला तेव्हां त्याच्या हातीं विभूति ( भस्म ) आली. त्या परटानें अशी हकीगत सांगितली कीं, त्या

धबधब्याखालीं देऊळ असून त्या देवळांत गणेशाची मूर्ति आहे, त्या ठिकाणीं चार समया तेवत आहेत. तो परीट आंत असतांना त्याला रोज पंचपक्वान्नांचें जेवण मिळत असे. त्यानें ही हकीगत बाहेर सांगू नये असें त्याला तेथें बजावण्यांत आलें, पण त्यानें ती हकीगत बाहेर फोडली. त्यामुळें तो परीट तत्काळ गतप्राण झाला. तो परीट तिकडे असतांना तो मेला असें समजून त्याचा तेरावा दिवसहि घालण्यांत आला होता. पण तेरा दिवसांनीं तो परत आला. परंतु तेथील हकीगत बाहेर फोडल्यामुळें तो लगेच गतप्राण झाला.

दुसरीहि एक आख्यायिका सांगतात. एकदा दुपारीं बाराच्या सुमारास या धबधब्यावर बैल धुण्यासाठीं नेत असतांना तो बैल बुडाला. तो वर आला तेव्हां त्याच्या कानांत राख भरून आली होती. आल्यावर तो बैल गतप्राण झाला.

हा धबधबा अविरत पडत आहे. धबधब्यावर म्हसोबाचें देवस्थान आहे. धबधब्यावर दोन कुंडें आहेत. त्यांच्यांतूनच पाणी खालीं पडत आहे. तीं कुंडें आतां फक्त कंबरेइतकी खोल आहेत. हा धबधबा ज्या ठिकाणीं पडतो त्या ठिकाणीं पाण्याला अंत नाहीं. या ठिकाणीं मासे खूप आहेत. मासे धरण्यासाठीं बरेच हौशी लोक या ठिकाणीं येतात.

या ठिकाणीं पार्श्वऋषींनीं तपश्चर्या केली. विघ्नहर प्रसन्न झाले. त्यांनीं पार्श्वऋषींना विचारलें, “काय हवें आहे?” ऋषि म्हणाले, “धन नको, दौलत नको. विघ्नासुर त्रास देत आहे, त्याचा फक्त बंदोबस्त करा.” गणपतिरायांनीं या विघ्नासुराचा बंदोबस्त केला व या ठिकाणीं ते विघ्नहर होऊन राहिले.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 33८१८ वि:
क्रमांक 376 नों: दि:

## मुद्गल पुराणांतील दोन कथा

एकदां नारद इंद्रलोकाला गेला, आणि त्यानें इंद्राला सांगितलें की

" हिमालय पर्वतावर अभिनंदन या नांवाचा राजा एक यज्ञ करणार आहे. त्या यज्ञांत तुला हविर्भाग देण्याची इच्छा त्याच्या मनांत नाहीं. असा यज्ञ करणारे पुष्कळ ब्राह्मण त्यानें जबरदस्तीनें मिळविले आहेत. त्या यज्ञाला आज–उद्या सुरुवात होणार आहे. "

हें ऐकून इन्द्र फार रागावला आणि त्यानें कालाचें स्मरण केलें. तत्काळ काळ इन्द्रापुढें हजर झाला. नंतर इन्द्रानें काळाला त्या यज्ञाविषयीं वृत्तान्त सांगून त्याला आज्ञा केली कीं, " तूं जाऊन या यज्ञाचा नाश कर. सर्व जग तुझ्या स्वाधीन आहे. यामुळें तुला ही गोष्ट करणें सोपें आहे. "

काळानें इन्द्राची आज्ञा मान्य केली आणि विघ्नासुराचें स्वरूप घेऊन तो अभिनंदनाच्या यज्ञमंडपांत गेला आणि त्यानें यज्ञाचा विध्वंस केला. इतकेंच नाहीं तर त्यानें कर्मभूमीवरील सर्व वैदिक कर्माचा लोप केला. कर्मलोप झाला म्हणजे देवांना संकट पडतें. अर्थात् विघ्नासुरानें यज्ञविध्वंस केल्यामुळें देवांना ह्याहि वेळीं संकट पडलें. तेव्हां त्यांनीं तप करून, स्तोत्रें म्हणून व ध्यान करून मोठ्या भक्तीनें गणपतीला प्रसन्न करून घेतलें. नंतर देवकार्य करण्यासाठीं परमेश्वर पार्श्वपुत्र झाला. या पार्श्वाच्या पत्नीचें नांव दीपवत्सला असें होतें. त्या दोघांची तपश्चर्या विलक्षण होती. म्हणून त्यांच्या उदरीं हा अवतार झाला. हा बालक पांच वर्षांचा झाल्यावर शंकर आदि सर्व देव पार्श्वाच्या घरीं जाऊन त्यांनीं त्याचें अभिनंदन केलें. " विघ्नासुराला मारावयाचें आहे आणि तुझ्या पुत्राच्या हातून त्याचा वध व्हावयाचा आहे म्हणून तुझ्या पुत्राला युद्धाला जाण्याची आज्ञा दे " असें देवांनीं पार्श्वाला सांगितलें. हें ऐकून पार्श्वाला गहिंवर आला, दुःख झालें, आणि संतापहि आला." माझ्या बाळाला नेऊं नका " असें पार्श्व म्हणतांच गणपति तेथें आला आणि त्यानें वडिलांची समजूत घालून देवांचें म्हणणें मान्य केलें. नंतर गणपतीनें विघ्नासुराला आपल्या अंकुशानें पकडून त्याला देवांसमोर ओढीत आणलें. विघ्नासुर मायावी होता. त्यानें

अग्नि इत्यादि महाभूतांचीं रूपें धारण केलीं. तथापि गजानन हा स्वतः मायाधीश, आणि राक्षसाच्या मायेचा अधिपति असल्यानें त्यानेंहि अग्नि, वायु, आकाश, महाकाल, अहंकार अशा तऱ्हेचीं श्रेष्ठ, श्रेष्ठतर स्वरूपें धारण करून विघ्नस्वरूपांचा नाश केला. अखेरीस आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून विघ्नासुर गणपतीला शरण आला. त्यानें भक्तिपूर्वक गणपतीचें स्तवन केलें, आणि "मी आपली आज्ञा सदैव पाळीत जाईन" असें गणपतीला वचन दिलें. विघ्नासुर आणखी गणपतीला म्हणाला, "आपल्या चरणकमळीं माझी अखंड भक्ति असावी आणि माझें नांव आपण धारण करावें एवढेंच माझें आपल्याजवळ मागणें आहे."

विघ्नासुरानें जें जें मागितलें तें तें गणपतीनें त्याला दिलें. त्याला आपल्या गणांत घेतलें आणि त्याला सांगितलें, "माझें नांव विघ्नराज होईल, व त्या नांवाचा जप केला असतां सर्व सिद्धी प्राप्त होतील." विघ्नासुराला गणपतीनें असेंहि सांगितलें कीं, "जेथें एखाद्या कार्याचा आरंभ झाला असतां माझें स्मरण होणार नाहीं तें कर्म व त्याचें फळ यामध्यें तूं विघ्नें आणीत जा. शिव, विष्णु प्रमुख सर्व देव, सर्व ऋषिमुनी आणि सर्व प्राणी यांपैकीं जर कोणी अहंकारयुक्त होईल तर त्यांस स्वपदभ्रष्ट करून त्याचे भोग तूं खुशाल भोगीत जा. माझ्या भक्तांना मात्र कोणत्याहि तऱ्हेनें त्रास देत जाऊं नकोस."

पुढें गजाननानें मातापितरांचें समाधान केलें व "महाकार्याच्या वेळीं माझें स्मरण केलें असतां मी सदैव सादर होईन" असें सांगून गणपतीनें आपल्या अवताराची समाप्ति केली.

नंतर देवांनीं नैऋत्य दिशेला भाद्रपद शुद्ध चतुर्थीला मध्यान्हकाळीं गणपतीची स्थापना केली. ही देवांनीं स्थापिलेली मूर्ति सुंदर आहे. सिद्धि आणि बुद्धि या श्री-मूर्तीच्या दोन्ही बाजूला आहेत. आठ दिशांना आठ सिद्धींची स्थापना केली आहे. अष्टभैरव व दहा दिक्पाल यांचींहि

स्थानें तेथें आहेत. शिवप्रमुख सर्व देव, काशीप्रमुख क्षेत्रें, गंगादि नद्या तेथें गणपतीची सेवा करण्याकरितां, गणपतीचें पूजन-अर्चन करण्याकरितां व गणपतीच्या कथा गाण्याकरितां, सदैव सिद्ध असतात. येथील तीर्थांत जे स्नान करतील, या क्षेत्राची यात्रा जे करतील, आणि या क्षेत्रांत जे राहतील ते गणपतिभक्त कृतकृत्य होतील. गणपतीच्या कथांचें जो श्रवण करतो त्याला ऐहिक भोगांची प्राप्ति होऊन अंतीं तो स्वानंदवासी होतो असा गजाननचरित्राचा महिमा आहे. ही कथा सूतांनीं मुद्गल पुराणांत सांगितलेली आहे.

याच पुराणांत महिषासुरासंबंधीं आलेल्या कथेंत विघ्नेश्वराचा उल्लेख आलेला आहे. महिषासुर हा राक्षस ब्रम्हदेवाच्या वरानें त्रिभुवनाचा स्वामी झाला होता. हा अजिंक्य, दुष्ट बुद्धीचा आणि क्रूर स्वभावाचा राक्षस त्रैलोक्याचें राज्य करीत असतां त्यानें स्वर्ग पातालादि चतुर्दश भुवनांत आपले हस्तक पाठवून तेथें आपला अंमल प्रस्थापित केला होता. यामुळें जिकडे तिकडे कर्म लोप होऊन देवांना उपास घडूं लागले. हें पाहून देवर्षींनीं स्वानंदवासी जी सर्वशक्ति देवी तिची हजार वर्षें तपश्चर्या केली. “मी महिषासुराचा वध करते” असें देवीनें ऋषींना आश्वासन दिलें. महिषासुराला पुरुषापासून भीति नाहीं असा वर होता म्हणून ऋषींनीं गणेशाचें देवीस्वरूपानें आराधन केलें. नंतर क्रुद्ध झालेली देवी सिंहावर आरूढ होऊन महिषासुराच्या नगरीला गेली. नगराजवळ गेल्यावर तिनें मोहिनीचें रूप घेतलें आणि अति सुस्वर गायनास आरंभ केला. तें ऐकून प्रन्हादादि राजसचिव बाहेर आले आणि ते तिच्या गाण्यानें रंगून गेले. तिच्या स्वरूपानें मोहित होऊन त्यांनीं तिची प्रार्थना केली कीं, “ तूं महिषासुराची स्त्री हो, म्हणजे तुझें कल्याण होईल.”

तें ऐकून देवी अत्यंत संतापली. तिनें रागानें उत्तर दिलें तें ऐकून

राक्षस चवताळले आणि तिला जबरीनें नगरांत नेण्याकरतां ते तिच्या-वर तुटून पडले. त्यावेळीं तिच्या क्रोधज्वाला इतक्या प्रखर झाल्या कीं कित्येक राक्षसांचे, ओरडत असतांनाच, जळून भस्म झालें. हा गलबला ऐकून महिषासुर बाहेर आला, आणि ती देवी आपणांस वश होत नाहीं असें पाहून व तिनें पुष्कळसे राक्षस मारले आहेत हें जाणून तिच्याशीं युद्ध करण्यास त्यानें प्रारंभ केला. तें युद्ध एक वर्षभर चाललें होतें. त्या देवीचा पराभव झाला, कारण तिला गणेशाचें विस्मरण झालें होतें. आपण शक्तिस्वरूप असतांहि आपल्या हातून महिषासुराचा परा-भव होत नाहीं यावरून आपलें कांहीं तरी चुकत आहे असें तिच्या ध्यानांत आलें. विघ्नेश्वराचें पूजन व स्मरण आपण केलें नाहीं म्हणून आपला पराजय झाला असें वाटून तिनें एकाक्षरी मंत्रानें कित्येक वर्षेपर्यंत विघ्नराजाची एकाग्रतेनें तपश्चर्या केली. तिची निःसीम भक्ति पाहून विघ्नेश प्रकट झाले आणि तिनें केलेली स्तुति ऐकून, ‘महिषासुराला मारण्याचें सामर्थ्य तुला येईल, माझ्या ठिकाणीं तुझी भक्ति अखंड राहील आणि तुला नित्य शांति मिळेल’ असा वर त्यांनीं तिला दिला. विघ्ने-श्वर अंतर्धान पावल्यावर वेदपारंगत ब्राह्मणांच्या साहाय्यानें देवीनें विघ्ने-श्वराची स्थापना केली व नित्य पूजाअर्चा चालेल अशी व्यवस्था केली. नंतर महिषासुराच्या नगरीवर स्वारी करून देवीनें त्याचा पराभव केला; त्यास ठार मारलें आणि वेदोक्त कर्माचा पुन्हां प्रसार केला. हें सर्व करून देवी परत विघ्नेश्वर क्षेत्राला आली आणि तेथें शांत मनानें विघ्नेश्वराचें भजन करीत राहिली.

### गणेश पुराणांतील कथा

गणेशपुराणांत विघ्नहराच्या स्थापनेविषयीं जी कथा आली आहे ती

अशीः– कौंडिण्य ऋषि गणपतीला रोज पुष्कळ दूर्वा वाहात असे. एके दिवशीं त्याची पत्नी आश्रया हिनें त्यास प्रश्न केला कीं, "दूर्वा गणपतीला कां आवडतात?" तेव्हा कौंडिण्यऋषि पुढीलप्रमाणें दूर्वा महात्म्याची कथा सांगू लागले. ते म्हणाले, "पूर्वी यमाच्या नगरांत एक उत्सव झाला. तेव्हां देवगंधर्वादि सर्व तेथें आले होते. त्यावेळीं तिलोत्तमा नृत्य करीत होती. तिच्या सौंदर्यानें यम मोहित झाला त्यामुळें तेथें एक भयंकर राक्षस निर्माण झाला. त्या राक्षसाच्या भयंकर स्वरानें त्रिभुवन त्रस्त झालें व त्याच्या नेत्रांतील अग्नीनें पृथ्वी जळूं लागली. हा प्रकार पाहून सर्व सभासद भयभीत झाले व ते विष्णुलोकीं जाऊन विष्णूची अनेक प्रकारांनीं स्तुति करूं लागले. विष्णूनें त्यांना सांगितलें कीं, "त्या अनलासुराचा वध करण्याला फक्त एक गजाननच समर्थ आहे." म्हणून ते सर्व देव गजाननाकडे गेले आणि त्यांनीं गजाननाची स्तुति केली. त्यांची करुणवाणी ऐकून, गजाननानें बालरूप धारण केलें आणि तो त्यांच्यासमोर आला, आणि त्यांना म्हणाला," अनलासुरानें तुम्हाला पीडा दिली म्हणून त्याचा वध करण्यासाठीं मी या बाळरूपानें प्रकट झालों आहें. त्या राक्षसाच्या वधाचा मी उपाय सांगतों तेवढा करा."

हें गजाननाचें भाषण ऐकून देवांना विस्मय वाटला. इतक्यांत अनलासुर दशदिशा जाळीत पोळीत आणि जें काय सांपडेल तें भक्षण करीत तेथें आला. त्याला पाहून सर्व देव व ऋषिमुनी यांची भयानें गाळण उडाली आणि ते सर्व पळत सुटले. पण बालरूपी गजानन एक बोटभरहि हालला नाहीं.


तो अनलासुर तेथें आला त्यावेळीं मोठमोठ्या पर्वतांचें दडपण असलेली पृथ्वीसुद्धा डळमळूं लागली. त्या राक्षसाच्या भीषण स्वरानें आकाश दुमदुमून गेलें आणि त्याच्या नेत्रांतील अग्नीनें समुद्र कोरडा पडला

परंतु जवळ येतांच त्या बाल गजाननानें त्या राक्षसाला गिळून आपल्या उदरांत साठविलें. प्रत्यक्ष अग्निरूप राक्षसाला गजाननानें आपल्या पोटांत स्थान दिल्यामुळें गजाननाच्या शरीराचा दाह होऊं लागला. तेव्हां इन्द्रादि देव त्या बालकापाशीं आले व त्याच्या अंगाचा दाह शांत व्हावा म्हणून इन्द्रानें शीतल आणि अमृतमय चंद्र त्याच्या मस्तकावर ठेवला. म्हणून त्याला भालचंद्र हें नांव प्राप्त झालें. ब्रह्मदेवानें सिद्धि आणि बुद्धि या दोन मानसकन्या निर्माण करून त्या त्याला अर्पण केल्या. विष्णूनें आपल्या हातांतील कमळ त्याला दिलें, त्यामुळें त्याला पद्मपाणि असें नांव पडलें. वरुणानें गजाननाच्या मस्तकावर थंडगार उदकाचा अभिषेक केला. शंकरांनीं त्याला सहस्रमस्तकांचा नाग अर्पण केला, पण गजाननाच्या अंगाचा दाह कांहीं केल्या शांत होईना. अखेरीस ८८ सहस्र मुनींनीं, प्रत्येकानें एकवीस एकवीस अशा हिरव्यागार दुर्वा गणेशाच्या मस्तकावर घातल्या तेव्हां मात्र गजाननाच्या शरीराचा दाह शांत झाला, आणि त्या देवाधिदेवाचें मन सुप्रसन्न झालें. गजानन म्हणाला, "अनेक उपायांनीं माझ्या शरीराचा दाह शमला नाहीं पण दूर्वांनीं मात्र तो शमला म्हणून मी दूर्वांना प्रिय समजतों. मला त्या अर्पण करणाराला हजारों यज्ञयाग, व्रतें, दानें, तीर्थें केल्याचें पुण्य लागेल."

असें भाषण करून गजाननानें आपलें बालरूप गुप्त केलें. अनलासुराचा प्रशम केला म्हणून तेव्हांपासून गजाननाला 'कालानलप्रशमन' असें नांव प्राप्त झालें. देवांनीं त्या ठिकाणीं एक सुंदर देवालय निर्माण करून त्यामध्यें गजाननाच्या मूर्तीची स्थापना केली, आणि त्याला 'विघ्नहर' असें नांव दिलें.

ओझर येथें प्रचलित असलेल्या आख्यायिकेवरून त्या स्थळाचा पार्श्वपुत्राच्याच कथानकाशीं संबंध येतो हें उघड आहे.

* * *



# ८. रांजणगांवचा गणपति

पुणें–नगर मोटार रस्त्यावर पुण्यापासून ३१ व्या मैलावर हें अष्टविनायकांपैकीं एक क्षेत्र आहे. याचें नांव 'मणिपूर क्षेत्र' असें आहे मणि म्हणजे रांजण, आणि म्हणून या क्षेत्राचें आधुनिक नांव रांजणगांव असें पडलें. या स्थानाच्या गणपतीचा भालप्रदेश विशाल असून सोंड सुरेख आहे. श्रींची एकुण मूर्तीच डौलदार आहे.

देवालय पूर्वाभिमुखीं आहे. उत्तरायण किंवा दक्षिणायन यांचा मध्यकाल सुरू झाला म्हणजे सूर्याचीं किरणें नेमकीं या मूर्तीवर पडतात. त्यावेळची शोभा काय वर्णावी? सूर्याचा आरक्त प्रकाश शेंदूरचर्चित मूर्तीवर पडला म्हणजे जी रंगसंगति बनते ती बघून भक्ताचें भान अक्षरशः हरपून जातें, जीव वेडावतो व मूर्तीवरून दृष्टि परतत नाहीं.

देवालयाचा सभामंडप इंदूरचे सरदार किबे यांनीं बांधला. पेशवाईंतील

सरदार पवार व शिंदे यांनीं ओवऱ्या बांधल्या. या देवाला मल्हारराव होळकर, महादजी शिंदे, यशवंतराव चंद्रचूड यांच्याकडून इनामें मिळालीं होतीं. भोर संस्थानाकडूनहि नेमणूक होती. हल्लीं मात्र ती बंद झाली आहे. आंतील दोन गाभारे थोरले माधवराव पेशवे यांनीं बांधले.

गणपतीच्या उजव्या बाजूला ऋद्धिसिद्धि उभ्या आहेत. पालखीच्या भोगमूर्तीहि उभ्या आहेत. येथून एका मैलावर सोमेश्वर नांवाचें शंकराचें सिद्धिस्थान पिंपरी या गांवीं आहे. पूर्वी निजामी अमलांत याच रस्त्यावरून पुणें तें निजामींत वाहतूक चालू असे. खर्ड्याच्या लढाईला पेशवे याच रस्त्यावरून गेले.

निजामी अमलाच्या वेळीं बैलांचे तांडे घेऊन जाणाऱ्या नामदेवबुवा तेली या नांवाच्या व्यापाऱ्यास हें दैवत प्रसन्न झालें अशी आख्यायिका आहे. या नामदेवबुवाची येथें जवळच समाधि आहे. भिलवडीकर महाराजांनीं येथें १९१७ सालीं तपश्चर्या केली. गुर्जर नामक शास्त्री यांनींहि येथें तपश्चर्या केली. त्या उभयतांना येथेंच दृष्टान्त झाले. येथील देव नवसाला पावतो असा भाविकांना उत्कट विश्वास वाटतो. लिंबराज महाराजांचें जन्मस्थान येथून चार-पांच मैलांवर आहे. येथून बारा मैलांवर पारनेर तालुक्यांतील पिंपळनेर येथें निळोबाराय यांची समाधि आहे. देवदैठणचे लिंबराज महाराज यांचा येथें काल्याचा मान आहे. त्यांच्या कीर्तनापूर्वी खुद्द मंगलमूर्तीनीं त्यांच्या हातीं तांबूल दिला म्हणून भाद्रपदीं यात्रेंत त्यांचा काल्याचा मान आहे. हे लिंबराज महाराज तुकारामकालीन होत. येथून दहा मैलांवर लिंबराज महाराजांची समाधि आहे.

रांजणगांवच्या देवळानजीकच पक्क्या पाण्याची एक विहीर आहे. ती दोन ओवऱ्यांच्या मध्यें आहे. १९३३ सालीं माघ शु. ४ ला या विहिरीला पाणी लागलें. या विहिरीचें पाणी दुष्काळांतहि आटत नाहीं.

रांजणगांव हा गांव बागायती असून येथून संत्र्या-मोसंब्यांचा मोठाच व्यापार चालतो.

## पौ रा णि क क था

वरदविनायकाच्या कथेंत गृत्समदाची माहिती आली आहे. या गृत्समदाला एकदां इतकी मोठी शिंक आली कीं तिच्या आवाजानें पृथ्वी आणि आकाश हीं दणाणून गेलीं. त्यावेळीं जास्वंदीच्या फुला-सारखा लाल तेजस्वी असा एक बालक त्याच्या दृष्टीस पडला. गृत्सम-दानें त्याला विचारलें, "बाळ तूं कोण, कोणाचा आहेस"? तेव्हां तो बालक म्हणाला, "महाराज आपण सर्वज्ञ असून मला असा प्रश्न करतां याचें मला नवल वाटतें. हे तात, माझा जन्म आपल्याच शिंकेपासून झाला असल्यानें मी आपला पुत्र आहें. मी अजून लहान आहें. पण मी मोठा झालों म्हणजे माझा पराक्रम आपल्या नजरेस पडेल. मी त्रिभुवन जिंकीन आणि इंद्रालाहि पादाक्रांत करीन."

त्या बालकाचें हें भयंकर भाषण ऐकून गृत्समदाला थोडें भय वाटलें तरी त्याचबरोबर हर्षहि झाला.

गृत्समद त्याला म्हणाला, "ज्या अर्थीं तूं माझा पुत्र आहेस त्या अर्थीं तुला मंत्रोपदेश केला पाहिजे. मी तुला 'गणानां त्वा' हा वेदोक्त मंत्र सांगतों. या मंत्रानें तूं विधिपूर्वक अनुष्ठान केलेंस तर गणपति प्रसन्न होऊन तुझ्या सर्व कामना परिपूर्ण करील."

त्यानें पित्याच्या आज्ञेप्रमाणें बहुत काळपर्यंत तपश्चर्या केली. तेव्हां हत्तीसारखा शब्द करीत गणपति तेथें आला आणि त्याला 'वर माग' असें सांगितलें. तेव्हां तो बालक म्हणाला, " आपण जर खरोखर वर देणार असाल तर सर्व ब्रह्मांडावर स्वामित्व करण्याचें सामर्थ्य मला द्या. देव, दानव, मनुष्य, यक्ष, गंधर्व, किन्नर, मुनी वगैरे सर्व प्राणी मला वश

व्हावेत. इंद्र आदि लोकपालांनीं माझी सेवा करावी, माझ्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात, अनेक प्रकारचे भोग मला प्राप्त व्हावेत आणि शेवटीं माझा उद्धार व्हावा असा वर आपण मला द्या."

तेव्हां गजानन म्हणाले, "एका शंकरावांचून तुझा पराभव कोणी करूं शकणार नाहीं. त्रिभुवनांतील सर्व प्राणी तुझ्या आज्ञेंत वागतील. मी तुला एक लोखंडाचें, एक रुप्याचें आणि एक सुवर्णाचें अशीं तीन पुरें किंवा विमानें देतों. हीं तीन पुरें तुझ्याजवळ असतील म्हणून तुला त्रिपुर असें नांव प्राप्त होईल. या लोकीं तूं अनेक उपभोगाचे सुख अनुभवल्यानंतर शंकर एकाच बाणानें या पुरांचा भेद करतील तेव्हां तुला मुक्ति मिळेल आणि तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील."

त्रिपुरासुराला गजाननाचें वरप्रदान झालें त्यावेळीं तो बंगालमध्यें होता. जेथें त्याला गजाननाचा वर मिळाला तेथें त्यानें एक देवालय बांधून त्यांत गणपतीची मूर्ति स्थापन केली, आणि गणेशपूर नांवाचें गांव वसविलें. नंतर त्यानें दिग्विजयाला प्रारंभ केला. त्यानें प्रथम मृत्युलोक जिंकला. त्यानें हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ अशी चतुरंग सेना गोळा केली. पृथ्वीवरील राजे त्याचें दास्य करूं लागले. जे त्याच्या विरुद्ध होते त्यांना त्यानें ठार मारलें. नंतर त्यानें स्वर्गावर स्वारी केली. इंद्र ऐरावतावर बसून युद्धकलेंत निष्णात असलेल्या देवांसह युद्धाला सज्ज होऊन आला. त्रिपुरासुरानें आपल्या सैन्याचे तीन भाग करून एकाचें आधिपत्य स्वतःकडे घेतलें आणि वज्रदंत व भीमकाय या युद्धनिपुण राक्षसांपैकीं एकाला पृथ्वीवर व एकाला पाताळांत युद्धासाठीं रवाना केलें. भीमकायानें प्रथम इंद्राच्या नंदनवनाचा विध्वंस केला, व दूत धाडून इंद्राला युद्धाला आव्हान केलें. दोघांचें घोर युद्ध होऊन उभयपक्षाचे असंख्य वीर कामास आले. कांहीं वेळानें राक्षससैन्य माघार घेऊं लागलें तेव्हां त्रिपुरानें त्याला धीर दिला, आणि स्वतः युद्ध करण्यास तो सिद्ध झाला. इंद्र आणि त्रिपुर यांची गांठ

रांजणगांव हा गांव बागायती असून येथून संत्र्या-मोसंब्यांचा मोठाच व्यापार चालतो.

## पौ रा णि क  क था

वरदविनायकाच्या कथेंत गृत्समदाची माहिती आली आहे. या गृत्समदाला एकदां इतकी मोठी शिंक आली कीं तिच्या आवाजानें पृथ्वी आणि आकाश हीं दणाणून गेलीं. त्यावेळीं जास्वंदीच्या फुला-सारखा लाल तेजस्वी असा एक बालक त्याच्या दृष्टीस पडला. गृत्सम-दानें त्याला विचारलें, "बाळ तूं कोण, कोणाचा आहेस"? तेव्हां तो बालक म्हणाला, "महाराज आपण सर्वज्ञ असून मला असा प्रश्न करतां याचें मला नवल वाटतें. हे तात, माझा जन्म आपल्याच शिंकेपासून झाला असल्यानें मी आपला पुत्र आहें. मी अजून लहान आहें. पण मी मोठा झालों म्हणजे माझा पराक्रम आपल्या नजरेस पडेल. मी त्रिभुवन जिंकीन आणि इंद्रालाहि पादाक्रांत करीन."

त्या बालकाचें हें भयंकर भाषण ऐकून गृत्समदाला थोडें भय वाटलें तरी त्याचबरोबर हर्षहि झाला.

गृत्समद त्याला म्हणाला, "ज्या अर्थीं तूं माझा पुत्र आहेस त्या अर्थीं तुला मंत्रोपदेश केला पाहिजे. मी तुला 'गणानां त्वा' हा वेदोक्त मंत्र सांगतों. या मंत्रानें तूं विधिपूर्वक अनुष्ठान केलेंस तर गणपति प्रसन्न होऊन तुझ्या सर्व कामना परिपूर्ण करील."

त्यानें पित्याच्या आज्ञेप्रमाणें बहुत काळपर्यंत तपश्चर्या केली. तेव्हां हत्तीसारखा शब्द करीत गणपति तेथें आला आणि त्याला 'वर माग' असें सांगितलें. तेव्हां तो बालक म्हणाला, "आपण जर खरोखर वर देणार असाल तर सर्व ब्रह्मांडावर स्वामित्व करण्याचें सामर्थ्य मला द्या. देव, दानव, मनुष्य, यक्ष, गंधर्व, किन्नर, मुनी वगैरे सर्व प्राणी मला वश

व्हावेत. इंद्र आदि लोकपालांनीं माझी सेवा करावी, माझ्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात, अनेक प्रकारचे भोग मला प्राप्त व्हावेत आणि शेवटीं माझा उद्धार व्हावा असा वर आपण मला द्या."

तेव्हां गजानन म्हणाले, "एका शंकरावांचून तुझा पराभव कोणी करूं शकणार नाहीं. त्रिभुवनांतील सर्व प्राणी तुझ्या आज्ञेंत वागतील. मी तुला एक लोखंडाचें, एक रुप्याचें आणि एक सुवर्णाचें अशीं तीन पुरें किंवा विमानें देतों. हीं तीन पुरें तुझ्याजवळ असतील म्हणून तुला त्रिपुर असें नांव प्राप्त होईल. या लोकीं तूं अनेक उपभोगाचे सुख अनुभवल्यानंतर शंकर एकाच बाणानें या पुरांचा भेद करतील तेव्हां तुला मुक्ति मिळेल आणि तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील."

त्रिपुरासुराला गजाननाचें वरप्रदान झालें त्यावेळीं तो बंगालमध्यें होता. जेथें त्याला गजाननाचा वर मिळाला तेथें त्यानें एक देवालय बांधून त्यांत गणपतीची मूर्ति स्थापन केली, आणि गणेशपूर नांवाचें गांव वसविलें. नंतर त्यानें दिग्विजयाला प्रारंभ केला. त्यानें प्रथम मृत्युलोक जिंकला. त्यानें हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ अशी चतुरंग सेना गोळा केली. पृथ्वीवरील राजे त्याचें दास्य करूं लागले. जे त्याच्या विरुद्ध होते त्यांना त्यानें ठार मारलें. नंतर त्यानें स्वर्गावर स्वारी केली. इंद्र ऐरावतावर बसून युद्धकलेंत निष्णात असलेल्या देवांसह युद्धाला सज्ज होऊन आला. त्रिपुरासुरानें आपल्या सैन्याचे तीन भाग करून एकाचें आधिपत्य स्वतः-कडे घेतलें आणि वज्रदंत व भीमकाय या युद्धनिपुण राक्षसांपैकीं एकाला पृथ्वीवर व एकाला पाताळांत युद्धासाठीं रवाना केलें. भीमकायानें प्रथम इंद्राच्या नंदनवनाचा विध्वंस केला, व दूत धाडून इंद्राला युद्धाला आव्हान केलें. दोघांचें घोर युद्ध होऊन उभयपक्षाचे असंख्य वीर कामास आले. कांहीं वेळानें राक्षससैन्य माघार घेऊं लागलें तेव्हां त्रिपुरानें त्याला धीर दिला, आणि स्वतः युद्ध करण्यास तो सिद्ध झाला. इंद्र आणि त्रिपुर यांची गांठ

पडली. कांहीं वेळानें त्रिपुरानें आपल्या तलवारीनें इंद्राचें वज्र त्याच्या हातांतून खालीं पाडलें. त्रिपुरानें तें वज्र घेऊन ऐरावताच्या डोक्यावर प्रहार केला. तेव्हां तो हत्ती ची ची करीत मागें सरला. नंतर त्रिपुर आणि इंद्र यांचें मल्लयुद्ध जुंपलें. तें चाललें असतां त्रिपुरानें चपळाई करून इंद्राचे पाय धरले आणि त्याला गरगर फिरवून दूर झोकून दिलें. तो कोठें पडला याचा देवांना पत्ता लागेना. बराच वेळ शोध केल्यावर तो मूर्च्छित अवस्थेंत सांपडला, तेव्हां सर्व देवांनीं त्याला उपचार करून सावध केलें. नंतर इंद्रादि सर्व देव हिमालयाच्या दरींत जाऊन लपून बसले.

त्रिपुरानें मोठ्या थाटानें अमरावतींत प्रवेश केला आणि तो समारंभानें इंद्राच्या आसनावर जाऊन बसला. स्वर्गांतील देवांचें पूर्वी असलेले अधिकार त्यानें आपल्या नजीकच्या दैत्यांना दिले. गंधर्वांचें गायन व चारणांचा स्तुतिपाठ श्रवण करीत आणि अप्सरांचा उपभोग घेत त्रिपुरासुर आनंदानें स्वर्गाचें राज्य करूं लागला.

त्रिपुरानें स्वर्गाचें राज्य हस्तगत केल्याचें ब्रह्मदेवाला समजलें तेव्हां तो कमळांत लपला. विष्णूनें वैकुंठ सोडला आणि त्यानें क्षीरसागराचा आश्रय केला. त्रिपुरानें चंड आणि प्रचंड असे दोन मानसपुत्र निर्माण केले. एकाला त्यानें ब्रह्मलोकाचें व दुसऱ्याला विष्णुलोकाचें राज्य दिलें. त्यानें स्वतः कैलास पर्वत हालविला. पार्वती घाबरली पण त्रिपुराचा पराक्रम पाहून शंकरांना आनंद झाला. त्यानें त्रिपुराला " वर माग " असें सांगितलें. तेव्हां त्या दैत्यानें कैलास पर्वताची मागणी केली. शंकरानें आपलें कैलासावरील स्थान त्याला अर्पण केलें आणि आपण स्वतः मंदारपर्वतावर गेला.

त्रिपुराचा सेनापति भीमकाय यानें पृथ्वीवरील सर्व राजांकडून खंडणी घेतली, सर्व देवकृत्यें बंद केलीं, अग्निकुंडांचा नाश केला, ऋषींचे आश्रम

उद्ध्वस्त केले आणि तपस्यांना बंदींत टाकलें. स्वाहाकार, स्वधाकार आणि वषट्कार हे सर्व बंद पडले. वेदघोष ऐकूं येईनासा झाला; आणि जिकडे तिकडे नानाप्रकारचे दुराचार माजून राक्षसांचें राज्य सुरू झालें. दुसरा सेनापति पाताळांत गेला होता. त्या वज्रदंष्ट्रानें शेष, वासुकी, तक्षक, वगैरे नागांचा पराभव केला, त्यांच्या सुंदर स्त्रिया हरण केल्या, त्यांची उत्तमोत्तम रत्नें त्यांच्याकडून घेतलीं आणि तीं त्यानें त्रिपुराला नजर केलीं. येणें-प्रमाणें त्रिपुरदैत्य त्रिभुवनाचें राज्य करूं लागला.

पराभवानंतर गिरिकंदरांत लपून बसलेल्या इंद्रादि देवांनीं त्रिपुराच्या वधासंबंधीं विचार केला, तेथें नारद आला आणि म्हणाला, " त्रिपरानें अनेक वर्षें गजाननाची तपश्चर्या केली, यामुळें त्याला मोठें सामर्थ्य प्राप्त झालें आहे. परंतु शंकरच त्याचा वध करील असें गजाननानें त्याला सांगून ठेवलें आहे. यासाठीं तुम्ही गजाननाची तपश्चर्या करून त्याला प्रसन्न करून घ्या. "

नारदानें त्यांना एकाक्षरमंत्राचा उपदेश केला आणि त्याचें विधान सांगितलें. नारदानें सांगितल्याप्रमाणें देवांनीं तपश्चर्या केली. गजानन प्रसन्न झाला. तो प्रकट झाल्यावर देवांनीं आठ श्लोकांनीं त्याची स्तुति केली. हे श्लोक संकटनाशनस्तोत्र म्हणून प्रसिद्ध आहेत. गणपतीनें या स्तोत्राला वर दिला कीं, " जो कोणी भक्तियुक्त अंतःकरणानें तीन दिवस या स्तोत्राचा पाठ करील त्याला कोणत्याहि संकटाची पीडा होणार नाहीं. "

या प्रमाणें गजाननानें देवांना आश्वासन दिल्यावर, तो ब्राह्मणाच्या रूपानें त्रिपुराकडे गेला. त्यावेळीं त्रिपुर सिंहासनावर बसला होता. त्यानें ब्राह्मणाला आदरपूर्वक आसनावर बसविलें, आणि विचारलें " तूं कोण, कशासाठीं आलास आणि तूं कोणती विद्या शिकला आहेस ? "

ब्राह्मणानें सांगितलें, " मी ब्राह्मण असून चौसष्ट कला मला अवगत

आहेत. म्हणून मला ‘ कलाधर ’ असें म्हणतात. मी लोककल्याणासाठीं त्रिभुवनांत हिंडत असतों. तुझी कीर्ति ऐकून मी मुद्दाम तुझ्या दर्शनासाठीं आलों आहे. तुझें वैभव पाहून मला फार आनंद झाला आहे. ”

त्रिपुरानें ब्राह्मणाला सांगितलें, “ तुझी कला जर मला पसंत पडली तर मी तुला माझे प्राण सुद्धा देईन. ”

कलाधर म्हणाला, “ आपल्या शिल्पज्ञानाच्या बळानें तुला उत्कृष्ट प्रकाराचीं तीन विमानें करून देतों. त्या विमानांतून एका क्षणांत वाटेल तेथें जातां येईल; आणि तूं जें कांहीं मनांत आणशील तें प्राप्त होईल. तसेंच एका शंकरावांचून कोणीहि त्या विमानाचा भेद करूं शकणार नाहीं. जेव्हां शंकर एका बाणानें तुझ्या विमानाचा भेद करील तेव्हां तुझा नाश होईल. ”

नंतर कलाधरानें उत्तम प्रकारचीं तीन पुरें तयार केलीं. तीं पाहून त्रिपुराला फार आनंद झाला, आणि तो म्हणाला, “ कलाधरा, तुझें चातुर्य पाहून मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. तरी तुला काय पाहिजे असेल तें तूं माग. ”

कलाधर म्हणाला, “ मी मागें एकदां कैलास पर्वतावर गेलों होतों, तेथें ‘ चिंतामणि ’ या नांवाची एक गजाननाची मूर्ति मीं पाहिली. ती मूर्ति जर तूं मला देशील तर मी संतुष्ट होईन.”

त्रिपुर म्हणाला, “ ठीक आहे. त्या शंकराची कथा काय ? मी त्याला चाकराप्रमाणें तुच्छ लेखतों. ”

असें बोलून त्रिपुरानें, आपल्या वैभवाला शोभेल अशा प्रका· कलाधराची पूजा केली आणि त्याला दहा गांव आणि बहुमोलाचे पदा अर्पण केले.

कलाधर निघून गेल्यावर त्रिपुरानें शंकराकडे एक दूत पाठवू चिंतामणिमूर्तीची मागणी केली. त्यानें दूताबरोबर निरोप केला कीं, “ मी

तिन्ही लोक जिंकले असल्यानें त्रिभुवनाचा मालक झालों आहें. म्हणून तूं चिंतामणीची मूर्ति मला सामोपचारानें दे."

दूताचा तो निरोप ऐकून शंकर म्हणाले, "तूं दूत आहेस म्हणून मदनाप्रमाणें तुझें जाळून भस्म करीत नाहीं. दुसरा कोणी असता तर त्याचा मी त्काळ वध केला असता. त्या त्रिपुराची किंमत काय! ती चिंतामणीची मूर्ति त्याच्यासारख्या उन्मत्त पुरुषाला जन्मांतरीहि मिळणार नाहीं."

दूत हात हालवीत आला तेव्हां त्रिपुराला क्रोध आला. त्यानें आपलें सैन्य तयार करून मंदारपर्वतावर स्वारी केली. परंतु गजाननाची पूजा न करतां शंकर त्रिपुराशीं युद्ध करावयास गेला. त्रिपुरानेंहि शंकरावर चाल केली. उभयतांचें घोर युद्ध झालें. वीरांच्या रक्ताचा युद्धभूमीवर सडा पडला. पुढें त्रिपुर आणि शंकर यांचें मल्लयुद्ध जुंपलें.

नंतर कार्तिकेयाशीं प्रचंड, नंदीबरोबर चंड, पुष्पदंताबरोबर कालकूट, वीरभद्राबरोबर वज्रदंष्ट्र, इंद्राबरोबर त्रिपुराचा प्रधान, जयंताबरोबर त्रिपुराचा पुत्र, बृहस्पतीबरोबर शुक्राचार्य असे अनेक वीर आपल्या बरोबरीच्या वीरांशीं युध्द करूं लागले. प्रचंडानें कार्तिकेयावर नऊ बाण सोडले पण कार्तिकेयानें ते तत्काळ तोडून टाकले आणि त्यानें उलट प्रचंडावर पांच बाण सोडले. त्यामुळें प्रचंड मूर्च्छित होऊन पडला. नंदीनें चंडाला पांच बाणांनीं हतवीर्य केलें. पुष्पदंत भीमकायाच्या पांच ाणांनीं घाबरला होता पण त्यानें भीमकायाला तीन बाणांनींच जमिनी- लोळविलें. अशा प्रकारें गणांनीं आपला पराक्रम त्रिपुराच्या सैनि- ा दाखविला. त्रिपुराच्या सैन्याचा पराभव झाला आणि त्याचे सैनिक दिसेल तिकडे पळत सुटले. शंकराचे गण त्यांचा पाठलाग करूं ले. हें पाहून त्रिपुराला मनस्वी संताप आला आणि त्यानें अस्त्रला सुरुवात केली. त्यानें प्रथम वारुणास्त्र सोडलें त्यामुळें मुसळधार ाऊस पडूं लागला. शंकरानें वायु-अस्त्राचा प्रयोग केला यामुळें मोठा

वारा सुटला आणि आकाशांतील मेघ नाहींसे झाले. वायूनें राक्षसांच्या सैन्याची गाळण उडाली. त्रिपुरासुरानें पन्नगास्त्र सोडलें. तेव्हां चोहोकडे सर्पच सर्प निर्माण झाले आणि त्यांनीं वायूचें भक्षण केलें. लगेच त्रिपुरानें अग्नि-अस्त्र देवांवर सोडलें त्यामुळें देवसैन्यावर अग्नीचा वर्षाव सुरू झाला. थोड्या वेळांत अग्नीच्या ज्वालांतून एक भयंकर पुरुष उत्पन्न झाला. त्यानें आपल्या दाढांनीं युक्त अशा मुखानें देवांचें सैन्य खाण्यास प्रारंभ केला. त्या पुरुषाचा शब्द भयंकर असून त्याच्या श्वासोच्छ्वासानें समरभूमींतील हत्ती, घोडे उडून जाऊं लागले. त्यामुळें देवसैन्य भयभीत झालें आणि तें शंकराच्या आड लपलें. त्याला धीर देऊन शंकरानें पर्जन्यास्त्र सोडलें आणि एका बाणानें त्या पुरुषाला जमिनीवर लोळविलें. पण तो पुरुष पुन्हां उठला आणि त्यानें शंकराच्या सैनिकांना खाण्याचा सपाटा चालविला. तेव्हां शंकराचे गण पळूं लागले. अखेरीस एकटा शंकर भूमीवर शिल्लक राहिला. आपल्या एकट्याचा युद्धांत निभाव लागायचा नाहीं असा विचार करून तोहि गिरि-कंदरांत जाऊन दडून बसला. अशा वेळीं पार्वती आपल्या हातीं लागेल अशा आशेनें त्रिपुरासुर मंदारपर्वतावर गेला. त्रिपुर आपल्याकडे येत आहे असें समजून पार्वती फार घाबरली, आणि तत्काल आपल्या पित्याजवळ म्हणजे हिमालयाजवळ आली. त्यानें तिला गुप्त ठिकाणीं लपवून ठेवलें. त्रिपुरानें मंदार[illegible]वर तिचा पुष्कळ शोध केला पण ती सांपडली नाहीं. पण त्याला हजारो सूर्याप्रमाणें तेजस्वी आणि अनेक अलंकारांनीं सुशोभित अशी चिंतामणीची मूर्ति सांपडली. ती घेऊन तो आनंदानें चालला असतां त्याच्या हातांतील ती मूर्ति अकस्मात् नाहींशी झाली. तें पाहून त्याला मोठें आश्चर्य वाटलें. आपल्याला हा अपशकुन झाला असें वाटून त्याचें मन उद्विग्न झालें.

देव पराभव पावल्यामुळें त्रिभुवनांत अधर्म माजला व यज्ञयागादि

कर्में बंद पडलीं. तेव्हा शंकर आणि कित्येक देव त्रिपुरवधाचा उपाय योजूं लागले. इतक्यांत देवर्षि नारद तेथें आला. त्याची शंकरानें पूजा केली आणि देवांच्या पराभवाचें वृत्त त्याला कथन केलें. तें ऐकून नारद म्हणाला, " शंकरा, तूं युद्धाला जाण्याच्या पूर्वी गजाननाचें पूजन केलें नाहींस म्हणून युद्धांत तुला पराभव पत्करावा लागला. यास्तव तूं आतां गजाननाची आराधना कर; आणि तो प्रसन्न झाल्यावर युद्धाला जा. म्हणजे तुला जय मिळेल. " त्रिपुरानें पूर्वी गजाननाची आराधना केली. त्याच्या कृपेनें त्रिपुराला एवढें सामर्थ्य मिळालें.

शंकर म्हणाला, " नारदा, तूं सांगतोस तें खरें असून मला पटलें आहे. गजाननानें मला एकाक्षर व षडक्षर मंत्र देऊन संकटसमयीं ते मंत्र जपण्यास सांगितलें आहे. पण युद्धाला जाण्याची घाई झाल्यामुळें मला जप करतां आला नाहीं. यामुळेंच मला युद्धांत अपयश आलें असलें पाहिजे ही गोष्ट खरी आहे. "

असें म्हणून शंकर दंडकारण्यांत गेला. तेथें त्यानें एकान्तांत जाऊन पद्मासन घातलें आणि प्राणायाम केला. यमनियमादि साधनांनीं इंद्रियांचा आणि चित्ताचा निरोध केला आणि दहा वर्षें मनःपूर्वक तपश्चर्या केली. त्यावेळीं शंकराच्या मुखांतून एक पुरुष उत्पन्न झाला. पांच मुखें, दहा हात, मस्तकावर चंद्र, गळ्यांत रुंडमाळा, सर्पांचें भूषण, सूर्यासारखें तेज, इत्यादि शंकरांचीं सर्व लक्षणें त्या पुरुषाच्या ठिकाणीं होतीं. असा तो दिव्य पुरुष शंकराला म्हणाला, " शंकरा, माझें स्वरूप जाणावयास मोठेमोठे ऋषी किंवा प्रत्यक्ष ब्रह्मदेव सुद्धां समर्थ होत नाहींत. उपनिषदांनाहि माझा अंत लागला नाहीं. मीच अनेक रूपें घेऊन पृथ्वीचें पालनपोषण करीत असतों. मी तुजवर प्रसन्न झालों आहें. तुला जे जे वर मागून घ्यावयाचे आहेत ते ते मागून घे. "

गजाननाचें हें भाषण ऐकून शंकराला फार आनंद झाला. तो म्हणाला,

" तुझ्या दर्शनानें माझे दहाहि नेत्र आज धन्य झाले. तुला नमस्कार केल्यानें पांच मस्तकांचें सार्थक झालें. तुझी स्तुति करून माझीं पांच मुखें पवित्र झालीं. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि उदक हीं पंचमहाभूतें; इंद्रियें आणि मन; यक्ष, गंधर्व, पितॄर, देवर्षि, देवगण, विष्णु, रुद्र, इंद्र, विश्वेदेव, साध्यदेव इत्यादि अखिल सृष्टि तूंच निर्माण केली आहेस. रजोगुणाचा अवलंब करून तूं विश्व उत्पन्न करतोस, सत्त्वगुणांमुळें पालन करतोस आणि तमोगुणामुळें विश्वाचा संहार तूंच करतोस. इतकें करून तूं अगदीं अलिप्त आहेस म्हणून तुला केवळ साक्षी असें म्हणतात. तूं सर्व गणांचा मालक आहेस म्हणून तुला गणपति असें म्हणतात."

शंकरानें ही स्तुति केलेली ऐकून गजानन म्हणाला, " शंकरा, ज्या ज्या वेळीं तूं माझें स्मरण करशील त्या त्या वेळीं मी तुझ्यापाशीं येऊन तुझें संकट निवारण करीन. माझ्या बीजमंत्राचा जप करून एक बाण अभिमंत्रित कर. तो बाण तूं त्या राक्षसाच्या पुरांवर सोडलास म्हणजे त्याचीं तिन्हीं पुरें भग्न होतील. मग तूं त्यांचें सहज भस्म करूं शकशील. "

असें बोलून गणपतीनें शंकराला आपलें सहस्रनाम सांगितलें. " या सहस्रनामाचा जप केला असतां कोणत्याहि कार्यांत जय येतो, आणि सर्व इच्छा पूर्ण होतात. युद्धाच्या वेळीं जप केल्यानें शत्रूचा पराजय होतो. तीन रात्रीं यांचा पाठ केला असतां इष्टप्राप्ति होते," असें सहस्रनामाचें फळ आहे असें गजाननानें सांगितलें.

हें वरप्रदान प्राप्त झाल्यावर शंकराला आनंद झाला आणि त्यानें ज्या ठिकाणीं गजाननाची आराधना केली त्या ठिकाणीं गजाननाचें देवालय बांधलें आणि तेथें एक शहर वसवून त्याला मणिपूर असें नांव दिलें. नंतर गणपतीनें शंकराबरोबर असलेल्या देवगणांस दर्शन देऊन तो अंतर्धान पावला.

गणपतीनें वर दिल्यामुळें शंकराला अत्यानंद झाला आणि त्यानें